# फकीराची कांबळी

—बी. रघुनाथ.

UNIVERSAL
LIBRARY
OU_192038
UNIVERSAL
LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

# OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83·1 Accession No. M1047

Author R14P

Title रघुनाथ की पत्रकारी कारकी

This book should be returned on or before the date last marked below.

द्मजा प्रकाशन

# फकीराची कांबळी

( स्वतंत्र लघुकथा संग्रह

★

लेखक

बी. रघुनाथ

●

पद्मजा प्रकाशन
बडोदें

मूल्य ३॥ रुपये

मुद्रक :
कृष्णाजी नारायण सापळे,
[illegible]मकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
त्रिभुवन रोड, मुंबई ४.

प्रकाशक :
[illegible]नसिंग चावडा
पद्मजा प्रकाशन,
[illegible] बडोदें.

प्रथमावृत्ति १९४८

[ सर्व हक्क स्वाधीन ]

एकमेव विक्रेते :
पद्म प्रकाशन लि.
सर फिरोझशहा मेहता रोड,
मुंबई.

अभाग्यांच्या भविष्यकाळास—

—बी. रघुनाथ

# प्रस्तावना

मराठवाड्यांतील तरुण साहित्यिक बी. रघुनाथ हे महाराष्ट्रास सुपरिचित आहेत. काव्य, कथा व लघुनिबंध हे तीन्ही वाङ्मयप्रकार त्यांनीं हाताळलेले असून त्यांचीं आतांपर्यंत सात–आठ पुस्तकें प्रकाशित झालीं आहेत.

बी. रघुनाथ यांनीं उपरोक्त तीन वाङ्मयप्रकार हाताळलेले असले, तथापि त्यांना ' लघुकथा ' हा वाङ्मयप्रकारच अधिक चांगला साधतो, असा माझा ग्रह त्यांचा ' साकी ' लघुकथासंग्रह वाचून झाला. तोच ग्रह प्रस्तुत ' फकिराची कांबळी ' हा त्यांचा दुसरा लघुकथासंग्रह वाचून दृढावला आहे.

' फकिराची कांबळी ' संग्रहांत बी. रघुनाथ यांच्या पंधरा लघुकथा संग्रहीत केलेल्या आहेत. या लघुकथा वाचून पहिला विचार माझ्या मनांत आला, तो हा कीं, बी. रघुनाथ हे लघुकथेच्या नांवाखालीं ' दुसरेंच कांहीं तरी ' वाचकांच्या पदरांत बांधत नाहींत, तर ते त्यांना खऱ्याखुऱ्या लघुकथाच देतात ! अलीकडे मराठींत लघुनिबंध, किंवा गद्यकाव्य, यांसारखे निराळेच वाङ्मयप्रकार ' लघुकथा ' म्हणून मिरवीत आहेत ! आणि, ' तंत्रमंत्रा 'चा ठोकळेबाजपणा नको, या सबबीवर या प्रथेचें कौतुकहि होत आहे ! बी. रघुनाथ हे या लाटेंत सांपडले नाहींत, यावरून त्यांची कलादृष्टि निर्मळ असल्याची साक्ष पटते.

या संग्रहांतील लघुकथांत रचनेचें वैचित्र्य दृष्टीस पडतें : ' नागझरीचा पाटील ' यासारखी लघुकथा, विषयानुरूप म्हणूनच कीं काय, कांहींशी जुन्या धर्तीची वाटते, तर ' आलाप आणि विलाप ', ' कुत्रे ' यांसारख्या लघुकथा नवीन घाटणीच्या वाटतात. ' प्रेम केलें, आणि . . . ! ' यासारखी रूपककथाहि संग्रहांत आढळते.

बी. रघुनाथ यांच्या कथावाङ्मयाचा प्रमुख विशेष म्हणजे वातावरणनिर्मिति हा होय. मराठी भाषा बोलणाऱ्या इतर प्रदेशांपेक्षां मराठवाड्यावर इस्लामी संस्कृतीची जास्त छाप पडलेली आहे आणि तिचे भले–बुरे परिणाम घडलेले दिसून येतात. खेरीज, तेथील हिंदु संस्कृति बव्हंशीं ' मध्ययुगीन ' स्वरूपाची आहे, ती निराळीच. अर्थात् मराठवाड्यांचें म्हणून एक निराळेंच वातावरण बनलेलें आहे. हें वातावरण बी. रघुनाथ यांच्या कथावाङ्मयांत ठिकठिकाणीं निर्माण झालेलें आढळतें. यामुळें त्यांच्या रचनेला प्रादेशिकतेचा रंग चढलेला असून तिला एक प्रकारचें वैशिष्ट्य आलेलें आहे. ' कुत्रे ', ' धर्म बुडत चालला आहे ', ' नागझरीचे पाटील ', ' रक्त आणि अश्रु ', ' ते तिघं आणि ती ', ' प्रधानांचा दौरा '—इत्यादि लघुकथा या दृष्टीनें उल्लेखनीय आहेत.

वर निर्दिष्ट केलेल्या कथांपैकीं 'कुत्रे', 'धर्म बुडत चालला', 'रक्त आणि अश्रु',—यांसारख्या कथा मुसलमान समाजाला वाहिलेल्या आहेत. मुसलमानां-विषयीं लिहिलेल्या लघुकथा मराठींत अत्यल्प आढळतील. त्या दृष्टीनेंहि बी. रघुनाथ यांच्या या लघुकथांना मराठी कथावाङ्मयांत स्वतंत्र स्थान प्राप्त होणार आहे. मुसलमानांविषयीं लिहिलेल्या या कथांत त्या समाजाचें काळेंकुट्ट चित्रच रंगविलेलें आहे, यावरून मराठवाड्यांतील हा समाज—निदान त्यांतील कांहीं भाग–किती अधःपतित झाला आहे, याची कल्पना येईल.

बी. रघुनाथ यांच्या लेखनांतील चटकदारपणा डोळ्यांत भरण्याजोगा आहे. त्यांचें कोणतेंहि गद्यलिखाण घ्या, त्यांत चार–सहा तरी वाक्यें अशीं आढळतील कीं, जीं रसिकांचें लक्ष्य विशेष जोरानें वेधून घेतील. एखादी सुंदर कल्पना, एखादा उदात्त विचार उमद्या शब्दांत पेरून देण्याचें बी. रघुनाथ यांचें कौशल्य वाखाणण्यासारखें आहे. पुढील कांहीं स्थळें पहा : 'फार जपून चाललं, तरी कांठोकांठ भरलेली घागर सारखी डबडबत राहावी, तसाच यौवनाचा झोंक वाटत होता' (पा. ४); 'अन् मग नागझरीचं शिवार नुकत्याच वागायला उठलेल्या एखाद्या कोंवळ्या बाळंतणीसारखं ओलसर, हिरवं आणि रम्य दिसत होतं' (पा. ५६)–वगैरे.

पण बी. रघुनाथ हे केवळ चटकदार लेखनावरच संतुष्ट होणारे नाहींत. ललितवाङ्मयाचे उद्दिष्ट जीवनदर्शन घडाविणें हें आहे, याची त्यांस पुरेपूर जाणीव आहे आणि या दिशेने त्यांनी प्रयत्नहि केलेला आहे. हें जीवनदर्शन कधीं करुणा, तर कधीं उपरोध यांचा आश्रय घेऊन ते घडवतील. प्रस्तुत संग्रहांतील बऱ्याच कथा या दृष्टीनें वाचनीय आहेत.

याप्रमाणें 'फकिराची कांबळी' या लघुकथासंग्रहाबद्दल मला जें प्रामुख्यानें सांगावयाचें होतें, तें थोडक्यांत सांगून झालें आहे. याहून जास्त विस्ताराची आवश्यकता आहे, असें मला वाटत नाही. बी. रघुनाथ हे इतःपर लघुकथा-लेखनालाच चिकटून राहिल्यास आणि त्यांनीं कसोशीनें प्रयत्न केल्यास त्यांच्या पुढील लघुकथा अधिकाधिक कलापूर्ण व जीवनाचा ठाव घेणाऱ्या अशा उतरतील, अशी आशा निर्माण करणारा हा संग्रह आहे. तसें झाल्यास 'आजकालच्या लघुकथालेखकां'त त्यांस वरच्या श्रेणीचें स्थान प्राप्त होईल, हें उघड आहे.

यवतमाळ, वऱ्हाड,
२४ एप्रिल १९४८

**वामन नारायण देशपांडे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | आलाप आणि विलाप ... ... ... | १ |
| २ | कुत्रे ... ... ... | ११ |
| ३ | तीन संसार ... ... ... | २० |
| ४ | निःसंग ... ... ... | २४ |
| ५ | समजा, पाकिस्तान झालं— ... ... ... | २९ |
| ६ | धर्म बुडत चालला आहे ! ... ... ... | ४२ |
| ७ | नागझरीचे पाटील ... ... ... | ५० |
| ८ | रक्त आणि अश्रू ... ... ... | ७१ |
| ९ | घंटा वाजते आहे ! ... ... ... | ८० |
| १० | माणूस सुधारला आहे ! ... ... ... | ८९ |
| ११ | 'प्रेम केलें, आणि...' ... ... ... | ९६ |
| १२ | ते तिघं आणि ती— ... ... ... | ९८ |
| १३ | थैली ... ... ... | ११० |
| १४ | स्वर्ग कुठं आहे ? ... ... ... | १२१ |
| १५ | प्रधानांचा दौरा ... ... ... | १२४ |

सत्यकथा, समीक्षक, युगतार, हंस, ध्रुव आणि मंदार या मासिकांच्या, धनुर्धारी साप्ताहिकाच्या व दैनिक समाचार या दैनिकाच्या साध्या व दिवाळी अंकांतून या संग्रहांतील कांहीं गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या त्या मासिकांच्या, साप्ताहिकांच्या व दैनिकांच्या संपादक मंडळींचा मी व प्रकाशक आभारी आहोंत.

—लेखक

*

# आलाप आणि विलाप !

**विद्यासंपादनासाठीं** मी हैद्राबादीं राहात होतो. महिना संपण्यापूर्वींच घरून मुबलक पैसे येत होते; अन् ते मन मानेल तसें उधळण्यांत मी सरावलों होतों. आमच्या वेळची हॉटेल्स् मोठीं भकास आणि भिकार! भाताचा ढिगारा आणि आंबट वरणाचा अटलांटिक महासागर! त्यावर दिवस न् दिवस काढायचे म्हणजे भयंकर शिक्षा होती. माझे परिचित मद्रासचे आजचे कांहीं 'तपकिरी' पुढारी आणि वर्तमानपत्रांतूनच जहाल भाषा वापरणारे कांहीं आंध्र संपादक याच "आम्लोदकां"तून वर आले होते हे मात्र निश्चित! माझ्यासारख्या मराठवाड्याच्या ऐन गाभ्यांतल्या माणसाला तें आंबट जेवण पथ्यालाहि मानवणं शक्य नव्हत. तेव्हां करनूरकरांच्या वाड्यांत एक स्वतंत्र खोली घेतली, अन् एका पगारी स्वयपाकिणीच्या सहानुभूतीवर मी सुखानं जगूं लागलो!

करनूरकराचा वाडा आम्हां विद्यार्थीवर्गात बराच प्रसिद्ध होता. वाड्यांतलं वातावरण माझ्या मनाला उत्तेजित करणारं होत. शाळेला शक्य तो जावयाचा माझा परिपाठ होता. पण अभ्यासापेक्षां अवांतर भानगडीच अधिक मनोवेधक वाटत होत्या. छानछोकीच्या पोषाखांतले एक चष्माड गोरटेले मास्तर बारीक बायकी आवाजांत आठव्या हेन्रीची कारकीर्द समजावून सांगत होते, अन् माझं मन आमच्या वाड्यांतील टिपणीस-मास्तरांच्या मुलीशी या आवाजाचं साम्य पडताळून पाहण्यांत गुंग होऊन जात होतं! इतिहासांतल्या रम्याद्भुत भानगडी, चुकून पुरुष झालेल्या मास्तरच्या बायकी आवाजाला शोभत नव्हत्या. तंतुवाद्याचा तुतारी म्हणून उपयोग करावा, अथवा नृत्यमंदिरांत लयबद्ध रुमझुमाटालाच जीं पावलं योग्य त्यांना पोलीसी कवाईत करावयास लावावी, तसाच हा प्रकार!

वर्गात माझ्या शेजारीं अर्नाळकर नांवाचा एक 'वली' बसत होता. स्वारी आत्मचिंतनांत नेहमीं लीन असायची. तोंडावरची माशी: मारावयाची ज्यांत धमक नाहीं तो प्रेमाच्या मोठमोठ्या बाता आणि उलाढाल्या करील हें स्वप्नातहि एखाद्याला खरं वाटलं नसतं. सारेच मास्तर त्याला 'अजागळ' म्हणत. पण या 'अजागळा'च्या गळ्यांत एक ऊर्वशी पडली होती याचा मात्र कुणालाच पत्ता नव्हता. आमचं संघटन वाढलं, अन् प्रेमाच्या विचारविनिमयाला सुरवात झाली. भीमसेनराव भोंड्यांच्या वासंतीची त्याला आलेलीं, अन् त्यानं तिला लिहिलेली पत्रं माझ्या नजरेखालून जाऊं लागली. वासंतीचं अक्षर अतिशय गचाळ. लिहितांना ती फार बेफाम चुका करीत होती. 'वासंती'चं 'वांती', 'संती', अथवा 'वाती' होऊन आपली होऊं इच्छिणारी 'पत्नि' ऐवजीं 'पन्ती' अथवा 'पणती' अशा तऱ्हेचे अनेक चमत्कार तिच्या पत्रांतून येत होते. पण पातळ कागदावर पेन्सिलीनं खरडलेल्या त्या अस्पष्ट अक्षरांत कांहीं अपूर्व उन्माद रसरसल्यासारखा वाटून मला अर्नाळकराचा हेवा वाटत होता. एकदां त्याच्याबरोबर मीं त्याची 'पणती' न्याहाळली. त्या दोघांच्या नजरभेटींत मला काव्याचा साक्षात्कार झाला. अन् फार मोठ्या इस्टेटीबद्दल हक्काच्या बाबतीत वडील भावाविषयीं धाकट्याच्या मनांत भडकणारा मत्सर मला स्पर्शून जाऊं लागला.

मग स्वप्नांतहि संचलित करणारे करनूरकरांच्या वाड्यांतील सुंदर चेहरे मी मनोमन पाहूं लागलों. प्रथम माझ्या डोळ्यापुढं चेहरा आला तो खालच्या बिऱ्हाडांतील 'सोमनाथम्' नांवाच्या एका मलबारी गृहस्थाच्या बायकोचा! तो कुठल्याशा हपीसांत टायपिस्ट होता. हा मलबारचा प्राणी इकडं शिरला तो अतिशय सुंदर बायको आणि तिच्याबद्दलचा कमालीचा अविश्वास घेऊन! तिला पुरुषांचा वारा देखील लागूं नये म्हणून सोमनाथम् काळजी घेत होता. हपीसाला जातांना बायकोला घरांत कोंडून दाराशीं ठोकलेलं कुलूप त्यानं संध्याकाळी चारला उघडायचं आणि मग तरी काय, दारांत आरामखुर्ची टाकून अन् स्वतःच्या देहाला साजेल अशी भली मोठी डिक्शनरी घेऊन तो पहारा करीत बसायचा. तिला पाहातांच त्याला फासावर चढवावं असं कुणालाहि वाटलं असतं. ती देखील कांहीं कमी नव्हती. तो हपीसांत गेला कीं घराच्या खिडक्या ती सताड उघड्या ठेवीत होती, अन् दिसेल तेवढं जग खुशाल पाहून घेत होती! केळीच्या पानांत

केवड्याच्या पात्याबरोबर फुलं देखील गुंडाळून ठेवावीं तसं हिरव्या साडीनं वेढलेलं तें भरांतलं रूप वाटत होतं. तिचं अर्धवट मराठी ऐकतांना श्रवणांची संपूर्ण ग्राहकशक्ति खर्ची घातली तरी तृप्ति होत नव्हती !

दुसरा चेहरा म्हणजे रेल्वेकॉन्ट्रॅक्टर मि. रानडे यांच्या निरपत्य पत्नीचा ! ती उद्योग–उत्साहासाठीं सारी मराठी मासिकं रात्रंदिवस वाचीत होती, पण सबंध काळ निरुद्योगांत आणि निरुत्साहांत जात होता. अन् मग आत्मोन्नतीसाठी ती ग्रामोफोन लावीत होती.

जनाब रानडे दर तीन महिन्याला घरी एक फेरी करीत अन् दीड दिवस राहून पुन्हां पसार होत. त्या घरांतून रोजच्या रोज ताज्या फुलांच्या गजऱ्यांचा सुगंध माझ्या खोलीत येत होता अन् मनाला सुखवून आणि दुखवून जात होता. मासिक आणायच्या निमित्तानं त्या घरांत माझं जाणं येणं सुरू झालं. उपभोग-शून्यतेच्या विचित्र हव्यासांत एखाद्या गुलामाची अवस्था व्हावी तशाच मदाम रानडे दिसल्या. मासिकाबरोबर गोड चहा अन् त्यांच्या वाटेल त्या अवस्थेंत त्यांच्या-कडे बेधडक पाहात राहण्याचं ' नागरिक स्वातंत्र्य ' न मागता मिळूं लागलं. कधी कधी पलंगावर बसल्या बसल्या अंगाला चमत्कारिक आळोखेपिळोखे देत त्या म्हणायच्या,

" आज हवा मोठी विचित्र पडली आहे, नाहीं ? "

वसंताला अंत नसलेल्या उद्यानांत विहार करण्यासाठीच आसुसलेल्या या जीवाला, काय आणि कसं उत्तर द्यावं हें मला समजेनासं होई.

तिसरं स्त्री–रत्न म्हणजे आमच्या टिपणीस मास्तरांची चवथी बायको ! मामला थोडासा अडाणी होता. पण शहरी संस्कृतीचे थोडेबहुत संस्कार झालेला तो ' खेडवळ राजहंस ' अतिशय गोड आवाजांत कृत्रिम शहरी शब्द गुलगुलत ह सायचा अन् आपल्या चंचल टपोऱ्या डोळ्यांनी अनुगामित्वाला आवाहन करतो आहे असं वाटायचं ! टिपणीसमास्तर आतां पेन्शनला आले होते. उतारवयांत आणलेला हा भारी अलंकार ते कसा जपून ठेवतील याची शंकाच होती. पण त्यांच्या ' शालन् 'कडे पाहातांना या ' खेडवळ राजहंसा 'संबंधीं विचार करायला मला वेळ कुठं होता ?

यौवनांतील संपूर्ण ऐश्वर्यासह शालन्नं माझ्या दृष्टीपुढं पाऊल टाकलं होतं. माझ्या दारापुढून जातांना तिचं फिकट फुलाचं पाताळ सळसळत होतं. फार

जपून चाललं तरी कांठोकांठ भरलेली घागर सारखी डबडबत राहावी तसाच यौवनाचा झोक वाटत होता. जातांना न् येतांना ती पाहात होती न् हंसत होती. अन् मी नळावर असलों कीं पाणी भरायच्या निमित्तानें हटकून येत होती!

एकदां अकस्मित माझी रेशमी दस्ती तिच्या पोलक्याच्या खिशांत पाहून तिच्या नव्या मातेनं तिला 'जंग जंग' पछाडलं! तें दुःख केवळ माझ्या डोळ्यांच्या धीरावर त्या घाबरट पोरीनं निमूटपणें सहन केलं!...ह्यानंतर सिनेमाचा रुपेरी पडदा! दृष्टीला आणि मनाला उद्दीपित करणारा केवढा मालमसाला तिथं होता! 'बुलबुले कारवान्' सारखा लक्षावधी मवाल्यांनीं प्रशसिलेला "मार डाला" पट ( उदाः—स्त्रीपट, संसारपट, प्रेमपट, इ.) आम्ही सुद्धं देऊं म्हणजे काय? नायकनायिकांच्या चुंबनालिंगनांची आणि 'जवानी' वरील गीतांची त्यांत नुसती लयलूट असायची! विद्यार्थीदशेला मुळींच न शोभणाऱ्या आमच्या मानसिक लीलांची जबाबदारी खरंच कुणावर होती?

असाच एक सिनेमा पाहून मी परत येत होतों; अन् परततांना भलत्याच रस्त्यावरून फिरायची लहर दाबतां येत नव्हती.

क्लासमेट देशमुख याच्या घरीं चांगली मेजवानी झोडली होती. सुग्रासाच्या नशेनं मेंदू जड आणि सुस्त झाला होता. देशमुखाचं आज फलशोभन होतं. तो अतिशय खुशीत दिसत होता. भारी शालू नेसून तूप वाढण्यासाठी त्याची बायको आली होती. तिचा तकाकणारा पिवळा जर्द रंग पाहून विचित्र विचार मनांत येऊन गेले होते. गेल्या दोनतीन दिवसांत अर्नाळकर भेटला नव्हता. माझ्या खोलीची किल्ली आजच अकस्मित कुठं तरी हरवली होती. मी आणि अर्नाळकरानं एकाच वेळी सारखीच कुलपं खरेदी केल्यामुळं ती त्याच्याकडं मिळेल म्हणून मी त्याच्या घरीं गेलों. पण तो दुपारपासून घरी नसल्याचं कळलं. तो वासंती-कडंच असावा यांत शंका नव्हती. देशमुख आणि अर्नाळकर...त्यांच्या विचारानं मला एकाकी वाटूं लागल. भडकलेल्या मनाला सिनेमांत समाधान मिळेल असं वाटत होतं. आधी 'इब्राहिम् थिएटर' करून नंतर 'दाणेआळी' कडं वळणाऱ्या कमालीच्या अनीतिप्रवणांप्रमाणं मी आतां भलत्याच रस्त्यावरून चाललों होतो. यौवनांकित मनाला पहिल्यादांच लागलेली चमत्कारिक कळ कुठं आणि कशी निववावी हे समजत नव्हतं. इकडं तिकडं पाहाण्याच डोळे काम करीत होते. पण मन म्हणत होतं, 'विद्या तुझ्या मनुष्यत्वाला भूषविण्याचा प्रयत्न करीत आहे.

घरंदाजपणाचे तुजवर संस्कार झाले आहेत. जरा सांभाळ !...' कां कोण जाणे ! तेथला साराच प्रकार मला किळसवाणा वाटला. वेश्या नटून थटून बसल्या होत्या. त्यांच्यासाठीं धांवून येणाऱ्या पुरुष-प्रकृति पिऊन झिंगून येत होत्या. ज्याची लालसा माझ्या मनांत भडकली होती तें इतकं विलक्षण होतं ?... देशमुख कशासाठी आज एवढा खूष दिसत होता ? अनोळकराच्या अन् वासंतीच्या सख्यांत एवढ वेड जाण्याइतकं आकर्षण काय होतं ? त्यांतील सौख्य चिरंतन होतं कीं क्षणिक होतं ?

इतक्यांत माझी 'राजू' मजुरीण समोरून येतांना मला दिसली. तिला टाळण्यासाठी मी सटकन् बाजूच्या बोळांत शिरलो. तिनं आपल्याला पाहिलं कीं काय अशी शंका आली, अन् वाटलं, तिचे भेदक डोळे माझ्या पोषाखीपणाची आवरणं भेदून विचारूं लागले आहेत—

"इकडं कुठं बाबूराव !"

मीहि जोरजोरानं विचार करूं लागलों. ती तरी अशी कोणती शीलवती होती ? अन् ह्या 'रात्रीच्या रस्त्यावर' तिचं कोणतं काम नडलं होतं ?

मग स्वतःपेक्षां तिच्यासबंधीच अधिक विचार करीत मी खोली गांठली. किल्ली हरवल्याची लगेच आठवण झाली. कुलुप तोडण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. मी कुलपाला हात घातला, तों काय ! दाराला कुलुप नव्हतं. अन् चमत्कार असा की तें आंतून बंद होतं ! करनूरकरांच्या वाड्यांत सुंदर चेहऱ्याबरोबर भुतांचाहि संचार झाला होता की काय ? इतक्यांत आंतला दिवा मोठा केला जाऊन हलकेंच दार उघडलं गेलं. अन् मी अतिशय थक्क होऊन पाहिलं तो ती वासंती ! वासंती...

मी कांहीं बोलणार तोच तिनं आंत येण्याची खूण केली. दार बंद करून तिनं हलक्या आवाजांत मला सारा प्रकार सांगितला. अनोळकराबरोबर तिनं पळून जायचं ठरविलं होतं. वडील परगांवीं गेल्याची संधी पाहून ती अनोळकराबरोबर बाहेर पडली होती. गाडीची वेळ होईतों माझी खोली आश्रयासाठी निवडली होती. पैशाची वगैरे तरतूद करून अनोळकर परतणार होता तो नक्की रात्रीच्या बारानंतर ! येतांना ह्या जोडप्याला कुणी पाहिलं नव्हतं हें ठीक झालं होतं. पण, कां कोण जाणे, ती माझ्या हालचालीकडं बारकाईनं पाहूं लागली. मला तें जाणवलं. मनांत एक चमत्कारिक कळ उठली. माझी छाती धडधडत होती.

शब्द कापरे उठत होते. मनांत 'नको' आणि 'हो' चा सारखा झगडा चालू होता. मनांत जे खुपत होतं आणि सलत होतं ते तिला कसं सांगावं हे कळत नव्हतं. अखेर मी विचारलं,

"झोंपणार आहेस ना ?"

तिच्या प्रत्येक हालचालीत पुरुषासंबंधी घेण्यांत येणारा सावधपणा भरला होता. माझं चांचल्य तिनं ओळखलं असावं. माझी वळकटी तिला देऊन जवळच्च दुसऱ्या एका सतरंजीवर मी अंग टाकलं. आमच्या अंथरुणांत फार झालं तर हात दीड हाताचं अंतर असेल. पण त्या रिकाम्या जागेंत मैत्री, सुजनता इत्यादि कल्पना आडव्या उभ्या होत्या. पांघरुणांत गुंडाळून पडलेल्या वासंतीच्या आकृतीकडं मी सारखा पाहात होतों. आश्रयार्थ आलेल्या मित्राच्या प्रियतम वस्तूचा अशा रीतीनं अपहार करणं माझ्या माणुसकीला शोभण्यासारखं नव्हतं. अकस्मित अनोळखराची दारावर थाप पडली. वासंतीला जशीच्या तशीच त्याच्या स्वाधीन करून तिच्या स्पर्शानं उबारलेल्या आंथरुणावर मीं अंग टाकलं मात्र ! माझच सौजन्य माझ्यावर तुटून पडूं लागलं ! त्या मऊ आंथरुणावर रात्रभर मी नुसता जळत आणि पोळत राहिलो !

◆ ◆ ◆

सकाळ झाली होती. मदाम रानड्यांच्या बाथरूममधून साबणाचा सुगंध आणि बांगड्यांची किणकिण येत होती. कमरेवर एक पितळी डौलदार कळशी घेऊन शालन् खालून वर अन् वरून खाली ये-जा करीत होती. तिच्या सगळ्याच हालचाली मी टिपून घेत होतों. अन् मला केवढं प्रसन्न वाटत होतं ! माझं रात्रीचं दैन्य आणि दिवसा दिसणारा हा कोवळा प्रकाश. . .हसत आणि गुणगुणत जे सहज मिळवितां येण्यासारखं होतं अन् जे दारापुढून येरझारा करीत होतं त्यासाठी एवढं मनोदहन कशाला, असं वाटून मी चटकन् उठलो. खाली जाऊं लागतांच जिन्यांत शालन् भेटली. अन् मग तिचा 'चू' हा शब्द दिवसभर सारखा कानाशी घोटाळत राहिला. पण पुन्हां मात्र ती खोलीपुढून फिरकली नाहीं याचं आश्चर्य वाटलं. या तरण्या लाजऱ्या पोरी मोठ्या दुष्ट आणि निर्दय !, नुसत्या लांबूनच पाहातील अन् हंसतील थोड्याशा ! पण जवळ म्हणून सहसा फिरकायच्या नाहींत ! आपल्या सहजशा दृक्पातानं दुसरं एखादं अंतःकरण घायाळ होत आहे याची त्यांना कल्पनाहि नसते !

रात्र होऊं लागली तशा कालच्या वेदना आज नव्या स्वरूपांत पिच्छा पुरवूं लागल्या. अर्नाळकर आणि वासंती आतां कुठल्या तरी हॉटेलांत असतील ! परस्परांच्या बाहूंत पडून रात्र लवकर न संपावी म्हणून मनोमन प्रार्थना करीत असतील ! देशमुखासारखा सुखी प्राणी कुणी नव्हता ! चांगलं ऐश्वर्य अन् त्या ऐश्वर्याला साजेल अशी सुदर बायको ! या रात्रीनं केवढ्या सुखाचा ठेवा त्यांच्या स्वाधीन केला होता ! अन् मी मात्र त्यांच्याविषयीं विचार करीत दुःखी होऊन पडलों होतो !

दार उघडून मी गॅलरीत आलो. टिपणीसमास्तरांच्या घराचं दार उघडंच होतं. मास्तर न् मास्तरांच्या सौभाग्यवती पलीकडच्या खोलीत झोपली होती. इकडच्या खोलींत दाराशीच शालन्चं आंथरूण होतं. जवळच्या टॉवरवर बाराचे टोले पडले. रस्त्यावरून एक तांगा जोरानं खडाडत गेला. मग मध्यरात्रीच्या शांततेला एकहि आवाज डिवचीत नाहीसं दिसलं. विचारांच्या आवेगासरसीं मी शालन् जवळ गेलो अन् तिला अलगद उचलून मी माझ्या खोलींतल्या आंथरुणावर आणून निजवलं. ती कसल्या तरी स्वप्नांत असावी. अत्यंत मृदुतर चुंबनानंच मी तिला जागवलं. पण काय ? मला पाहातांच ती ताडकन् उठली न् आंथरुणाच्या पलीकडे जाऊन उभी राहिली. तिच्या स्वप्नांत आलेला पुरुष माझ्यापेक्षां कांहीं निराळा होता की काय ?

ओरडण्याचं नाटक करण्यांत कांही अर्थ नव्हता. शेजारच्या तरुणाशी रेशमी दस्त्याची नेहमी अदलाबदल करणारी, जिन्यांतल्या ओझरत्या भेटीत 'च्' ह्या लाघवानं पाचारणारी कोवळी तरुण पोरगी अपरात्री त्याच्या सान्निध्यांत आल्यावर एवढी कां घाबरावी ? रसिकता काय आहे, याची थोडीबहुत मलाहि जाणीव होतीच ! मी कांही तिला निवळ खाऊन टाकणार नव्हतों. थोडस पुढं सरकून अतिशय हळुवारपणानं मीं तिचा हात धरला. तो थरथरत होता. अंगाचा पदर तिनं घट्ट सांवरून धरला होता. माझ्या हातांतला हात सोडवून घेण्याची तिची धडपड अकारणच नव्हती तर काय ! कांपऱ्या आणि घोगऱ्या आवाजांत तिच्या कानाशी लागून मी म्हणत होतों, "माझं तुझ्यावर प्रेम आहे शालन् !"

मी तिची मनधरणी करीत होतो. सुटकेसाठी विनवणीचे सारे शब्द ती खर्चे करीत होती. मजपासून स्वतःचं सर्वच शरीर रक्षण करण्याची तिची पराकाष्ठा चालू होती. मी तिला बाहेर जाऊं द्यावयास तयार नाही अस कळून येतांच

ती हताशपणानं रडूं लागली. पलीकडच्या घरांत कुणी तरी खोकूं लागलं. तिचा घट्ट धरलेला हात मीं सोडला अन् ती निघून गेली. तेव्हां एखाद्या विद्ध पांखरा-सारख्यं आत्यंतिक असहायतेनं मीं माझं तप्त शरीर आंथरुणाच्या स्वाधीन केलं. केवढ्या उन्मत्तपणानं मीं तिला आणलं होतं! अन् केवढ्या पराभूत भावनेनं सोडून दिलं होतं! तिची कठोरता इतकी अभेद्य असेल याची कल्पना नव्हती! मनोभंगाच्या वेदनांना कांहीं अंत राहिला नाहीं. विकलाश आणि अशान्त असा आंतल्या आंत मी नुसता कुढत राहिलों होतो!

◆ ◆ ◆

जीवितावर आपलीं पाऊलं रोवीत काळपुरुष पुढं पुढं धांवत होता. जें मी प्रत्यक्ष पाहिलं होतं न् सुंदर वाटल्यामुळं ज्याचा मी पाठलाग केला होता, ते निदान झोपेंत तरी विसरतां येतं का, हें मी पाहात होतों.

वासंतीच्या पलायनाचा बराच गजबजाट झाला होता, अन् बड्या घरचं प्रकरण म्हणून लगेच त्याची दाबादाबी झाली होती. सहामाही परीक्षा नुकतीच आटोपली होती. माझे पेपर निवळ कोरे करकरीत होते. शालन्चं गांवांतच लग्न झालं होतं. मांडवाखालून गेलेल्या मुलीच्या सौंदर्यात जी रम्यता येते ती तिच्या ठिकाणीं आतां दिसत होती. पण माझ्या दृष्टीला त्या रम्यतेत कांहीच आकर्षण उरलं नव्हतं. टिपणीसमास्तरांच्या सौभाग्यवती गर्भवती होत्या. त्यांच्याकड आतां सहसा पाहावतहि नव्हतं. खालच्या बिऱ्हाडांतली 'सोमनाथम्' ची बायको अकस्मित वारली. तो रडला आणि हळहळला. पण माझं तर तिच्याशी कधी संभाषणहि झालं नव्हतं, तरीहि मला क्षणभर कससंच वाटलं!

मदाम रानडे अलीकडं रोजच्या रोज मला चहाला बोलावीत होत्या. 'प्रकृति ठीक नाहीं का?' असं विचारीत होत्या. आजवर त्यांच्यासाठीं हवा कधींच चांगली पडली नव्हती. अन् चांगल्या हवेचे तर मजवर अतिशय वाईट परिणाम झाले होते. राजू आतांशा मजकडे टक लावून पाहात होती. मी नको म्हणत असतां माझा बिछाना टाकून ठेवीत होती. पण ह्या साऱ्या गोष्टीचा अर्थ उलगडीत बसून मनाला शिणविण्यांत कांहीं अर्थ नव्हता. तिची जवळून होणारी हालचाल मानवत नव्हती. तिची ती विलक्षण मादक दृष्टि सोसवत नव्हती. एकदां मीं तिला खूप चिडून म्हटलं,

" राजू ! माझ्या आंथरुणाला हात कां लावतेस ? "

व्याकुळ होऊन मजकडे तिनं पाहिलं. तिला अकारण दुखवलं म्हणून नंतर मला वाईट वाटलं. मग कांहीं आठवल्यासारखं करून मीं तिला म्हटलं,

" गेल्या महिन्याचा तनखा तूं अजून मागितला नाहींस ! पैसे नकोत तुला ? "

तिला एक चांगली साडी खरेदी करावयाची होती. दहा एक रुपये मजकडे जमा होईतों ती वाट पाहाणार होती, अन् मग माझ्याच पसंतीन ती साडी घेणार होती. चटकन् खिशातली एक दहाची नोट काढून मीं तिच्यापुढं टाकली. तिला अतिशय आनद झाला असावा. पण पापकर्माच्या वेळी एखाद्या नीतिमानालाहि वाटणार नाही इतकी त्यावेळी मला स्वतःची लाज वाटली. त्या देणगींत औदार्य होत कीं माझ्या क्षुद्रत्वाचं ते प्रदर्शन होतं ?...

सिनेमाला येण्यासाठी मदाम रानडे सारखा आग्रह करीत होत्या. माझी अभ्यासाची सबब त्यांनीं फेटाळून लावली. चहाशिरा चारला. अन् वर त्या म्हणाल्या देखील,

" चांगल गोड खाऊ घातलय् मी. आतां मात्र नाही म्हणूं नका ! "

सिनेमाची वेळ झाल्यावर आम्ही बाहेर पडलो. आजचं त्यांचं प्रसाधन अपूर्व होत. नित्याचं वेषभूषेतील औदासिन्य सोडून नटण्याथटण्याचं सार कसब आज त्यांनीं उपयोगांत आणलं होतं.

" बाबुराव, आपल्याला सिनेमाला जायचं आहे. हवा खायला नाहीं. तांगा बघा ना एखादा ! "

" आतां चांगला तांगा कुठून मिळायला ? यावेळी सारेच तांगे स्टेशनवर असतील. एखादा खटारा पाहून हिसके न् हेलकावे का विकत घ्यायचे आहेत ? "

" ज्यावेळी जशी वस्तु मिळेल त्यावेळी तिचा तसा उपयोग घ्यायलाच हवा. आपल्याला सिनेमाला न् तोंहि तांग्यांतून जायचं आहे. चालत जाऊन पाय दुखवून घ्यायचे नाहीत ! "...

चालतांना जे अंतर होतं ते तांग्यांत बसल्यावर नाहीसं झालं. मी संकोचून तांग्यांत बसलों होतो. त्या मला निःसंकोच करायची खटपट करीत होत्या. परत येतांना तांग्याच्या हिसक्यांतच कीं काय त्या माझ्या अंगावर पडल्या. आणि

नंतर स्वतःला सावरण्याचा त्यांनीं प्रयत्न केला तो अतिशय नाखुषीनं न् नाइलाजानं !

मा खोलीकडे निघणार तोंच त्या म्हणाल्या,

" वा ! या ना, चहा घेऊं या ! "

आजच अगदी मुक्तमन होऊन आपल्या संपूर्ण प्रेमाचा वर्षाव या प्रौढ सुंदरीनं मजवर कां करावा हें मला समजेना. या मोकळेपणाला अमूकच अर्थ असेल हें निःशंकपणानं ठरवितां येईना. दार बंद करून मदाम रानडे हळूच माझ्या खुर्चीजवळ आल्या. गळ्यांत हात घालून त्यांनी तोंड खाली वाकविलं. जवळ आलेले डोळे कमालीच्या असहायतेनं भरलेले दिसले.

" किती निष्ठुर आहा तुम्ही बाबूराव ! " अस कांहींसं त्या म्हणाल्या तें मीं अर्धवट ऐकलं.

आणि त्या विचित्र, विलक्षण मोहाच्या झपाट्यांतून मी सुटलो तेव्हां फार उचावरून आपल्याला कुणी तरी खूप खोलवर भिरकावलं आहे असं मला वाटलं. तृप्तीनं भरलेल्या त्यांच्या डोळ्यांकडे मी क्षणभरच पाहिलं आणि, विकलांगः होऊन खोलीत नुसता धांवत आलो !

सुंदर वस्त्रांनी अवगुंठलेली स्त्रीजात, सौंदर्य, प्रेम, सारं कांही निष्प्रभ, आनद-हीन आणि विकृत दिसूं लागलं.

शालनूच्या नकारानं माझ्या हृदयावर विलक्षण आघात झाला होता पण त्यानंतर चित्ताला थोडी शांति येत चालली होती, ती आतां झालेल्या नव्याच जखमेनं पूर्णपणें नष्ट झाली होती ! जे मिळत नाही म्हणून मी दुःखी झालों होतों ते मिळाल्यावर तरी मी असा काय सुखी झालो होतो ? उलट माझ्याच दैन्याची मला आतां घृणा वाटत होती !

खरंच, जीवनांत अभिलाषा आणि उपभोग या दोन्ही गोष्टी निव्वळ दुःख-दायक ठेवण्यांत दैवी शक्तीचा कांहीं हेतु होता ?

सकाळी राजू आलेली दिसली. मदाम रानड्यांच्या आंथरुणांत माझी दस्ती सांपडल्याचं ती मला सांगत होती. तें मीं ऐकलं होतं; न तोंडावरून पांघरूण ओढलं होतं. ती निघून गेली तेव्हां काल तिला दिलेली नोट माझ्या उशाशी परत आलेली आढळली. लक्षावधि शब्दांनी होणार नाहीं एवढा धिःकार त्या कागदाच्या चिटोऱ्यानं झाला होता ! ◆ ◆ ◆

# कुत्रे

जून महिना संपत आला होता अन् आभाळ मोठं तऱ्हेवाईक होत चाललं होतं. केव्हां ढग अतिशय गच्च भरून येत होते. जणुं माणसांचा कोंडमारा करण्याची त्यांची पैज लागत होती ! वाऱ्याचा उडता धिंगाणा सुरू झाला की, चांगल्या घरांची देखील छतं उडून जाणार असं वाटत होतं. रपरप् पाऊस पडूं लागला की, माणसं फसतील इतका रस्त्यावर चिखल होत होता अन् कधी उजाड पडलीच तर वाऱ्याची दांतखिळ बसून सूर्य पृथ्वीची लाही करून टाकणार असं वाटत होतं !

या लहरी वातावरणाची दुपारी तर अगदी पराकाष्ठा होई. दाराला वाळ्याचा जुनाट फाटका पडदा लावून ऑफिस–रूममध्ये बसलेल्या शेखसाहेबांना दुपार तर खायला उठली आहे असं वाटे. दुपारच काय, सबंध दिवस ते मोठ्या कष्टानं काढीत होते अन् रात्र तर त्यांना अतिशय जड जात होती ! कष्टम खात्यांत मध्यम दर्जाचे ते अधिकारी होते. पगार जाडा नसला तरी हुकमत चांगली होती. व्यापारी लोकांवर वजन बसत चालल्यामुळं गल्ला आणि कपडा यांत किफायत होत होती. उधारीचा कांहींच प्रश्न नव्हता. असला तरी ती मागण्याची कोणाची छाती नव्हती, अन् द्यायला तरी कोण तयार होता ?

सह्यांसाठी टेबलावर पडलेला कागदांचा ढिगारा अन् बाहेरची ती अप्रसन्न हवा, दोन्ही गोष्टी त्यांना नकोशा होत्या. मुंबईहून अथवा इतर ठिकाणाहून आलेल्या मालाच्या निकालासाठी, जवळ एखादा व्यापारी असला तर बिजक बुकावर नाखुषीनं सही करतां करतां शेखसाहेब म्हणायचे,

" उफ् ! काय गलतान् हवा पडली आहे आज ! अन् तुम्हीं ' बेपारी लोग ' आम्हांला कधीं सुखानं ' तनखा ' खाऊं द्याल तर शपथ ! "

वर्षांतला कोणताच ऋतु शेखसाहेबांना मानवत नाही, अशी तेथल्या स्टाफची अन् व्यापाऱ्यांची समजूत झाली होती. ऐन हिवाळ्यांत शेखसाहेब बदलून एकटेच ह्या गांवीं आले होते. अंगावर चांगला जाडजूड रग घेऊनहि हिवाच्या एखाद्या बारीक फवाऱ्यानं ते कुडकुडत अन् कुरकुरत. अशा भयंकर थंडींत गांवांतलीं माणसं कशी जगत असतील याचं त्यांना आश्चर्य वाटत होतं. गांवांत सिनेमा नव्हता, सडका अरुंद आणि गचाळ होत्या. एवढंच काय सबंध गांवाची रचनाच त्यांच्या मनाजोगती नव्हती ! हिवाळ्यानंतर उन्हाळा आला, शेरवानीच्या खिशांत ठेवलेल्या डोक आणि बूट पुसायच्या मळकट फडक्यानं वारा घेत अन् ' हुश ऽ ऽ ' करीत शेखसाहेब गुरकत होते,

" माशाल्ला ! काय कहरी ऊन हे ! अन् गांवांत पाण्याची तर ही बोंबाबोंब ! "

मधूनमधून वळवाच्या सरी येत. हवेंत थोडासा गारठा येई. पण पहिल्या एकदोन सरींनी ' रेकॉर्ड रूम'चं छत गळूं लागलं. झालं ! शेखसाहेब एकदम चवताळून म्हणाले,

" हं ऽ ! ही ' तामिरात 'ची ( पी. डब्ल्यू. डी. ) कामं अशीच गचाळ अन् गळकी ! सरकारी खजिन्यावर बार आहे नुसता ! यापेक्षां हवेंत बांधलेले बंगले तरी अधिक ' पुख्ता ' ( टिकाऊ ) होतील ! "

या वाक्यावर एखाद्याला हंसायची लहर आली तरी शेखसाहेब असा कांही गंभीर चेहरा करीत की, जणूं संपूर्ण सृष्टीच्या घटनेंत कुठं तरी बिघाड झाला आहे अन् तो शेखसाहेबांना निश्चित कळून चुकला आहे ! अशांतच जवळच्या खुजांतलं पाणी पितांना अन् खिशांतल्या जस्ती डब्बींतली पट्टी खातांना वाटला तर शेखसाहेबांना थोडा आराम वाटायचा !

या विचित्र हवेबद्दल ' ब्र ' न काढणारी एक व्यक्ति होती अन् ती म्हणजे लैला ! कस्टम खात्यांतच तिला बारा रुपये सरकारी तनखा मिळत होता. दोन जाणाऱ्या अन् दोन येणाऱ्या गाड्यांतील स्त्रीउतारूंचं सामान तपासण्याची तिची नित्याची कामगिरी होती. स्त्रीउतारू घेऊन येणारे टांगेवाले आपला टांगा नेमका

तिच्यापुढं आणून उभा करीत अन् तपासणीच्या कटकटींतून लवकर सुटका व्हावी म्हणून मोठ्या अजीजीन म्हणत,

" लैलाब्बी ! पहिले इधर देखो ना ! "

सामान तपासून झाल कीं, लैलादेखील मोठ्या झोकांत उत्तर देत होती,

" हां ! चलो ! बढाव ! "

आसपासच्या सर्वच बऱ्यावाईट गोष्टींशी चटकन् जुळतं घेता येईल अशी तिची वृत्ती होती. भर दुपारीं दुःसह उकाड्यांत तिला गाढ झोंप येत होती. धो धो पाऊस पडूं लागला की, आपल्या क्वॉर्टर्सच्या आंखूड आणि अरुंद व्हरांड्यांत खांबाला टेकून ती उभी राहात होती. पावसाचे टपोरे थेंब आत्म-समर्पणाच्या अनावर आवेगानं तिच्या अंगावर झेप घेत होते. जीवनधारांचा तो शीतल स्पर्श झाला कीं, पाण्यांत डुंबून पंख फडाडणाऱ्या पांखरासारखं, आपलं सपुलक अंग आनंदातिशयान जागच्या जागींच ती चळचळवीत होती. तो पाऊस होता, की एखाद्या प्रणयानिर्भर हृदयाच्या स्वयंप्रेरित संजीवक चुंबनांचं आवर्षण होतं ? ती कधी ड्यूटीवर असली की, वाऱ्यावर पळत जाणाऱ्या ढगांची गंमत पाहातांना तिला भान रहात नव्हतं. पदर उनाड वाऱ्यांत पोहत सुटत होता. तिच्या उचंबळून येणाऱ्या अन्तःकरणाची ती साक्ष होती. खाकी पोषाख घालून तिच्याजवळ उभे असलेले तिचे सहकारी क्वचित् निरुत्तरीय झालेल्या तिच्या ठिपक्याच्या फुगीर चोळीकड पाहात होते. ते तिच्या लक्षांत आलं कीं, ती आपला पदर सांवरीत होती अन् त्यांच्या मिस्किल दृष्टीचा अन् फिदीफिदी हंसण्याचा अर्थ उलगडतांच स्वतःशी म्हणत होती,

" कुत्रे आहेत मेले ! "

कादर, इमाम इत्यादिकांची माणसांत 'जिम्मा' करायची तिची तयारी नव्हती. सभोवतालच्या प्रत्येक वस्तूंकडे पाहाण्यांत तिच्या आणि त्यांच्या दृष्टीत केवढं अंतर होतं ! एक सामाजिक संकेत म्हणून तोंडावर बुरखा ओढून हातांत अन् पायांत दागिन्यांचं लगर वाहणाऱ्या एखाद्या तकतकीत रंगाच्या मारवाडणीकड अथवा डोळ्यांत भरणाऱ्या अशाच एखाद्या स्त्रीकडे ते अशा कांहीं नजरेन पाहात होते की, जणूं आसपास माणसं नसती तर त्यांनी त्या नवख्या स्त्रीला चटकन खाऊन टाकलं असतं ! उलट लैलाला वाटत होत, किती भाग्यवती या स्त्रिया आपल्या सहकाऱ्यांच्या कठोर दृष्टीचा या नाजुक सौंदर्यावर एखादा चरा तर

पडणार नाहीं ! या भयानंच की काय, अशा स्त्रियांना 'कुठून आला आहांत ?' असा एखादा जुजबी प्रश्न विचारून ती चटकन् सोडून देत होती.

लैलाचा धर्म अथवा संस्कृति कोणती हे ठरविणं कठीण होतं. मुस्लिम संस्कृतीच्या बाह्य आचारविचारांशी ज्यांचं लवकर जुळेल अशा सर्व धर्मांचे तिजवर संस्कार झाले असावे. तिचं नांव यावनी होतं; ती उर्दू सफाईनं बोलत होती; पण ब्राटगे आणि बहिष्कृत ज्या रीतीनं वागविले जातात त्याच पद्धतीनं बहुतेक ठळक धर्म तिला वागवीत आले होते. पण धर्मांशी अथवा संस्कृतीशी तिला काय करायचं होतं ? हिंदूचा सण आला की, सुग्रास भोजनानं सुस्मित होऊन नव्या वस्त्राभरणांत मिरवणाऱ्या हिंदु स्त्रीपुरुषांकडं ती औत्सुक्यानं पाहात होती. रमजान आणि बकरीदला जें करायला पाहिजे ते ती करीत होती. नाताळ आला की गांवांतल्या एकदोन ख्रिस्ती कुटुंबांकडं जाऊन राहावयाची तिची तयारी होती. गावांत एखादा उरूस भरला की, ठेवणीतलं झगमगीत तलम पातळ नेसून लोकांच्या गर्दीतून हिंडून येत होती, अन् रात्री सुखानं कांठोकांठ भरलेली स्वप्नं पाहात होती !

◆ ◆ ◆

तिच्या घराला चिकटून तिच्या सहकाऱ्यांचे क्वॉर्टर्स होते. ती निरुद आणि निष्प्रभ खुराडी सालंकृत संसारी जीवनानं ओतप्रोत भरलेली होतीं. घरांत मुलं गलबलत होतीं, गृहिणींच्या बांगड्या किणकिणत होत्या. या सौंदर्याला कर्त्या पुरुषांच्या अस्तित्वानं पूर्णता आली होती. शेजारच्या संसाराचा लैलाला हेवा वाटत होता. अंगावर मुलंबाळं वागवणाऱ्या त्या बायकांचं भाग्य तिला हुरहुरवीत होतं. गर्भारपणांत तर एखाद्या विश्वजननीच्या उदात्त सौंदर्यानं त्या झळकत आहेत असं तिला वाटे. एखादी माता, मुखावर काळं रुंद वर्तुळ पडलेला आपला भारावलेला स्तन मांडीवरल्या मुलाच्या मुखांत देतांना दिसली की, क्षणभर मुग्ध होऊन ती पाहात राही. सांसारिक स्वप्नं अन् सांसारिक आकांक्षा यांत प्रत्येक स्त्री तिला गढलेली दिसत होती. सामसूम झाल्यावर शेजारच्या घरांतली मिय्याबिबीची कुजबूज ऐकूं आली कीं, एकाकी अंथरुणावर पडलेल्या लैलाचं ऊर जोरजोरानं उडावं ! रात्रीं एकमेकांच्या कुशींत बिलगून निजणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या प्रचंड गराड्यांत तिला मात्र तिचा मज्नून कुठंच दिसत नव्हता.

तो जवळ येत नव्हता. तिची प्रेमयाचना करीत नव्हता. विरहाच्या रात्रीं अकास्मित येऊन तिला दिलासा द्यावयाची त्याची तयारी नव्हती. निदान एकदां तरी त्यानं तिच्याकडं डोळे भरून पाहायला पाहिजे होतं. काय, तिच्या उरांत मोडलेल्या कांट्याची त्याला कल्पना नव्हती? आपलं रिकामं अन् धडधडतं ऊर घेऊन विशाल व निष्प्रकाश अंतराळांत उबदार श्वसनाची ती चाहूल घेत होती !

तिचा काल्पनिक मज्जूनच काय पण तिच्या आसपासची माणसं तिच्याकड चांगल्या दृष्टीनं पाहायला तयार नव्हती. ती अतिशय कुरूप होती अन् तिचा एक डोळा जगावर कायमचा मिटलेला होता. योग्य सांथीवांचून दुसऱ्या डोळ्याची तशीच व्याकुळ अवस्था दिसत होती. अप्रतिम सुंदर स्त्रिया ज्यानं निर्माण केल्या त्या विधात्याजवळ, लैलाला घडवितांना चांगल्या रंगाचे कटोरे काय उपडे पडले होते, की त्याच्या डोळ्यापुढं अंधारी आली होती? उजाड घरांत खंत करीत बसलेल्या जवाहिऱ्यासारखं तिचं कुरूप यौवन !—पोशाखादि बाह्य प्रसाधनं करूनहि लोकांच्या नजरा खेंचून घेण्याचं सामर्थ्य तिच्यांत नव्हतं !

ती वयांत आली त्या वेळी इस्माईल नांवाच्या एका शाळा खात्यांतल्या चपराशावर तिचें प्रेम जडलं. त्याची मिठी तिला सुखावह वाटूं लागली. त्याच्या-बरोबर ती गांवांत फिरूं लागली; त्याची वाट पाहूं लागली अन् तो नेईल त्या मार्गानं ती जाऊं लागली. शादीच्या आणाभाका होतात न होतात तोंच इस्माईलची दुसऱ्या मुलीशीं शादी ठरली. लैलानं जाब विचारतांच तिला झिडकारून तो म्हणाला,

" मी खानदानी माणूस आहें ! तुझ्यासारख्या बाटगी (?) शीं लग्न करायला मला कांहीं जातकूळ आहे कीं नाही ? अन् अशी ' बदसूरत बला ' घेऊन मी करूं तरी काय ? "

बदसूरत बला ! लैलाला हा आघात मर्मांतक वाटला. ती खूप रडली अन् लौकरच ' डॅनियल् ' नांवाच्या एका खिश्चन माणसाशी तिचं सूत जुळलं. तो बेफाम ' पीत ' होता, अन् तिजवर आपलं मनस्वी प्रेम आहे असं दर्शवीत असल्यामुळं लैलाला धन्य वाटत होतं ! तो पिऊन आला कीं कधीं कधीं त्याचा मार खायला ती कचरत नव्हती. उलट एखाद्या दक्ष गृहिणीसारखी रात्रभर त्याची काळजी घेत होती. येशू खिस्त अथवा तिचीं विशिष्ट (?) धर्मबंधनं त्यांच्या विवाहाआड येणं शक्य नव्हतं ! तो अतिशय कर्जबाजारी आहे याची तिला

काळजी नव्हती; पण अखेर, तो आपल्या एका म्हाताऱ्या हपीसराकडं तिला पोंचवणार असं कळतांच तिच्यांतलं नीतिमान् स्त्रीत्व एकदम जागं झालं. तिनं तें घर आणि गाव सोडलं अन् आतां कस्टम खात्यांत ती नोकरी करूं लागली.

या गांवी आल्यावर कादर तिला आवडूं लागला. त्याची शादी झाली असली तरी जगांत एका पुरुषाला दोन बायका नसतात असं थोडंच आहे ! अन् असे संसार काय सुखी होत नाहींत ? दर सहामाहीप्रमाणं गाडीच्या वेळां बदलल्या. सकाळच्या तीनच्या गाडीसाठी लैलाला अन् तिच्या सहकाऱ्यांना ऑफिसच्या व्हरांड्यांत येऊन झोंपणं भाग पडूं लागलं. कादरला लौकर झोप येत नव्हती. तो एकामागून एक विड्या फुंकीत होता अन् पत्र्यावर पत्रा घासावा तशा विचित्र आवाजांत गझल गात होता,

'खिजाने आकर चमन को बरबाद कर दिया ऽऽ!'
(शिशिरानं माझी सारी बाग उध्वस्त करून टाकली!)

गाडीच्या अशा भलत्याच वेळां ठेवल्याबद्दल रेल्वे कंपनीला तो शिव्यांचा अहेर करीत होता अन् पुढच्या जन्मांत अशी त्रासदायक नोकरी आपण करणार नाहीं, असं निश्चयाच्या स्वरांत स्वतःशीच म्हणत होता. डोळे मिटले तरी तो आपल्याकडं प्रेमाकुल दृष्टीनं पाहात आहे, अन् आपल्या स्पर्शातुर श्यामल देहावरून त्याचा हात लाडिकपणांत फिरतो आहे असं लैलाला उगीचच्या उगीच वाटत होतं. तो खरोखरच तिच्याजवळ आला तेव्हां प्रथम स्वतःच्या डोळ्यांवर तिचा विश्वास बसेना. रात्रींच्या गडद अंधारानं तिच्या कुरूपतेची लज्जा राखली ! गारठलेल्या फर्शीवर असतांनाच त्याच्या खाकी ड्रेसच्या जाड पितळी गुंड्या तिला रुतत होत्या. तरी तृप्तीची विलक्षण बधिरता चढत चाललेल्या तिच्या देहाला त्याचं कांहीच वाटत नव्हतं ! पण रात्री ज्यानं प्रेमभरानं तिला कवटाळलं होतं, तो कादर सकाळीं तिजकडे पाहायला तयार नव्हता ! ती आपलेपणानं जवळ जाऊन बोलूं लागतांच तो एकदम खेंकसला,

"चल, दूर हट साली ! दलिंदर कहींकी !. . .सैतान !" तिच्या आत्मसमर्पणाची त्यानं ही किंमत केली होती ! अन् मोठा विजयाचा आव आणून आपल्या सहकाऱ्यांच्या कानांत कांहींसं बोलत होता. संयोगकालची कादरची ती आतुरता अन् आतांचा त्याचा तिरस्कार—तिच्या अन्तःकरणाचा नुसता दाह होऊन

गेला होता! तो जवळ येऊन इतर सहकाऱ्यांदेखत तिची कांहीं चेष्टा करणार असं दिसतांच क्रोधातिशयानं ती म्हणाली होती,

" चल्, कुतरड्या!"

◆ ◆ ◆

शेखसाहेब आले त्याच्या दुसऱ्या का तिसऱ्या दिवशीं त्यांनीं तिजकडं निरखून पाहिलं. त्यांचे केंस पिकत चालले होते अन् आयुष्याच्या महापुराच्या खुणा गालावर उठत चालल्या होत्या. पण वयस्कांच्या दृष्टींत जो उदार सहानुभाव दिसतो तो त्यांच्या दृष्टींत तिला दिसून येऊं लागला. जणूं असुंदरांतहि त्यांना अनेक सौंदर्यें सांठलेलीं दिसत होतीं! त्यांचा चिडखोर स्वभाव लैलापुढं नरमाई धारण करूं लागला. त्यांचं पाहात राहणं तिला आवडूं लागलं. ते केव्हां आणि कोणत्या वेळी पाहातील याचा नियम नाहीं, म्हणून ती कपड्यांची निगा घेऊं लागली व नेहमी त्यांच्या डोळ्यांपुढून सरकण्याची खटपट करूं लागली. हळू-हळूं चमत्कारहि असे होऊं लागले की, लैलानंच भरलेल्या खुजांतलं पाणी शेखसाहेबांना गोड आणि गार वाटूं लागलं. तिनंच त्यांच्या पट्टयांची डबी भरून द्यावी असा नियम होऊन बसला. येतां येतां बाजारहाट तिच्याकडं आला. बाजारच्या दिवशीं हातांत सौद्याची बुटी घेऊन अन् पातळाचा खूप लांब पदर काढून ती बाजारांत जाऊं लागली. शेखसाहेबांसाठीं गोस्त, मिरची, आद्रक, पियाज अन् लसूण इत्यादींची खरेदी अतिशय किफायतीनं होऊं लागली. उरलेले पैसे शेखसाहेबांना ती परत करूं लागली अन् शेखसाहेब खूष आहेत असं दिसतांच मनाशी नवनव्या कल्पना रचूं लागली!

एकदां ती नटूनथटून बाहेर पडली असतां कादर तिला म्हणाला,

" क्यूं! बडी बंठनके जा रही हो! शादी आहे कीं काय? पण सांभाळ! म्हातारा..... "

" चूप्! शादी नाही तर निका असेल! तूं कोण विचारणार?"

अन् मग तिच्या चालण्यांत कमालीची ऐट येऊं लागली. जणूं खरोखरच शेखसाहेबांनी तिला मागणी घातली होती. शेखसाहेब तिच्या पगारवाढीसाठीं वरच्या हपीसाला पुनः पुनः लिहूं लागले. पगाराचा दिवस आला कीं मुद्दाम लैलाला हांक मारून, " तनखा चाहती हो ना?" असं विचारूं लागले. ती

फ. का. २

आली कीं, आपल्या पुढ्यांत तिचं ‘ पे–बिल ’ ठेवून शाईनं भरविलेला तिचा अंगठा त्यावर हवा त्या ठिकाणीं घेऊन तो बराच वेळ धरून ठेवूं लागले; अन् तें सारं लैलाला अतिशय सुखावह वाटूं लागलं !

एकदां असाच दणकेबाज पाऊस आला. कचेरी अन् क्वॉर्टर्स गळूं लागलीं. अकस्मात् लैलाच्या घराची पाठभिंत कोसळली. आधीच तामिरात खात्यावर संतापणारे शेखसाहेब लैलाचं घर पडल्यावर तर अधिकच संतापले; पण ‘मौत’च्या जबड्यांतून लैला वांचली, याचं त्यांनीं समाधान व्यक्त केलं. लैलाला त्यांनीं आपल्या घरांत झोंपण्यासाठीं बोलावलं अन् पावसांत भिजलेल्या मातीचा मस्त वास वाहून आणणाऱ्या मंद गारव्यांत एकमेकांच्या वक्षाचा त्यांनी आश्रय केला !

उंची नरम अंथरूण यापूर्वी तिच्या देहाला लागलं नव्हतं. एखाद्या ऐश्वर्यशाली राजघराण्यांतच जिच्या अन्तःशक्तींचा विकास झाला असता, ती केवळ कुरूपतेमुळं कामोत्सुकांच्या क्षणैक तृप्तीचा अन् नंतर चिरंतन तिरस्काराचा विषय झाली होती ! जीवनाधार म्हणून तिनं ज्यांच्यावर निस्सीम प्रेम करण्याची तयारी दाखविली होती, ते भुकेच्या वेळी वाटेल तो पदार्थ जवळ करणारे कुत्रेच नव्हते तर काय ? पण शेखसाहेब—

तिला त्यांच्या प्रेमांत सरलता वाटली. तिचं अन्तःकरण त्यांनीं ओळखलं. प्रणयानुनयाच्या उत्कटावस्थेंतदेखील शेखसाहेब तिला म्हणत, “ बडी खूबसूरत हो लैला तुम ! ”

खूबसूरत ! आपण सुंदर नसतांनाहि त्यांनीं आपल्या कुरूपतेची स्तुति करावी याचं तिला किंचित् आश्चर्य वाटलं; पण ज्या आवाजांत हे लाघवी शब्द उच्चारले गेले होते, त्यावरून तिची कुरूपता त्यांना बोंचत नव्हती हे तर अगदी सिद्धच झालं होतं, अन् हें कळून लैलाचा आनंद नुसता दुथडी होत होता !

लैला आज रुसून आपल्या खोलींत झोंपली होती. दाराची कडी केव्हां वाजते अन् शेखसाहेब आपली याचना करण्यासाठीं केव्हां येतात, याकडंच तिचं सारं लक्ष लागलं होतं ! कांहीं दिवसांपूर्वी ती अशीच रुसून बसली होती अन् शेखसाहेबांनीं येऊन तिचा रुसवा काढला होता. उत्कट प्रेमाशिवाय या गोष्टी काय संभवनीय होत्या ? ते येणार, तिची मनधरणी करणार, ‘ हें काय बरं असं

लैला, ' असं मोठ्या गोड आवाजांत ते म्हणणार, अन् नंतर ती हंसत हंसत जाणार, हें अगदी ठरून गेलं होतं. आजवर त्यांनीं तिचे शब्द फुलासारखे झेलले होते. केवळ तिची इच्छा, म्हणून घरांतल्या बुढ्ढया भटाऱ्याला नोकरीवरून दूर करायला त्यांनीं कमी केलं नव्हतं. बारा वाजले; दोन वाजले, सकाळची तीनची गाडी देखील तिनं पाहिली नाही. सकाळ झाली, तेव्हां जास्त वेळ ताणून धरून आपण फार मोठी चूक केली, असं तिला वाटलं. अन् शेवटीं आहे तरी काय हे अजमावण्यासाठी ती शेखसाहेबांच्या घरांत आली.

घरांत मुलाबाळांची ' ये–जा ' तिनं पाहिली. काढून टाकलेला तो बुड्ढा भटारी चमत्कारिक अन् मोठ्या कुत्सित नजरेनं तिजकडं पाहात आंत निघून गेला. जवळच्या खोलींत शेखसाहेब गंभीर चर्या करून बसले होते. तिची चाहूल लागूनहि ते आज तिच्याकडे पाहावयास तयार नव्हते. जावं अन् त्यांच्या गळ्याला मिठी मारून ' रागावलांत ? ' असं त्यांना विचारावं, अस तिला वाटल. ती त्यांच्या खोलीत शिरणार इतक्यांत तो बुढ्ढा भटारी अन् एक प्रौढ स्त्री तिथं आलीं. लैलाकडं पाहून ती एकदम चवताळून म्हणाली,

" ए बदचलन, माझ्या संसारावर आजवर निखारे ठेवलेस ते पुरे नाही का झाले ? मेल्या पुरुषांनीं तर लाजाच सोडल्या; पण निदान तूं तरी स्वतःची ' इस्मत ' ( अब्रू ) सांभाळायला हवी होतीस ! चल हो बाहेर ! पुन्हां या घरांत कदम ठेवलास तर नाक छाटून घेईन ! "

शेखसाहेबांचा शादीचा जनाना होता तो ! लैलानं तशा अवस्थेंत शेखसाहेबां-कडं पाहिलं. त्यांची दांतखिळ बसली होती कीं कान बधिर झाले होते ? लैलाबद्दल त्यांना काय काहीच वाटत नव्हतं ? एका रात्रींत साऱ्या गोष्टींचा त्यांना विसर पडला होता ? नाजूक हृदयाच्या, लीलेनं चिंधड्या करणाऱ्या माणसाची क्रूरता त्यांच्या आतांच्या गांभीर्यात नव्हती !

तिच्या एकाच उघड्या, विस्फारलेल्या डोळ्यांत क्रोधाचा वन्ही इतक्या जोरानं उफाळला कीं, शेखसाहेबांना जणूं ती भस्म करून टाकणार होती ! अखेर पातळाचा पदर खूप जोरानं कुस्करीत ती बाहेर पडली. तिच्या थरथरत्या ओठावरून त्वेषानें शब्द उमटले,

" कुतरडा मेला ! " ◆ ◆ ◆

# तीन संसार

**मध्यम** वस्तीच्या शहराच्या मानानं त्या घराचं भाडं थोडं जास्तच होतं. घरानं पावसाळे बरेच पाहिले असावे. वरचा मजला काळापुढं केव्हांच नमला होता, अन् खालच्या मजल्यांतल्या बिऱ्हाडांना चौदा तासांची रात्र अन् दहा तासांचा दिवस अनुभवावा लागत होता ! या अंधाऱ्या घरांतील एका उदासीन संसाराचे सूत्रधार दिवसभर बाहेर असत. तेथल्या ' ॲग्रिकल्चरल् फॉर्म'वर ते कामगार होते. काळ्या मातींत झिजून त्यांच्या तारुण्याचा तजेला केव्हांच कोळपून निघाला होता. मेहनतीच्या मानानं मिळकत कमी; अन् खर्च मात्र भलता !

फार्मवरून परततांना पैशाच्या टंचाईशिवाय दुसरा विचार त्यांना स्पर्शून जात नसे. पगारांत लहानसं इंक्रिमेंट वाहून आणणारं नवं वर्ष तरी थोडं सुखांत जाईल, अशी त्यांची कल्पना ! पण मधल्या मुलाचा मुदतीज्वर संपतो न संपतो तोंच वडील मुलीला मलेरियानं पछाडलं. चांगला दणकट दिसणारा तिसरा मुलगा खोकल्यांत ' पडणार ' असं डॉक्टरनं नक्की सांगूनहि अखेर तो जगला ! पण त्यासाठी केवढी झीज सोसावी लागली ! अशांतच सौभाग्यवतीचं बाळंतपण आलं. अन् आतां..........

संकटं, कुटुंबियांचे आजार आणि बाळंतपणं कधीं सांगून येतात ?

या भयानंच कीं काय मड्गार्ड्स्, ब्रेक आणि घंटी नसलेला सायकलचा खटारा त्यांनी भिंतीला अतिशय जपून उभा केला. वाहून नेण्याचं अन् परत

आणण्याचं काम त्या जुनाट दुचाकीनं आजवर बिनबोभाट केलं होतं, हेच मोठे उपकार झाले होते !

त्यांनीं, यंत्र आणि मनुष्यांतला एक महत्त्वाचा भेद फार दिवसांनंतर कळून आल्यासारखी, गंभीर चर्या केली अन् घरांतलं स्थिरस्थावर आहे की नाहीं हें अजमावण्यासाठीं माजघरांत डोकावलं.

नुकतीच तापांतून उठलेली मुलगी चुलीपुढं बसली होती. इतर मुलांचा खाण्यापिण्यासाठीं गिल्ला चालला होता. माजघराच्या दुसऱ्या एका कोपऱ्यांतून प्रौढ आवाजांतलं कण्हणं ऐकूं येत होतं अन् आतांशा हे रोजचंच असा, रोजच्या सारखाच विचार करून कामगारसाहेबांनीं आपली खोली गांठली होती.

दहा साडेदहाला माजघरांतल्या आंथरुणांवरून त्यांची ज्वरपीडित पत्नी उठली. बाळंतपणानें तिचं शरीर खचून चाललं होतं. झोक सांभाळवत नव्हते. पलीकडं जागं होऊन रडत असलेल्या मुलाला तिनं कसंबसं पाणी पाजलं. तोंच पाळण्यांतल्या मुलानं आपल्या चिरक्या आवाजानं ती खोली निनादून टाकली.

त्या लहानग्याला गप करण्याचा तिजजवळ कांही उपाय राहिला नव्हता. तिचं शुष्क शरीर जीवनदानासाठीं असमर्थ झाल होतं. माहेराहून या नव्या मुलासह आल्याला धड तीनचार महिनेहि लोटले नव्हते तोंच तिला ओकाऱ्या सुरू झाल्या होत्या. एखाद्या दुष्ट शक्तीने आयुष्यभर तिचा पाठलाग करावयाचा ठरवला होता कीं काय ?

त्या रडक्या मुलाला मांडीवर घेऊन आपल्या किडक्या शरीराचा शेवट करण्यासाठी ती ईश्वराची मनोमन प्रार्थना करीत होती.

◆ ◆ ◆

त्या अंधाऱ्या घरासमोर थोड्याशा अंतरावर एक सुंदर बंगला होता. बंगल्याचं आवार विविध फुलझाडांनी सुप्रसन्न होतं. आसपास घरांची मुळींच गर्दी नव्हती. बंगल्यांतहि कधीं गोंगाट चाललेला ऐकूं येत नव्हता. या सुंदर बंगल्याला सुभूषित करणारं वास्तुदेवतेचं एकमेव विलोभनीय चिन्ह म्हणजे, केव्हां बागेंत तर केव्हां गॅलरींत दिसणारी बंगल्याची किंचित् स्थूल, तरुण आणि सुंदर मालकीण !

आतां रात्रीचे दहा साडेदहा झाले होते तरी उंची आंथरुणावर तिची चुळबूळ चालू होती. शेजारचा पलंग महिना महिना रिकामा पाहाण्याची तिनं आपल्या डोळ्यांना संवय लावली होती. कधी डोळा लागलाच तर एखाद्या विचित्र स्वप्नानं ती जागी होत होती. स्वप्नांत तिला पैशाच्या राशींच्या राशी दिसत ! त्या राशींकडं तिचे पति मोठ्या अभिमानानं पाहात आहेत असं आढळे ! मग एकदम त्या राशीतून आग भडकूं लागे आणि, ती तत्काळ जागी होई !

जवळच्या रिकाम्या पलंगानंतर ती छताकड पाहूं लागली. छतानंतर भिंती-वरची चित्रं तिच्या पुढं आली. समोरच्या एका चित्रांत खूप झाडी दाखविली होती. झाडीतून निघालेल्या सशाच्या पाठीमागं एक सोल्जर बंदूक घेऊन धांवतांना दिसत होता. निष्पाप जिवाची पारध केल्याचं दाखविणारं ते विलक्षण चित्र झोपतांना हटकून आपल्या डोळ्यापुढ यावं, याचं तिला आश्चर्य वाटलं. तिच्या मऊ शय्येत काटे फुलले. ती उठली अन् खिडकीतून बाहेर पाहूं लागली.

अंधाराचं आतां फिकट चांदणं झालं होत. जणूं अनंत आकाशाच्या शय्येवर झोपलेली तमोदेवता मातृत्वाच्या कल्पनेन स्वप्नांत हसत होती.

इतक्यांत समोरच्या घरांतल्या लहान मुलाचं रडणं तिला ऐकूं आलं. त्या मुलाची रुग्णजर्जर माता मुलांना नेहमीं कंटाळलेली असायची हे तिला माहीत होतं. अन् ती मुलांना त्रासून जावी याचं तिला नवल वाटत होतं ! त्या मुलाचं अस्पष्ट रडणं ऐकून तिच्या हृदयांत मधुर संवेदन उठलं ! आईच्या हृदयाला चळचळविणारं अन् खळबळविणारं ते रडणं अधिक जवळून ऐकूं यावं म्हणून ती व्हरांड्यांत आली.

◆ ◆ ◆

व्हरांड्याच्या पायथ्याशीं कुणी तरी झोपलेलं तिला दिसलं. किंचित् भय आणि आश्चर्य वाटून तिनं विद्युत्दीप प्रकाशित केला आणि पाहिलं, तों काय ?......

दिवसा त्यांच्या दारापुढं भिकेसाठीं अर्धा अर्धा तास धरणं धरणारी हट्टी भिकारीण आपल्या बेवारशी परिवारासह, वर आकाश आणि खाली पृथ्वी अशा अत्यंत विशाल राजवाड्यांत झोंप घेत होती ! काठी आणि कटोरा उशाशीं पडला होता. फाटक्या पटकुराचं आंथरुण आणि पांघरुण करून तिनं आपली दोन्ही

मोठी मुलं निजविलीं होतीं अन् तान्हं मूल पुढ्यांत घेतलं होतं. झोंपेंतहि ते पीत होतं की काय नकळे! एखाद्या यशोदेने एखाद्या श्रीकृष्णाला अत्यंत प्रेमभरानं जणूं वक्षाशीं लावलं होतं. अन् भोवतालचं अस्पष्ट चांदण म्हणजे कृष्णाच्या मुखावरील जीवनधारांचे ओहळ वाटत होते.

अंधाऱ्या घरांत अथवा, एका काठी आणि कटोऱ्याच्या आधारावर परमेश्वरानं अशी अमोल जीवनसंपदा उधळावी, याचं त्या बंगल्याच्या मालकिणीला वाईट वाटलं! ईश्वर मनुष्य असता तरच माणसाची दुःखं त्याला कळली असतीं असा विचार करून अखेर ती आंत परतली. ◆ ◆ ◆

# नि:संग

नेहमीं हास्यविनोद करणारी, संभावित दिसणाऱ्या मास्तरणीचा दांभिकपणा उघड करणारी, सामाजिक संकेतच अनाचार कसे वाढवितात हें सावेश पटविणारी, आपल्या चष्मा घालण्याच्या संवयीचं विचित्र पण विनोदपूर्ण समर्थन करणारी, वर्तुणुकीच्या बाबतीत एकदोन पावलं पुढंच टाकण्यासाठीं न कचरणारी, क्षुल्लक कारणावरून अतिशय आनंदी होणारी तर कधीं अकारण उदास होऊन बसणारी, अन् आपली यौवनपूर्ण देहलता अनेक परीनं नटविण्याची हौस बाळगणारी, खेळकर लीला, म्हणजे जीवनोन्मादानं अखंड हंसणारी कळीच वाटली मला !......

एका रेल्वे नसलेल्या गांवाहून नांदेडला माझी बदली झाली, म्हणून मला आनंद झाला होता. नव्यानंच हेडमिस्ट्रेसचा 'चान्स' मिळाला म्हणून मी खुषींत होतें; अन् तशांत हाताखालच्या मास्तरणींत लीलेसारखी प्रेमळ मैत्रीण आढळली म्हणून माझा आनंद दुणावला होता. पुढं पुढं ही मैत्री इतकी दाट झाली कीं, आपल्यांतील लहान-मोठेपणाचे कृत्रिम भेद विलयाला जाऊन परस्परांशीं आम्हीं अतिशय जिव्हाळ्यानं वागत होतों. एवढंच नव्हे तर शरीरांतलं अंतर देखील नाहींसं व्हावं म्हणून कैक रात्री आम्हीं शेजारी झोंपून काढल्या होत्या.

लीलेचं लावण्य अनुपम होतं ! धनाप्रमाणं लावण्यधनाचं वैपुल्य देखील माणसाला बेछुट करीत असतं कीं काय नकळे. पण लीला विधवा होती ! अन् या नाजुक पुष्पाचं स्वैरोन्मीलन आणखी अनेक गोष्टींनीं अडविलं होतं ! कोकिळांचं कूजन, दंवांनीं भिजलेल्या गुलाबाच्या पाकळ्या, सुगंधी श्वसनांतली धुंद करणारी

माधुरी, गुलाबी थंडींतला नाजुक उबारा, अन् कानांतल्या कुजबुजीचा कांटेरी थरका, या साऱ्या गोष्टी लीलेला स्वप्नवत् होत्या. यौवनाचं ऐश्वर्य तिला केव्हां कुणीकडे झुकवील म्हणून तिच्या आईला अन् मामाला सारखी धास्ती वाटत होती. म्हणून एखाद्या भोगलालस माणसालाहि विरक्तीकडं झुकाविणारं लीलेचं घरांतलं धार्मिक वर्तन अन् बाहेरचीं समवयस्क मैत्रिणीतलीं तिची उत्तान भाषणं, दोन्हीहि गोष्टी अतिशय आश्चर्याच्या वाटत होत्या !

लागोपाठ दोनतीन दिवसांची कसली सुट्टी आली होती. ही सुट्टी माझ्याच घरी राहून काढण्याचा आमचा बेत ठरला होता. पण त्यासाठीं लीलेच्या आईसमोर एक नाटक करावं लागलं ! मीं लीलेला मजकडं येऊन राहण्याचा आग्रह करायचा, अमक्या पोथीचं पारायण करण्याचं लीलेनं निमित्त करायचं, अन् मग, ' जाईनास का, एवढ्या आग्रहानं बोलावते आहे तर ती !' असं तिच्या आईनं म्हणायचं, हे अगदीं ठरल्यासारखंच झालं होतं !

घरी येतांच एकदम तिनं माझ्या गळ्याला मिठी मारली. लागोपाठ पांचसहा चुंबनं घेतली. पदर खसुकन् ओढून मला पलंगावर बसवलं. अन् लागली मग खो खो हंसायला ! मनाच्या विलक्षण सुखावस्थेत असतांना माणूस ज्या ज्या लीला करतो त्या साऱ्या तिनं केल्या.

' लीले, शोभतं का तुला हे ?'.........

' अग यांत शोभण्यासारखं किंवा न शोभण्यासारखं आहेच तरी काय ? कमल, किती सुंदर दिसते आहेस तूं !.अहाहा, काय गालांची शोभा ! इश्श्–असं लाजतेस काय ? कुणी बघतं आहे की काय आपल्याला ? सामाजिक शिस्त किंवा मर्यादा पाळण्याचं हें स्थळ नाही, किंवा काळहि नाहीं ! प्रेमाच्या राज्यांत अन् रात्रींत कसला आला आहे शिस्तीचा संबंध !'......असं म्हणून तिनं साऱ्या चेष्टितांची पुनरावृत्ति केली ! भोजनोत्तर मी पलंगावर अग टाकलं. विडे अन् वेलदोडे घेऊन लीला आंत आली. एक माझ्या अन् दुसरा विडा स्वतःच्या तोंडांत कोंबून ती माझ्या शेजारींच निजली. अन् स्वतःची रंगलेली जीभ माझ्या गालाला लावीत म्हणाली—

' बघ ना माझी जीभ कशी रंगली आहे ती !'......

' हो तर ! अन् ती आतां फार सैलहि सुटणार असं वाटतं ! पड आपली उगीच. पत्ते खेळूंया का ?'

'दोघींत काय खेळायचं ?'......

'कां, ती अनुसया येईल ना इतक्यांत !'

'—छे ! ती कुठली यायला. सुटी पाहून तिचे यजमान आले आहेत आज. दोनतीन रात्री तिला आतां जागून काढाव्या लागतील !'

'मग जवळ का ठेवीत नाही तिला तो ?'......

'नौकरी आहे ना ! हिची नोकरी सुटली तर त्याच्या एकट्याच्या नौकरीत मोठ्या कुटुंबाचा खर्च भागेल कसा ? तो केव्हांहि येतो अन् आपला हक्क गाजवून जातो ! खरंच, विवाहिता मिळवित्या झाल्या तरी पुरुषांचं दास्यत्व कांही त्यांना टाळतां येत नाहीं !'

अनुसयेच्या खाजगी आयुष्यावर अशा रीतीनं शेवट झाल्यावर चमचमीत जेवणानं चढलेल्या सुस्तीत झोप केव्हां आली हें मला कळल नाही. एक दीडच्या सुमारास मी जागी होऊन पाहाते तो लीला माझ्या शेजारी नाही! दहाबारा मिनिटं मी तशीच थांबलें. बाहेरचं दार मला अर्धवट उघडलेलं दिसल. जवळची खिडकी उघडून मी पाहिलं तों, लीला ट्रेलिसच्या जाळीतून बाहेरच्या अंधारांतल्या अस्पष्ट आकृतीशी कांहीतरी कुजबुजत उभी होती ! तिला माझी चाहूल लागली असावी. घाईनंच ती परत वळली अन् पुन्हां माझ्या शेजारीं येऊन निजली !

मध्य रात्रींच्या या चोरट्या कुजबुजीचा अर्थ विचारून तिला तिच्या परिस्थितीची जाणीव करून द्यावी, अन् चार उपदेशाच्या गोष्टी सांगाव्या असं मला वाटलं ! पण लगेच, या लुब्ध जिवाचा स्वप्नभंग करणं चांगलं नाही, असं वाटून मी गप बसलें !

◆ ◆ ◆

माझ्या टपालांतल्या एका पाकिटाचं हृद्गत उघडून पाहातांना तर मला आश्चर्याचा धक्काच बसला. अपरिचिताचा फोटो अन् अनोळखी स्वाक्षरीचं गुलाबी पत्र माझ्या पत्त्यावर चुकून तर आलं नसेल ना, असं वाटून मी पाकिटावरला पत्ता पाहिला; तों तें सारं गुलाबी प्रकरण लीलेच्या नांवाचं होतं. तें माझ्या नजरे-खाली ( c/o ) यावं अशी तिनं व्यवस्था केली होती कीं काय नकळे ! एखाद्याच्या खाजगी रहस्याला नकळत हात घालणं जाणत्या मैत्रीला शोभण्यासारखं नव्हतं,

म्हणून मी ते पाकीट पूर्ववत् बंद करून लीलेच्या घरीं गेले. फोटोंतल्या तरुणाचं हास्य मीं पाहिलं होतं. एखाद्या अभागिनीची रात्र उजळण्याचा आत्मविश्वास त्यांत होता. फोटोचा संबंध शक्य तो लीलेनंच प्रगट करावा, असं मला वाटत होतं. ती खिन्न आणि विचारमग्न होऊन बसली होती. केस विस्कटलेले होते. वस्त्राबद्दल तेवढी तत्परता नव्हती. आळसावलेल्या वृत्तीचा हा निष्काळजीपणा नव्हता! बंदिस्त यक्षाच्या विरहार्त शय्यासखीची ती असहायता होती!

'असेल कुणाचं तरी!' असं दर्शवून तिनं माझ्या हातांतलं पत्र घेतलं, अन् त्याबद्दल अधिक चौकसपणा न दाखवितां मी परतले.

पण कोणत्या दुष्ट मुहूर्तावर तो फोटो आला होता कोण जाणे! ते सबंध पाकीट तिच्या मामाच्या हाती लागलं. फोटोचे अन् पत्राचे तुकडे तुकडे झाले. मामांनीं रुद्रावतार धारण केला. खडतर नशिबाची, लहानपणापासून पाळलेली कारटी, अशी गुण उधळणारी निघेल याची म्हणे त्यांना कल्पना नव्हती! तोंडाला काळं लागणार म्हणून आईन गंगेत उडी टाकण्याचा बेत कायम केला. अन् जिन्याहून पडली या सबबीखाली, तिच्या नाजूक अंगाला मलमपट्या बांधण्यासाठीं दवाखान्यांत आणलं.

दोन दिवस लीलेला अजिबात शुद्ध नव्हती. गेल्या पांचसहा महिन्यांतली आमची मैत्री मला आठवली. मैत्रीचे सारे पाश झुगारून ती आतां कायमची निघून जाणार, या कल्पनेनं मी अतिशय अस्वस्थ झाले. वयानं वांकलेल्या माना न पाहातां मृत्यूनं तारुण्याचा पाठलाग करावा? नशिबाप्रमाणं मृत्यू देखील आंधळा असतो काय? स्वप्नांतहि सौख्य ज्यांना चाखायला मिळाले नाही, अशी लीलेसारखी 'आकाशपुष्पं' कोणत्या दैवताच्या पूजेसाठी असतात? ही विशाल धरित्री अशा सुकुमार फुलांना जन्म देते तरी कशाला? तीं अहेतुकपणें सुकून आणि चुरगळून गेल्यावर त्यांना उराशी धरण्यांत तरी तिला काय वाटत असावं?

◆ ◆ ◆

लीला बरी झाली, पण घरांतली तिजवरील बंधनं अतिशय कडक होऊं लागलीं. डोकं दुखायचं निमित्त करून एकदां अकस्मात ती शाळेंतून लवकर निघून गेली. त्या दिवशीची हवाहि तितकी चांगली नसल्यामुळं मी देखील लवकर शाळे-बाहेर पडलें. मी घरीं आलें तो दार आंतून बंद होतं. मोलकरणीचा पत्ता नव्हता.

कडी खूप जोरांत खडाडल्यावर दार उघडलं गेलं. अन् दारांत लीलेची घाबरट चर्या दिसली. तिच्या घाबरण्याचं कारण विचारलं तरी ती कांहींच बोलेना, म्हणून मीं तिला खुर्चीवर बसवलं. घरी पुन्हां कांहीं विशेष प्रकार घडला कीं काय म्हणून विचारलं. माझ्या चेहऱ्याचं एकवार नीट परीक्षण केल्यासारखं करून लीला म्हणाली :

'कमल, तुझ्या घराचा मी चमत्कारिक फायदा घेतें आहें म्हणून रागावूं नकोस. माझा प्रियकर आज अकस्मात आला आहे अन् त्याला बसवलं आहे मी पलीकडच्या खोलींत ! दुराचरण, व्याभिचार असे अनेक विचार तुझ्या मनांत येत असतील, अन् मजबद्दल वाटत असलेला जिव्हाळा तुझ्या मनांतून नाहीसा होईल. माझं माझ्या प्रियकरावर प्रेम आहेच ! ते केवळ शरीरधर्मापुरतंच नाहीं तर वासनांच्याहि पलीकडचं त्यांत कांही तरी आहे. अन् हें देखील लगेच सांगून टाकते, कीं ओळख झाल्यापासून आजची काय ती आमची निवांतपणाची भेट ! आतां वासनांचा कल्लोळ इतका वाढला आहे कीं, विरोधाची केवढीहि लाट उसळली तरी मला त्याची पर्वा नाही. मग ते सामाजिक निर्बंध अन् त्यांना झुगारल्यामुळं सोसावा लागणार छळ, यांची मला भीति कां वाटणार ? तुला तरी माझं वर्तन गर्हणीय वाटणार नाहीं खास ! कमा, अशी चकित होऊन पाहूं नकोस ! प्रणयपथाच्या प्रवासांतला आज आमचा महोत्सव आहे ! जीवनांतला मधुर आनंद पहिल्यांदाच लुटणार आहे मी ! इथंच थांब अर्धा तास ! येतेंच मी लगेच ! जाशील तर, माझ्या गळ्याची शपथ आहे तुला !..."

एखाद्या मिश्रमधुर चंचल प्रकृतीच्या रागस्वरांच्या आरोहावरोहांचीं आवर्तनं कानावर पडावी, तसं तिचं तें सावेश भाषण वाटलं मला. अन् तिच्या चटकन् निघून जाण्यानं मी क्षणभर स्तंभित होऊन गेलें ! ◆ ◆ ◆

# समजा, पाकिस्तान झालं—

अहो समजा काय? हिंदुस्थानच्या राजकारणांत 'अल्स्टर' होऊन बसलेलं पाकिस्तान अखेर एकदांचं मान्यता पावलं! 'पाकिस्तान झिंदाबाद'च्या इस्लामियांनी उंच आरोळ्या ठोकल्या. त्या अरबस्तानांतून तार्तर लोकांच्या कानांवर पडल्या कीं आसामांतून थेट चिनी मुसलमानांपर्यंत जाऊन आदळल्या, कुणाला माहीत! वर्तमानपत्रांतून मोठमोठे विविधार्थवाही मथळे झळकले. पाकिस्तानचा प्रश्न ज्यांनीं सोडवून घेतला अशा पुढाऱ्यांचा सामुदायिक जयघोष झाला. आणि पाकिस्तान झालं हे प्रदर्शित करणारे उद्‌घोष आणि निदर्शनाचे सर्व प्रकार चहूंकडे होऊं लागले!

हे असं झालेलं इतरांना कदाचित् समजलं नसेल. पण N. W. R. मधून प्रवास करीत असलेल्या मनोहर कळशीकरला कळून यायला वेळ लागला नाही.

प्रणयप्रधान कादंबऱ्यांचे नायक नेहमी असतात त्याच दुसऱ्या वर्गात तो होता. 'बर्मा–शेल' कपनीचा इन्स्पेक्टिंग ऑफिसर दुसऱ्या वर्गातून नाहीं तर काय मालगाडीच्या डब्यांतून प्रवास करील? बरं, प्रवास करायचा तो आगगाडीच्या दुसऱ्या वर्गातून नाहीं तर पुष्पक विमानांतून केला तरी दगदग म्हणून जी कांही असते ती होणारच. तशांत मनोहरचे वीस पचवीस दिवस गेले ते केवढ्या धांवपळीत आणि दगदगीत! ठिकाठिकाणच्या एजंटांचे 'लाइट डिझेल्' तेलाचे, 'शेल ग्रीज'चे आणि 'मोबिल'चे हिशेब तपासायचे. गेल्या सालच्या 'कोटा'ची नीट विभागणी झाली किंवा नाहीं हें बारकाईनं पाहायचं. कंपनीचा प्रतिनिधी म्हणून P. W. खात्याच्या अधिकाऱ्यांच्या भेटी घ्यावयाच्या. त्यांच्या मागणीचा आणि भेटीचा सारांश पीलखान्याच्या आपल्या मद्रासी अधिकाऱ्याला

कळवायचा. हें सारं एका ठिकाणीं राहून ? मुळीच नाहीं. आज इथं, उद्यां तिथं, अशी त्याला सारखी फिरकी लागली होती. तशांत ती पंजाबी हवा ! दिवसा ऊन तर असं कडक पडायचं, की त्यानं आणि त्यांत तळपणाऱ्या तेथल्या अफाट रुक्षतेच्या अंतर्दाहानं जणुं पलीकडचा हिमालय खात्रीनं वितळून जाणार असं वाटायचं. रात्रीं तर काय विचारतां ! कमीत कमी उष्णांशाचं मान गोठून निःशेष होऊन जाईल, एवढी थंडी पडायची. हे पंजाबी हवेचे चढउतार मनोहर पहिल्यांदांच अनुभवीत होता असं नव्हे. पण प्रेमिकांचं अन् विरही-जनांचं हवामानशास्त्रच निराळं असतं, त्याला कोण काय करणार ? प्रेमिकांच्या राज्यांत नेहमी वसंतऋतु असतो. विरहीजनांच्या पावसाळ्याला कांही मुदत आणि मर्यादा असतात असं थोडंच आहे ? एका महिन्यापूर्वी जी भूमि चंद्र-लोकापेक्षांहि रम्य वाटत होती, तीच आतां एकाएकी रुक्ष दिसूं लागली होती. ऊन आणि गारठा दर वर्षी असावीं तेवढ्याच प्रमाणांत होती. पण त्यांत कुठ कांहीं तरी कमीजास्त झालं होतं, यांत शंका नव्हती. दिवसा करावयाची ती कामं उरकली की पीलखान्याच्या आपल्या घरापासून आपण दूर आहों; तिथं जें घर आहे तें झुबेदा आणि अविनाश यांवांचून रिकामं आहे; झुबेदा आपल्या नातलगांना भेटण्यासाठी गंगावतीला गेली आहे, असे विचार करून रात्र काढण्यांत काय अर्थ होता ? आणि त्या तशा विचारांत रात्र तरी सरत होती का ?

अशा अवस्थेत भारतीय राजकारणाचा प्रवाह मध्यप्रांतांतल्या कुठल्याशा एका तेजस्वी बिंदूतून निघून उत्तरेचीं हिमशिखरं ओलांडीत पलीकडे गडप झाला, की दक्षिणेच्या त्या टोंकापर्यंत जाऊन समुद्रांत मिसळला, की बंगालच्या उपसागरांत पुन्हां नव्यानं उसळी घेऊन खैबर खिंडीवाटे वाळवंटांत पसार झाला, हें पाहाण्यापुरत स्वास्थ्य नव्हतं.

अखेर एकदांचा मनोहरचा दौरा सपला. पीलखान्याकडे जाणारी गाडी त्यानं गांठली. कय्यूमखान नांवाच्या त्याच्या नोकरानं बर्थवर होल्डॉल पसरतांच मनोहरनं अंग टाकलं. मग सकाळी जग पुन्हां जोरानं हलत असल्याची त्याला जाणीव झाली. पंजाबी हेलांतली सहप्रवाशांची संभाषण ऐकूं येऊ लागलीं. एक विचारीत होता,

" लाहोर किती दूर आहे ? "

दुसऱ्या कोटीबाजानं उत्तर केलं होतं,

" अजि जनाब, लाहोर तो बहोत दूर है !"

त्यांतला अर्थ ओळखूं येतांच, ' खूब ' ' खूब ! ' असं मोठ्यानं हंसत पहिला म्हणाला होता.

' अलघट, ' ' मुजफ्फर ' अशीं स्टेशनं सरकली. मग चाकांना खीळ पडूं लागतांच ' मुनवराबाद ' अशी हांक आपल्या कानीं येणार, ही मनोहरची कल्पना. मुनवराबादनंतर एकदोन लहानशी स्टेशनं येऊन गेलीं की नंतर पीलखाना ! पण मुनवराबाद येऊनहि त्या नांवाचा पुकार मनोहरला ऐकूं आला नाहीं. ' पाकिस्तान झिंदाबाद ' हा सामुदायिक जयघोष मात्र त्याच्या कानीं आला. कदाचित् एखादा मुस्लिम पुढारी मुनवराबादला उतरत असावा, नाहीं तर लाहोरला निघाला असावा, त्याचं स्वागत होत असावं, नाहीं तर त्याला निरोप दिला जात असावा. तोंच त्याच्या डब्याचं दार काठीनं वाजवावं तसं कुणी तरी जोरानं खडाडलं. आणि लगेच स्वच्छ उर्दूत अधिकारवाणी झाली :

" चला, सर्वजण खालीं उतरा ! "

रेल्वे कंपनीचे नोकर शिस्त आणि सभ्यता विसरले होते की काय ? दुसऱ्या वर्गातल्या उतारूंशीं कसं वागायचं हे त्यांना माहीत नव्हतं ?

मनोहरनं तोंडावरचं पांघरूण सरकवून पाहिलं. उतारू भराभर खाली उतरत होते. मनोहरला अखेर त्यांचाच मार्ग धरावा लागला.

खाली प्लॅटफॉर्मवर ' Sentinels of Pakistan ' म्हणून ओळखलं जाणारं एक सशस्त्र पथक उभं होतं. अर्धचंद्राची निशाणं जिकडे तिकडे फडकत होतीं. N. W. R. ही गाडीवरची पाटी काढली जाऊन, त्या ठिकाणी ' पाकिस्तान रेल्वे ' अशी पाटी झळकत होती.

मग ' पाकिस्तान की पहिली सहेर ' ( प्रभात ) अशा पालुपदाची एक कविता पथकानं सावेश गायिली. उतारूंना एका रांगेत उभं राहण्यास सांगितलं. ह्या सर्व गोष्टींचा अर्थ उघड होता. पाकिस्तानला मान्यता मिळाली होती ! रांगेत उभे केलेल्या उतारूंपैकी एकेकाला बोलावून कुणी तरी एक अधिकारी त्याचं नांव गांव, व्यवसाय, जात कूल इत्यादींची नोंद घेत होता. ' फजलूर रहमान, ' ' चरण-सिंग ' अशीं नांवं आली की त्यांना गाडीत जाऊन बसण्याची परवानगी दिली जात होती. आणि इतरांना मात्र निवडून काढल्यासारखं वेगळीकडे उभं केलं जात होत.

मनोहरच्या शेजारच्या एका हिंदु व्यापाऱ्यानं पाकिस्तानच्या रक्षकाला उर्दूत विचारलें, " ही चौकशी आणि हा निवाडा कशासाठीं ? आम्हां हिंदूंना पाकिस्तान-बाहेर काढणार आहां ?" पण गणवेशांतल्या रक्षकाला उर्दू येत नसावंसं दिसलं. तो कच्छी होता कीं बंगाली होता, कुणाला माहीत ! तोच प्रश्न इंग्रजींत टाकल्यावर मग उत्तर आलं :

" तें मला माहीत नाहीं."

" शीख जमातीबद्दल कांही निश्चित धोरण आहे की काय तुमचं ? त्यांना खुशाल तुम्ही गाडीत चढूं देतां आहां म्हणून विचारलं ! "

" तें स्पष्ट केलंच पाहिजे असं मला वाटत नाही !"

" पाकिस्तान झालं म्हणजे अखेर झालंय तरी काय ? "

" जे होतं आहे ते आपण पाहातच आहां ! "

या तुटक आणि तिरसट उत्तरावरून कांहीं बोध होत नव्हता. खरंच, जनतेच्या नेत्यांनी हें काय केलं होतं कीं त्यांची पाकिस्तानकडे रवानगी होणार होती ? ह्या निवडण्याच्या प्रकारांत कांहीं तरी भयंकर असलं पाहिजे असं मनोहरला वाटलं. लगेच त्याच्या मनांत आलं, चौकशीची पाळी येतांच आपण एखादं खोटं इस्लामी नांव सांगून मोकळं व्हावं आणि बँकेंतली ठेव घेऊन लपत छपत महाराष्ट्रांत घुसून आपलं गंगावती गांव गांठावं ! पण चौकशीची वेळ आली, तेव्हां त्याचा नौकर कय्यूम, पथकाचा गणवेश घालून मिस्किलपणानें हंसत उभा असलेला दिसला. कांहीं बनवाबनवी करणं मनोहरला शक्य वाटल नाही. विचारलेल्या प्रश्नांना त्यानं सरळ उत्तरं दिलीं, आणि इतर हिंदूंबरोबर त्याला मुनवराबादच्या एका लहानशा बंगल्यांत नजरकैदेंत ठेवलं !

◆ ◆ ◆

बेमुदत कैदेत ठेवलेल्या माणसासाठी सरकारनं कांहीं तरी मुदत ठरविलेली असते. पण, मुनवराबादची ही स्थानबद्धता केव्हां संपणार याचा कुणालाच अंदाज लागत नव्हता. एक म्हणत होता, ' अहो वर्ध्याला तार करा '; दुसऱ्यानं मद्रासचं नांव पसंत केलं होतं; तिसरा म्हणाला, ' नमस्कार असो तुमच्या त्या वर्ध्याला आणि मद्रासला. त्यांचेच प्रताप आपणांस भोंवताहेत हे ! दोन जमातींचा समझौता करण्यासाठीं मद्रासहून कांही कलमं निघाली आणि शेगांवनं

त्याला मान्यता दिली. 'त्यांना आपल्या नजरकैदेची कांहीं कल्पना असेल?' चवथ्यानं त्या वादविवादांत भाग न घेतां महाराष्ट्रांतल्या एका केंद्रस्थानाकडे रवाना करण्यासाठीं एका कागदावर तारेचा मजकूर तयार केला. पण दारावरचा रक्षक त्याला बाहेर जाऊं द्यावयाला तयार नव्हता, किंवा पोस्टाकडे तार पोंचवायलाहि कबूल नव्हता. तेथून सुटका होणार किंवा नाहीं, होणार असल्यास ती केव्हां आणि कुणाच्या परवानगीनं होणार, याचाहि त्या रक्षकाकडून कांही पत्ता लागत नव्हता!

मग एका संध्याकाळीं स्टेशनवर ज्यानं नोंद घेतली होती तो उंच धिप्पाड पंजाबी—पाकिस्तानचा बहुधा तो कोणी अधिकारी असावा—एकदम मनोहर पुढं येऊन उभा राहिला आणि म्हणाला,

"आदाब अर्ज है जनाब को! खैरियत?"

मनोहर मनांतून खूप चिडला होता. उत्तरादाखल त्यानं म्हटलं,

"पाकिस्तानमध्यें हिंदूंची खैरियत विचारली जाते हें आश्चर्य आहे!"

"असे रागावूं नका! पाकिस्तानच्या पवित्रभूमींत यापुढं रागद्वेष मुळींच नसावेत म्हणून तर मी आलों आहें. आमचे सांस्कृतिक विशेष सुरक्षित ठेवण्यासाठीं आणि संवर्धित करण्यासाठीं, आमची राष्ट्रीय भावना वाढीला लावण्यासाठीं आम्हाला ही पाकभूमि वेगळी करून घ्यावी लागली. आतां यापुढील कार्य करण्यांत तुम्ही आम्हाला मदत केली पाहिजे!..."

"अरे वा! पाकिस्तानची खैरात जबरीनं लुबाडून पुन्हां आमची मदत हवीच का? खानसाहेब! तुमची मदत मागण्याची तऱ्हा मात्र विलक्षण दिसते आहे! छातीवर पिस्तुल रोखायचं आणि कळवळ्यानं म्हणायचं, 'आम्हांला मदत हवी आहे.' तसाच हा प्रकार!"

"तुमचा कांहीं तरी गैरसमज झाल्यासारखा दिसतो आहे. तुम्हा मंडळींना नीट संरक्षण मिळावं म्हणूनच सशस्त्र पहाऱ्याखालीं असं वेगळं ठेवावं लागलं!"

"ठीक, आभारी आहें मी. असं वेगळं आणखी किती दिवस ठेवणार?"

"आमचा इस्लाम भेदभाव जाणत नाहीं, मनोहरपंत! तुमचे राधाकृष्णन् आणि रॉय काय म्हणतात आमच्या इस्लामबद्दल? तुम्हांला वेगळं ठेवण्याची हौस का आहे आम्हांला! वेगळं न. राहण्याची प्रत्येक हिंदूनं उद्यां अशीच

प्रतिज्ञा केली तर केवढं मोठं कार्य होईल ! साऱ्या आशिया खंडाचा धर्म आणि संस्कृति एक होऊन जातील ! ”

“ म्हणजे ? मला धर्म बदलावा लागेल ? ”

“ असे आश्चर्यचकित होऊं नका ! तीनचार वर्षांपासून या पवित्र भूमींतलं अन्नोदक घेऊन तुम्हीं जगत आलां आहां. पीलखान्याला तुमची मिळकत आहे थोडीशी. तुमच्यावर आणि तुमच्या मिळकतीवर पाकिस्तानचा हक्क नाही ? ”

“ मिळकत जप्त करा हवी तर माझी ! ”

“ वल्ला ! ( छे ! हें काय बोलणं ? ) असं जबरीनं आम्हाला कांहींच मिळवायचं नाहीं. एकदां पाकिस्तानला तुम्ही आपलं मानलं कीं आपणहून आपली संपत्ति आमच्या स्वाधीन कराल !. . . ! ”

“ खानसाहेब ! सक्तीनं तुम्ही आपला धर्म मजवर लादतां आहां ! ”

खानसाहेबानं उत्तराऐवजीं भरीव हास्य केलं. त्यामुळं खोलीच्या भिंतींनाहि क्षणभर हादरा बसला कीं काय नकळे ! खानबहादूर निघाले तेव्हां त्यांच्या पदक्षेपांचा आवाज मनोहरला बराच वेळ ऐकूं आला. जातांना मनोहरकडं पाहात त्यांनीं आपल्या मिशा पिळल्या होत्या, छद्मी स्मित केलं होतं आणि अशी कांहीं दृष्टि टाकली होती, की ‘ जणुं अमुक एक गोष्ट करण्यासाठी तुम्हीं तयार झालंच पाहिजे, नपेक्षां धडगत नाहीं ’–असं त्यांना सुचवायचं होतं !

◆ ◆ ◆

धर्मांतराचा प्रश्न खानसाहेबांनींच मनोहर पुढं पहिल्यांदा प्रगट केला होता असं म्हणतां येणार नाहीं. चार वर्षांपूर्वी गंगावती या महाराष्ट्रांतल्या एका सुप्रसिद्ध केंद्राच्या ब्राह्मणवाडीत एक खळबळ उडविणारी बातमी पसरली होती. नानासाहेब कळशीकर या सर्वश्रुत नागरिकाचा मुलगा मनोहर B. Sc. त पहिला आला होता. नानासाहेबांना न् त्यांच्या इतर स्नेह्यांना यामुळं आनंद झाला म्हणतां कीं काय ? ह्या बातमीनं खळबळ ती काय उडणार ? पण लगेच देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांची एक सभा झाली आणि नानासाहेबांनीं व्यासपीठावरून गर्जून सांगितलें, ‘ वर्णसंकाराला कारण होणाऱ्या माझ्या मुलाला मीं घराबाहेर काढलं आहे ! ’ आणि तें खरं होतं. कोणता कर्मठ ब्राह्मण मुस्लिम मुलींशी विवाह करूं निघालेल्या आपल्या मुलाला घरांत ठेवील ?

गंगावतीला ब्राह्मणवाडी होती तशी मुसलमानांचीहि एक लहान वसाहत होती. तेथल्या कॉलेजांतले विज्ञानाचे प्रोफेसर मौलवी अलीयावर बिलिग्रामी यांची मुलगी झुबेदा ही मनोहर कळशीकर नांवाच्या हिंदूशीं धर्मबाह्य संबंध ठेवते आहे ही बातमी त्यांनाहि मिळाली. जी फुटत नाहीं अथवा पसरत नाहीं, जी कळत नाहीं अथवा लागत नाहीं ती बातमी कसली ? पडद्याआड काय वाटेल ते होऊं शकेल; पण पडद्याआडच्या अशा अनेक बातम्या सहसा छपून राहणार नाहींत ! ब्राह्मणांनीं सभा भरवून निर्णय घेतला, त्याप्रमाणंच मुसलमानांनीं बैठकी भरवून कांहीं ठराव केले. लगेच त्या प्रेमसंबंधाला राजकीय स्वरूप येऊन दंगा होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. झुबेदाच्या भावाच्या मदतीनं त्या दोघांना महाराष्ट्राबाहेर पळतां आलं म्हणून रक्तपातापर्यंत चढलेलं खळबळीचं मान शांत झालं आणि बातम्यांचं लोण वर्तमानपत्रांपर्यंत जाऊन अखेर शिळं होऊन गेलं !

पीलखान्याला येऊन एक ब्राह्मण तरुण आणि एक मुस्लिम तरुणी, भटजी किंवा काजीकडून होणारा विवाहाचा कसलाच धार्मिक विधि न करतां एकत्र राहूं लागली. एकनिष्ठता ही काय चीज आहे याची जाणीव झाल्यावर धार्मिक विधींची आवश्यकता काय होती ? मिय्या बिबी राजी नसले तरच काजीनं मध्यस्ती करावी ! पहिले कांही दिवस व्यवसाय नसल्यामुळं कष्टांत गेले. मधून-मधून घरदार, आप्तस्वकीयांची आठवण होऊन प्रेमाची नशा उतरूं लागली. तशांत मनोहर आजारी पडला. झुबेदा घाबरली. येऊं नयेत ते वाईट विचार तिच्या मनांत येऊन गेले. विचारांचा भार तिच्या कोंवळ्या मनाला सहन होत नव्हता. तिनं एक सुरा मिळविला. मनोहर ग्लानीत असतांना तीनचार वेळां तिनं तो निरखून पाहिला. एखाद्याला वाटलं असतं ही आतां मनोहरचा खात्रीनं खून करणार ! ज्याच्यावर निस्सीम प्रेम केलं त्याचा खून ? छे ! तसा कांही प्रकार नव्हता. आजारांतून उठल्यावर मनोहरनं त्याची चौकशी केली तेव्हां झुबेदा म्हणाली होती,

" माझ्या मनाची दशा मी कशी वर्णन करून सांगूं ? तुझ्या आजारांत विलक्षण कल्पना मनांत येत होत्या. आत्मविनाश करून तुझ्यापूर्वीच माझी सुटका करून घ्यावी असं वाटत होतं ! "

मग स्थायिकता आणि स्थैर्य आल्यावर स्वास्थ्याचं अजीर्ण होऊं लागलं. त्यांतून मतस्वातंत्र्य आणि मतभिन्नतेचं वैचारिक प्राबल्य वाढूं लागलं. भाड्याच्या

घरांत वेगवेगळ्या मतांप्रमाणं दुरुस्ती होऊं लागली. घरांत धर्मभिन्नतेचा तट उभारला गेला. झुबेदाच्या खोलीवर पाकिस्तान नांव कोरलं गेलं आणि मनोहरची खोली अखंड हिंदुस्थानचं प्रतीक राहिली. पाकिस्तानच्या दारावर कमान ठेवली जाऊन इस्लामी शिल्पाला ( Saracenic Arch ) अवकाश दिला गेला. खोलींतलीं कपाटं उर्दू वाङ्मयानं भरून जाऊं लागलीं. खोलीच्या सजावटींत आणि सजावटीच्या वस्तूंत वेगळेपणा आणि वैशिष्ठ्य ठेवण्याची पराकाष्ठा दिसूं लागली. अखंड हिंदुस्थानांतली अंतर्गत व्यवस्था निराळी होती. सर्वच चांगल्या वस्तूंना तिथं अवकाश होता. समजणाऱ्या सर्वच भाषांतलीं निवडक पुस्तकं तिथं आढळत होतीं. मराठी मासिकांबरोबर लाहोरहून निघणाऱ्या उर्दू मासिकांचंहि तिथं स्वागत होत होतं. अखंड हिंदुस्थानांतून एखादे वेळीं प्रश्न होत असे,

" झुब्बी ! माझं तें मराठी पुस्तक आलंय् तिकडे ?"

पाकिस्तान उत्तर करीत होतं,

" हें पाकिस्तान आहे ! अरबी आणि फारशी भाषेच्या सहवासानं सुमधुर झालेल्या उर्दू भाषेंतील कित्येक अभिजात ग्रथ इथं असतांना तुमच्या अडाणी बेढब प्राकृताला कोण विचारतंय ?"

" आल लक्षांत ! पण हे पाकपरी, अखंड हिंदुस्थानांतलीच सपत्ति घेऊन तुला उर्दू वाङ्मय जमवितां आलं ना ! हिंदुस्थानच्या हवेवर श्वासोछ्वास करायचा आणि सीरिया–अरबस्थानांतली जुनी स्वप्नं उजळीत बसायचं ! काय म्हणावं ह्याला ? देशद्रोहाखेरीज याला दुसरं चांगलं नांव कोणतं ?"

" देशद्रोह नाहीं ! संस्कृतीचं रक्षण आहे !"

" समज, उद्यां पाकिस्तान झालं तर पैशासाठीं तुम्ही पाक काय करणार ? आंबेडकर तर म्हणतात, तुमच्या पाकिस्तानचं सारं उत्पन्न पडलं छत्तीस कोटी ! एवढ्यांत तुमचा खर्च भागणार कसा ?"

" पाकिस्तान मानून तर बघा एकदां !"

" आपल्या घरांतलंच उदाहरण घेऊं या आपण ! आम्हीं महिन्याकांठीं चांगला दीडशे दोनशें पगार आणायचा आणि तो तूं खिशांतून पार करायचा !"

" माझा हक्कच आहे तसा !"

" उद्यां प्रत्येक पाक 'उरलेल्या हिंदुस्थाना'च्या मिळकतीवर असाच हक्क सांगेल ! आणि तो हक्क आम्हीं न मानला तर ?"

" पाकिस्तान हातांत शस्त्र घेऊन उठेल ! "

" पाहू, पाहूं ! पाकिस्तानची ही सेविका हातांत शस्त्र धरल्यावर कशी दिसते ती ! " असं म्हणून मनोहर जवळ सरकत होता. मग शस्त्र आणि रक्तपाताच्या कल्पनांऐवजी जिकडे तिकडे गुलाबी झेंडे फडकत होते. पाकिस्तान अखंड हिंदुस्थानाच्या गळ्यांत हात घालून वृथा तोंड चुकविण्याचा प्रयत्न करीत होतं. मनोहर म्हणत होता,

" एवढ्या सुंदर पाकिस्तानला कोण मान्यता देणार नाही ? झुबेदा, तुला पाहिलं कीं, इस्लामी संस्कृतीच्या सर्व विशेषांचं एकदम मला दर्शन घडतं. तुझी ही उंच गौराकृति, तुझ्या चेहऱ्याची ही विशिष्ट ठेवण,...हे गालाचे घुमट, केशसंभारांतला हा निष्कलंक वदनचंद्र आणि खजुरीच्या झाडाची आठवण देणारं वेणींतलं तें हिरवं पान..."

◆ ◆ ◆

पुढं लौकरच पाकिस्तानला एक निसर्गरम्य अपघात झाला !

अविनाशच्या जन्मानं त्या दोन प्रान्तांतले प्रश्न तर आणखी बिकट झाले. नांवावर वादाची वादळं झालीं. अखेर 'अविनाश' हें नांव निश्चित होऊन 'बिलिग्रामी' हें आडनांव जोडण्यांत आलं. तो मोठा झाला तेव्हां वेगवेगळ्या भाषेचे त्याच्यावर संस्कार होऊं लागले. त्याला शिकविण्यासाठी एक काश्मिरी पंडित ठेवला गेला; तसाच फारशी जाणणारा एक मौलवीहि नेमला गेला.

अविनाश पाकिस्तानांत आला की त्याला फारशीत विचारलं जाऊं लागलं,

" इस्मे शुमा चीस्त ? " [ तुझं नांव काय ? ]

अविनाश तशाच झोकांत उत्तर देऊं लागला,

" नामे मन अविनाश अस्त ! " [ माझं नांव अविनाश आहे ! ]

हा मायलेकांचा सवाद आपल्या खोलींतून कुतूहलानं ऐकत असलेला मनोहर लगेच म्हणत होता,

" अरे नुसतं ' अविनाश ' नाहीं, ' अविनाश बिलिग्रामी ' म्हण ! "

अविनाश झुबेदाचा कीं मनोहरचा असा वादविवाद मग सुरू होई. झुबेदाच्या बाजूलाच अविनाशचं मत पडे. हें मनोहरला कसं सहन होणार ? तो म्हणत असे, " थांबा, तुमचं संख्याबल आणि एकी वाढीला लागताहेत, नाहीं का ? तुम्हांला

आतां फोडलं आणि झोडलं पाहिजे !" ... मग एखाद्या मुत्सद्द्याच्या आवेशांत दोघांमध्यें आपलं स्थान कायम करून तो त्यांना फोडीत होता, आणि झोडण्याचे सारे नाजूक कायदे, फतवे, आणि फलितें उपयोगांत आणीत होता !

धर्मांतराचा प्रश्न निघाला की, एखादे वेळी मनोहर म्हणत असे,

" झुबेदा ! आपल्या अविनाशसाठी तुला हिंदु व्हायला पाहिजे !"

" कां ? तूं हिंदु आहेस म्हणून ? पण माझा स्वार्थत्याग विचारांत घे ! घर-दार, आप्तेष्ट सर्व कांहीं तुझ्यासाठीं मी सोडलं ! माझ्यासाठीं म्हण किंवा अविनाश-साठी म्हण, तुलाच मुसलमान व्हायला पाहिजे आतां !"

पण धर्मांतराचा त्या वेळचा प्रश्न आजच्याइतका गंभीर नव्हता. एका जमातीनं धर्मांची जी बाह्य लक्षण मानलीं होतीं, जे नियम ठरविले होते, त्याविरुद्ध मनोहरचं वर्तन घडलं म्हणून, किंवा जमातीनं ते तसं घडल्याचं सिद्ध केल म्हणून, तो त्या जमातीपासून दूर येऊन राहिला होता इतकंच ! त्याचा प्रान्त, तेथली हवा, भूमि, त्याची भाषा, इतिहास यांना त्याच्या जीवनांत कांही तरी महत्त्व होतंच ! या सर्व गोष्टीनी घडविलेल्या त्याच्या पिंडावर सर्वस्वीं निराळे संस्कार, निराळी घडण व्हायची म्हणजे काय ? विचारांच्या लाटेसरसा मनोहर त्या अंधारांत खोलवर वाहात जाऊं लागला. एखाद्या नग्न, निर्भूषण माणसाकडं पाहावं त्याप्रमाणं प्रत्येक युगांतली माणसं त्याच्याकडे पाहूं लागली. भयानं मनोहरनं आपले डोळे घट्ट मिटून घेतले आणि 'झुबेदा' अशी एक आर्त हांक घालून तो निर्विकार होऊन गेला !...

◆ ◆ ◆

पाकिस्तानांतल्या घटनांची प्रतिक्रिया उरलेल्या हिंदुस्थानांतून होणं अशक्य नव्हतं ! 'गंगावती' गांवापुरतंच पाहा ना ! तेथल्या अल्पसंख्य मुसलमानांना ग्रामाध्यक्षांची परवानगी असल्याशिवाय गांवाबाहेर पडतां येत नव्हत. त्या दिवशी ग्रामाध्यक्षांच्या कचेरीच्या रोखानं एक रूपवती स्त्री आपल्या मुलाचा हात हातांत धरून चालली होती. मुलगा विचारीत होता,

" झुब्बी ! अपने पपा के तरफ हम जा रहे है ?" (आपण पपाकडेच चाललों आहों ना ?)

झुबेदानं त्याचा हात दाबला होता अन् म्हटलं होतं,

" हं ! उर्दूत बोलूं नकोस ! आपण हिंदूंच्या राज्यांत आहों ! उर्दू बोलतांना आपल्याला कुणी पकडलं तर नसती शिक्षा व्हायची ! "

कचेरीच्या पायऱ्या चढून अध्यक्षाच्या खोलींत तिनं प्रवेश केला. अध्यक्षांनीं चष्म्यावाटें तिच्याकडे पाहिलं न् तिला बसण्याची खूण केली. हातांतले कागद वाचून झाल्यावर त्यांनी विचारलं,

" काय काम आहे ? "

" कामं आहेत पुष्कळशी ! आपली न्यायबुद्धि अढळ असेल तरच तीं उघड करण्यांत अर्थ आहे ! "

" मला नाही वाटत मजकडून कांहीं अन्याय्य वर्तन घडलं असेल असं ! "

" नाहीं कस ? गंगावतीच्या आम्हां अल्पसंख्यांक मुसलमानांना खुशाल तुम्हीं हिंदु होण्याची सक्ति करीत आहां ! "

" काय करणार ? दोन हजार मैल लांब आणि अडीच हजार मैल रुंद अशा सलग अफाट प्रांताचा एक तुकडा आम्हीं वेगळा केला. तो करा असं तुमच्याच माणसांनी हट्ट धरला होता ना ? या सनातन भूमीची काय ही विटंबना ! उरलेला हिंदुस्थान तरी निदान आतां आम्हांला सांभाळायला पाहिजे. एथले मुसलमान पाकिस्तानची नवी आवृत्ती काढणार नाहीत कशावरून ? वायव्येकडे आणि पूर्वेकडे तुटकपणा आला तसा आणखी कुठं येणार नाही याची खात्री कोण देणार ? "

" आम्हां अल्पसंख्याकांच्या जीवनाचा अपहार करीत आहां तुम्हीं ! "

" अपहार नव्हे, पुनर्संस्कार म्हणा ! इकडच्या मुसलमानांनी स्वतःला मुसलमान न म्हणतां हिंदी म्हणावं असा आमचा आग्रह आहे ! ' हिंदी मुसलमान ' म्हणवून घेण्यांत जर तुम्हांला कांही कमीपणा वाटत नाहीं तर नुसतं ' हिंदी राष्ट्रीयत्व ' कायम ठेवण्यांत कसला हलकेपणा आहे ? "

" मला नाही पटत आपले विचार ! मला सरळ आमच्या पाकिस्तानांत जाण्याची परवानगी दिली पाहिजे तुम्ही ! "

" आपलं नांव ? "

" झुबेदा बिलिग्रामी ! "

अध्यक्षांनी घंटा वाजविली. तोंच खोलींत आलेल्या कारकुनाला त्यांनीं बिलिग्रामी या नांवासंबंधीची माहिती सांगणारीं सारी कागदपत्रे आणण्यास

सांगितलें. कागद आले तेव्हां सर्व माहितीचा सारांश काढलेल्या वरच्याच कागदावरून नजर फिरवून अध्यक्ष किंचित् हंसून म्हणाले,

" आमच्या नानासाहेब कळशीकरांच्या स्नुषा वाटतं तुम्ही ? आणि हा कोण ? मनोहरचा मुलगा अन् याला घेऊन तुम्ही पाकिस्तानांत जाणार ? तुम्ही जा पाहिजे तर; पण त्या मुलाला मात्र नाहीं नेतां येणार तुम्हाला ? "

" कां ? "

" किती झालं तरी तो हिंदुत्वाचा अंश आहे ! आम्ही एक वेळ पूर्ण हिंदुस्थान गमावून बसूं ! पण ही अमोल संपत्ति पाकिस्तानांत मुळीच जाऊं देणार नाही ! "

प्रश्न मोठा कठीण होता. हिंदुस्थानांत राहायचं तर धर्म बदलावा लागत होता, एका विधर्मियाबरोबर ती पत्नीत्वाच्या नात्यानं राहात होती; पण स्वत्व (?) सांभाळून ! मी मुस्लिम आहें अशीच भावना मनाशीं बाळगून ! पाकिस्तानच्या कडव्या प्रचारकांचे विविध आवाज तिच्या विभिन्नतेची तिला जाणीव करून देत होते. त्या विभिन्नतेशीं तद्रूप होण्यांतच जीवनाचं कल्याण होतं ! पण ते कल्याण साधायचं तर पोटच्या मुलाचा त्याग करावा लागणार होता ! छे ! काय हा हिंदूंचा जुलूम ! त्वेषाच्या अनावर झटक्यासरशी झुबेदा ताडकन् उभी राहिली आणि चवताळून ग्रामाध्यक्षांना म्हणाली,

" काय म्हणालांत ? माझ्या मुलाला तुम्ही अडवून ठेवणार ? सारं पाकिस्तान मी खडबडून जागं करीन ! प्रत्येक मुसलमानाला मी उंच आवाजांत हांक घालून सांगेन..."

◆ ◆ ◆

ती काय सांगणार होती कुणास ठाऊक ? ' मनोहर, ' ' मनोहर ' अशी एक जोराची हांक तिनें घातली; ती मात्र खरंच शब्दमय झाली. शेजारच्या पलंगावरचा मनोहर एकदम जागा झाला. त्यानं झुबेदाची हांक स्वप्नांत तर ऐकली नव्हती ! पण त्यानंहि तिला हांक घातली होती—ती स्वप्नांत की प्रत्यक्षांत ? दोघांनींहि सावध होऊन परस्परांकडे पाहिलं. पाकिस्तान झालं नव्हतं किंवा गंगावतीला ग्रामाध्यक्षांची कचेरीहि कायम झाली नव्हती. पृथ्वी फिरली नव्हती किंवा त्याचं स्थलांतरहि झालेलं नव्हतं !

माउन्ट प्लेझंटमध्यें महात्माजी आणि जीनासाहेबांचीं पाकिस्तानसंबंधीं बोलणीं चालल्याचें वर्तमानपत्रांतून येत होतं. पीलखान्याच्या घरांत तो विषय नवा नसला तरी या वाटाघाटींच्या बातम्यामुळं त्याला जोराची चालना मिळत होती. तशांत मनोहर आपल्या कामानिमित्त फिरतीवर निघणार होता, आणि झुबेदा अविनाशला घेऊन आपल्या नातलगांना भेटण्यासाठीं गंगावतीला जाणार होती. ‘ समजा, पाकिस्तान झालं तर ? ’ असा परस्परांपुढं प्रश्न ठेवून त्या संध्याकाळी नेहमीं-सारखा त्यांनी वादविवाद केला होता. त्या प्रश्नाचं उत्तर स्वप्नांत तरी मिळालं होतं किंवा नाही कोण जाणे !

मग सकाळच्या टपालानं जें वर्तमानपत्र आलं त्यांत माउन्ट प्लेझंटमधील बोलणी फिसकटल्याचं वृत्त प्रसिद्ध झालं. मनोहरनं झुबेदाला तें दाखविलं न् म्हटलं,

“ ही घटना माझ्या मनासारखीच झाली ! आमच्या विभिन्न संस्कृतींच्या रक्षणासाठी आम्हांला विलगता हवी आहे असं जे आवेशानं म्हणतात त्यावरून असं वाटतं कीं, संस्कृति, संस्कृति म्हणजे माणसांपेक्षां कांही तरी निराळी चीज आहे असा त्यांचा समज झालेला असावा !... आपलं परस्परांवर निस्सीम प्रेम आहे. अविनाशनं आपल्या प्रीतीची एकता साधली आहे. त्याला उत्तम माणूस करायचं असं आपलं समान ध्येय आहे. ह्या कल्पनांतूनच संस्कृति विकासली आहे, आणि ह्या कल्पनांच्या जोपासनेंतच तिचं संरक्षण होणार ! ... ”

इतक्यांत अविनाश धांवत आंत आला आणि त्याला शक्य तों आपण अगोदर उचलावं म्हणून त्या दोघांनीं एकदम पुढं धांव घेतली. ◆ ◆ ◆

# धर्म बुडत चालला आहे !

**कसलीशी** ईद आली होती. बकरे आणि कोंबड्यांना ह्या गोष्टीची वार्ता असणं शक्य नव्हतं. गांवांत मात्र एकच गडबड सुरू झाली होती. लखनौकडचे अत्तरविके येऊन अमीर–उमरावांकडं चकरा मारीत होते. दर्ग्यांच्या सजावटीला हातभार लावून धर्मकल्पना उत्तेजित राहावी असा सरकारी प्रयत्न दिसत होता. धर्मभावनेला आवाहन करीत फकीर–मुरशद गांवांतून फेऱ्या करीत होते. 'तानाशा' गांवांत कित्येक दिवसांपासून स्थाईक होता. फकिरी पेशा आणि फकिरी बाणा ! उठायला बसायला तशी मशिदीची धर्मशाळा (अशूरखाना) होती. धर्मार्थ होणारे खाने आपल्या उपस्थितीनं तो नेहमीं शोभवीत होता. लोकांची धार्मिक प्रवृत्ति अजमावून पाहाण्यासाठीं ईश्वरानंच त्याला भूतलावर पाठविलं असलं पाहिजे ! ईदच्या निमित्तानं 'बानाशा' त्याला येऊन मिळाला. अजमेरशरीफ-पासून दख्खनपर्यंत त्यानं प्रवास केला होता, त्यांत प्रवासाच्या दगदगीपेक्षां तिकीट तपासणाराचाच अधिक त्रास झाला होता. सरकारनं गाडी काढली होती हें ठीक होतं. पण गाडीतले नौकर फकीर–मुरशदांची प्रतिष्ठा ठेवीत नव्हते. तिकिटं तपासणाऱ्या शिपुरड्यानं बानाशाला दिसेल तिथं उतरायला लावावं ! जातीचा फकीर तें सहन करील हें शक्य नव्हतं. पण तानाशासारख्या सत्पुरुषाची भेट घ्यावी अशी तीव्र इच्छा होती म्हणून तो इतकं अंतर तोडून आला होता, अन् गाडीवाल्याकडून झालेला अपमान त्यानं गिळून टाकला होता !

तानाशानं त्याच्या भेटीचा आनंद व्यक्त केला आणि सहकार स्वीकारला.

गांवांत फेरी चालू असतां तानाशा बानाशाला मोठ्या अभिमानानं सांगूं लागला,– " नबाब कमालखानाचा जमाना होता. (नबाब पदवीबरोबर त्याला

‘ जंगबहादर ’ असाहि एक किताब होता. जिकडं तिकडं आबादानी होती. माणसं सुखासमाधानानं नांदत होतीं. फकीर–मुरशद आणि अमीर–उमराव ह्यांच्यांत भेदभाव नव्हता. एवढी शांतता असल्यावर लढाया कसल्या ? पण ‘ जंगबहादूर ’ हा किताब कांहीं जहागीरदारांना मुद्दाम देऊन ठेवला होता. कारण कुठं लढाऊ प्रवृत्ति बळावलीच तर झुंझार माणसं किताब लेवून दरबारांत असतात हें चटकन कळावं !) देवडीच्या प्रशस्त पटांगणांत गुलाब लहरून बहरून गेले होते. बुलबुलांचा आवाज ऐकूं येत होता. कठड्या कठड्यांत राघू मैनांचे पिंजरे लटकत होते. अत्तरांची कारंजीं थुइथुई उडत होतीं. कमालखान मुलखाचा विलासी ! नाजुक मिजासहि तसाच ! अन् लहरी तरी केवढा ! परांच्या गादीवर गुलाबाच्या पाकळ्या पसरून शयन करायचा ! इराणी कपोलांची शराब पिऊन चोवीस तास मस्त ! जरा कुठं हवेंत गारठा आला की, शेंसव्वाशे पऱ्यांच्या गराड्यांत तो हुसहुसत बसायचा ! एकदां, एक मैना बदसूर काढूं लागली; झालं, इथून तिथून सारेच पिंजरे त्यान रिकामे करायला सांगितले. अन् दुसऱ्या दिवशी राघु मैनांचे नवे जोड आणण्यासाठी चहूकडं माणसं पळविलीं !. . .तर अशा त्या कमालखानाच्या देवडीवर गुलबशा—तानाशाचा पडपंजा—आला अशी नुसतीं आंत वर्दी पोचायचा उशीर. कमालखान जनानखाल्यांत असला तरी तात्काळ सामोरा आलाच म्हणून समजावं ! ही इज्जत तर होती त्या काळीं फकीर-मुरशदांची ! . . . ”

बानाशाच्याहि कुळाला इतिहास होता आणि प्रतिष्ठेची परपरा होती.

‘ वली ’ चा दर्गा त्या काळांत केवढा प्रसिद्ध ! दक्षिणेच्या ह्या टोंकापासून उत्तरेच्या त्या टोंकापर्यंत त्याची ख्याती होती. ठिकठिकाणचीं भाविक माणसं उरुसाला येत होती. नवस होत होते. मिरवणुकी निघत होत्या. अमीर–उमराव खाने करीत होते. फकिरांचा त्या ठिकाणी कोण मानसन्मान ! केवढी आवभगत ! दर्ग्यावर देखरेख करायला बानाशाचा पंजा हीनाशा होता. मोठमोठ्या राजघराण्यांतल्या माणसापर्यंत त्याची पोंच ! हीनाशाचा नुसता निरोप आला हें एखाद्या उमरावाला कळलं की मोहरांची थैली घेऊन सांडणीस्वार निघालाच दर्ग्याकडं ! अन् आतां—

◆ ◆ ◆

आतां काय ?. . .

आतांचा एक अनुभव असा होता—

एका चांगल्या घरापुढं थांबून दोघांनीहि खड्या आवाजांत म्हटलं होतं—

" ईश्वर ! दात्याचं भलं कर ! "

ईश्वर दात्याची कसोटी पाहात अज्ञातांत स्तब्ध असावा. दाता मात्र दारांत आला अन् गंभीर चेहरा करून म्हणाला,

" मुरशद महाशय ! जरा फिरून या ! "

केवढे आदरवाही शब्द ! अर्थात् ' येऊं नका ' हाच त्यांतला अर्थ होता. अन् कांही पावलं पुढं गेल्यावर त्यांच्या कानावर शब्द आले होते,

" फकीर तरी काय बोकाळले आहेत ! आम्ही अमीर झालो ते जसे कांहीं ह्यांच्याचकरतां ! हं !... "

घरधनी उमरावांतले होते यांत शंका नव्हती. पण अमीरी टिकायची तर दुवा द्यावयाला फकीर तरी आवश्यक होते ना ! ज्यांतली एक दिडकी फकिराच्या कटोऱ्यांत पडत नाही तो पैसा काय जाळायचा होता ? कुणी तरी फारसी कवि म्हणत होता की, फकीर–मुरशदासाठी होणाराच काय तो पैशाचा खरा व्यय !... स्वतःला अमीर म्हणवीत होता लेकाचा ! परवां त्याच्यावर एक सरकारी किटाळ आलं होतं. चांगली हजार दीड हजाराला बूड बसली होती. हा कशाचा प्रभाव ?...... तोंच त्या घरमालकाचा मुलगा समोरून येतांना दिसला. तानाशानं बानाशाला डिवचलं न् म्हटलं,

" पाहा ही अमीराची अवलाद ! "

गुरूनं सांगितलं म्हणून बानाशा बारकाईनं पाहूं लागला. काय तो कपड्यांचा शोक ! करकरते नवे बूट ! पोकळ पैजामा ! काळी चमकदार शेरवानी. निळ्या मखमालीची टोपी ! तोंडांत पानाचा चोथा ! नुकतीच पेटविलेली सिगारेट, नीट जळेना म्हणून धड न पितांच त्यानं रागानं भिरकावली.

आह् !

एखादं नाजूक फूल फत्तरावर आदळल्यावरहि एखाद्या हळव्या मनाला बसणार नाहीं एवढा जबर धक्का बानशाला बसला असावा !

जवळजवळ पूर्ण सिगारेट त्यानं फेकून दिली होती. बानाशानं आणखी निरखून पाहिलं. हाय ! रस्त्याच्या कडेला ती धवलांग धूम्रगर्भा असहाय पडली

होती. क्षणभरच लुकलुकली आणि मग थंड! चैनखोरीतल्या बेपर्वाईवर ती रुसली होती कीं काय नकळे ! बानाशानं ती चटकन् उचलली न् तानाशाला दाखविली. कमींत कमी एक आण्याला दोन या भावांतला तरी तो माल असावा ! पण पूर्णपणें उपभोगिला देखील नव्हता ! एका अर्थी तेंहि बरंच झालं होतं. नानाविध पदार्थांच्या सतत सहवासानं ज्याच्या इंद्रियाची रसग्रहणाची शक्तीच अजिबात नष्ट झाली त्याला त्या अर्धदग्ध आशयाची काय चव कळणार ?

बानाशा त्या पदार्थाकडे फारच आपुलकीनं पाहातो आहे असं दिसतांच तानाशा म्हणाला,

" फेंक ते थोटुक ! फकीर मरेल, पण रस्त्यावरचा सडका उष्टा माल तोंडांत धरणार नाहीं ! "

" हं ! तुला वाटल कसं मीं तें तोंडांत धरीन म्हणून ? मी जातीचा फकीर आहें. प्रसंग आला तर त्या अमीराला गांठीन ! अन् म्हणेन, 'धर्मनष्टा ! फकीरांना द्यायला तुजजवळ दिडकी नसते. अन् तुझीं मुलं मात्र अशा भारी सिगारेटीवर भलता पैसा उधळतात. अल्लाच्या दरबारांत—'

सतापाच्या झटक्यानं बानाशाला धड बोलतां देखील आलं नाहीं.

आतां ज्या घरापुढं ते थांबणार होते तेथली एक स्त्री दाराला लावलेल्या पडद्याच्या छिद्रांतून समोरच्या खिडकीकडं पाहात होती. खिडकीत कुणीसा तरुण माणूस होता. दोघांच्या खाणाखुणा चालल्या होत्या. तो हंसत होता. त्याच्या अनामिक मागणीला आपले ओंठ जुळवून तिनं प्रत्युत्तर केलं होतं.

तें अधर्माचरण दुःसह होऊन तानाशानं एकदम मोठ्यानं हांक घातली,

" अल्लाह् ! "

बानाशांनं त्याच्या आवाजांत आपला आवाज मिसळला न् कटोरा जोरानं वाजवून पुढं केला.

ती युवती चपापली असावी. लगेच तिनं खाडकन् दार बंद करून जेवढा संताप व्यक्त करतां येईल तेवढा केला !

अधर्म, दुराचरण फैलावत चालली आहेत, हें पटविण्यासाठीं आणखी कुठं आंकडे गोळा करण्याची आवश्यकता नव्हती. अरेरे !

ते घर सोडल्यावर धर्माला कसं हिणकस स्वरूप येत चालल आहे हें तानाशा बानाशाला सांगूं लागला. पांच वेळां नमाज पडणारीं माणसं हाताच्या बोटावर

मोजतां येतील एवढीं उरलीं नव्हती. दानधर्म म्हणजे पाप अशी भावना बळावत चालली होती. जिकडं तिकडं काय चाललं होतं तें शब्दांत सांगण्याची जरूर काय होती—? नुकताच पाहिलेला देखावा विस्मृत झाला नव्हता. समोर आणखी एक दृश्य दिसत होतं. दृश्य एकच, फक्त स्थलांत बदल. पहिल्यांत घरांतून अन् पडद्याआडून संकेत चालले होते. दुसऱ्यांत रस्त्यावर भाषा सुरू होती. तीच अधर्म-प्रवणता! फकिरांची तरी निदान कांहीं लाजमर्यादा! तानाशानं त्या प्रकारावर एक सविरोध दृष्टिक्षेप टाकला अन् बानाशाला तेथून लवकर चालण्याची खूण केली.

मग बाजारांतल्या एका दुकानापुढे ते थांबले. दुकानदारानं नुकतीच प्रार्थना आटोपली होती. हा केवढा सुयोग, की प्रार्थना संपतांच परमेश्वराच्या सेवकांच दर्शन घडाव! दुकानदारानं पेटी उघडली. तानाशा अन् बानाशा प्रसन्न दिसूं लागले. पण काय, त्यांच्या कटोऱ्यांत अखेर एकेक आणाच पडला!

एवढं भारी दुकान! पैसा घरांत नुसता धूळ खात पडला असेल! तशांत ईदचे दिवस आलेले! अन् फाकिरांच्या कटोऱ्यांत काय, तर एक आणा!

तानाशा गंभीर होऊन म्हणाला!

"ईदचे दिवस आहेत, एका रुपयाशिवाय हा कटोरा चिल्लर खुर्द्यानं मी कलंकित करणार नाहीं!'

दुकानदार कांही तरी अपशब्द उच्चारणार असं दिसतांच तानाशानं एक आणा त्याच्या गादीवर फेंकला. तो अशा तोऱ्यांत कीं जणू—दिडकीसाठी मरमर करणारा तो फकीर नव्हता! ज्याच्या कटोऱ्यांत सम्राटांनी आपलीं साम्राज्यं ओतावी—दानं करावी, अशा प्रतिष्ठेची ती असामी होती! बानाशालाहि त्याचं अनुकरण करावं लागलं!

जिथं रहदारी फार नाही अशा एका रस्त्यावर ते आले. इतक्यांत बाजूच्या एका खोपटांतून एक लहान मुलगा धांवत आला आणि तानाशाला 'बाबा' 'बाबा' म्हणून बिलगला. तानाशानं त्याला उचललं न् कुरवाळलं. खोपटांतून लगेच एक नाजुक हांक आली. तानाशाचा नाइलाज झाला असावा. बानाशाला बरोबर घेऊन तो आंत शिरला. एका पडक्या घराच्या पाठभिंतीचा आसरा घेऊन तें झोपडं उभविलं होतं. शिंदीच्या पन्हळ्यांचा कूड होता. तशाच पद्धतीचं वर

छत. आंत फारसा पैसा नव्हता. एक चुलगट, दोनतीन गाडगी, रोगण उडून गेलेली एक उथळ बशी, गंजलेल्या पांढऱ्या वाट्या, कपड्याचं लहानसं बोचकं अन् सर्पणाच्या कांहीं काटक्या एवढा सरंजाम आंत होता. अन् ह्या साऱ्या सरंजामाला एक मालकीणहि होती तर!

बाहेर पडल्यावर तेथल्या प्रत्येक हालचालीचं न् कृतीचं समर्थन करण्याच्या हेतूनं तानाशा सांगूं लागला,

" ...बिचारी आंधळी ! बेदरशाचं नांव ऐकून माहीत असेल तुला ? नाहीं ! ठीक. पापी माणसांची नांव कानावरून जाऊं नयेत हें चांगलं. मुरशद म्हणवीत होता तो स्वतःला. धर्मभावनेचं नुसतं प्रदर्शन होतं तें ! ह्या आंधळीला प्रथम नाना तऱ्हेची त्यानं आमिषं दाखविलीं. शादीच्या आणाभाका केल्या. अन् अखेर अशा परिस्थितीत तो तिला सोडून गेला. आंधळीचं रूप पाहिलंस ना ! कशी देखणी आहे ! केवढी मिठ्ठास नम्र वाणी ! बेदरशाच्या अनुभवानं तिला फकीराबद्दल आदरभाव नव्हता. त्याच्यापासून दिवस गेलेले; डोळ्याना दिसत नाहीं; कुणी साहाय्याला नाही. काय करणार ती ? मला तिची दुरवस्था पाहावली नाही; मनोमन परमेश्वराला म्हटलं, 'देवा, सम्राज्ञीपद शोभवील असं जिचं रूप पण डोळ्यानं लाचार झालेल्या या स्त्रीला ज्यानं फसविलं त्याला शासन कर... आणि विपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठीं माझ्या हातांत सामर्थ्य ओत !' तेव्हांपासून आंधळीची भक्ति आहे माझ्यावर. मला पाहिल की मुलगा 'बाबा' म्हणतो. ईश्वराचं ते एक बालस्वरूप नाहीं काय ? बानाशा ! अनाथ अपंगासाठीं आपण जें जें करतों त्याची 'अखेरच्या दिवशीं' दखल घेतली जाते..."

"अल्लाह !" अशी एक सगद्गद हांक घालून तानाशा निर्वचन झाला. बानाशाच्या मनांत कोणत्या विचारांचीं वर्तुळं उठत होतीं हे कळायला कांहीं मार्ग नव्हता. तो नुसता तानाशाकडं पहात होता !

◆ ◆ ◆

"बानाशा !"

इतकी नाजुक आणि एवढ्या जिव्हाळ्यानं भरलेली हांक बनाशानं जन्मांत पहिल्यांदाच ऐकली होती कीं काय नकळे ! त्याचा मेन्दू जागा झाला. तो शब्दाचे, श्वसनाचे, आकृतीच्या रेषांचे वेध घेऊं लागला. जगांतले रंगढंग त्याच्या कक्षेंत

येत नसल्यामुळें त्याच्या आसक्तीला कांहीं अर्थ नव्हता. आतांची परिस्थिति तशी नव्हती. ती खोपटांतील आंधळी गळ्यांत हात घालून त्याला म्हणत होती,

"बानाशा ! सोडव मला या तानाशाच्या जाचांतून !"

तानाशा तिजवर जुलूम करत नव्हता तर काय !

दुपारीं कुठं एक धमार्थ खाना होता. बानाशान् तानाशाला निमंत्रण होतं. पण आदरसत्कारांत कुठं काय कमीजास्त झालं होतं कुणास ठाऊक ! भरपंक्तीतून तानाशा उठून गेला. सुग्रास भोजनावर लाथ मारणारा फकीर म्हणून उलट त्याची प्रतिष्ठाच वाढली होती कीं काय नकळे ! तो तेथून अदृश्य झाल्यावर बानाशाला तें प्रकरण कळलं. त्याला शोधण्यासाठीं म्हणून तो आंधळीच्या झोंपडींत शिरला. तानाशासारखी त्यालाहि दाढी होती. तो जवळ आल्याचं कळतांच आंधळीनें एकदम त्याला मिठी मारली. अन् अधाशासारखं त्याला घुसळलं. केवळ सकाळच्या क्षणैक परिचयावर एवढं उत्कट स्वागत होईल याची त्याला काय कल्पना ? तो बानाशा आहे हें कळल्यावर ती थोडीशी दूर झाली. पण मग राखून ठेवलेल्या अर्ध्या पानाचा तिनं त्याला विडा करून दिला तो कोणत्या भावनेनें ? तानाशा आपल्या धर्मनिष्ठ वृत्तीनं त्या अतृप्त जिवाच्या इच्छा रोखीत होता, यांत शंका नव्हती !...

स्वप्नांतहि तोच प्रकार घडून आल्यावर बानाशा धडपडत उठला. घोरण्यासारखाच कुणाचा तरी आवाज ऐकूं येत होता ! तानाशा उपाशीच झोंपला होता. त्याचाच असावा तो. त्यानं डोळे उघडून पाहिलं. छे ! तानाशा पडवींत नव्हता. आभाळ मात्र गडगडत होतं. पावसाचा नुकताच एक सटका येऊन गेल्यामुळे हवेंत गारठा आला होता. तानाशा कुठं नमाजाला गेला होता कीं काय ? तो जवळपास नाहीं अशी खात्री होतांच त्यानं झोळीत हात घातला. धूम्रपान करून उरांत थोडीशी ऊब आणावी असं त्याला वाटलं. पण झोळींत काय होतं ? सकाळीं मिळविलेलं थोडंक नाहींसं झाल होतं. अन् झोळीतल्या खुर्च्याला कुणीतरी चट्टा दिला होता ! मशिदीच्या धर्मशाळेंत उतरलेल्या धर्मप्रवृत्त फकीरांच्या वस्तू चोरीला जाव्यात ! बानाशा संतापला, पण कांहीं उपाय नव्हता. कमरेच्या फडक्यांत बांधलेलं नाणं मात्र शाबूत होतं. आंधळीला थोडीशी मिठाई न्यावी असा त्याचा विचार होता. तानाशा परत येण्याच्या आंत हें सारं व्हावं म्हणून तो उठला आणि चालूं लागला. हलवायांनी दुकानं केव्हांच बद केल्यामुळं रिक्त

इस्तानंच प्रणयिनीकडं जावं लागणार म्हणून त्याला वाईट वाटलं. झोपडीच्या दारांत तो आला; तों काय ? आंत तानाशा होता. एक दिवट मिणमिणत होतं. दिव्याचं प्रकाशवर्तुळ अधिक भडकपणानं जमिनीच्या ज्या भागावर पडलं होतं तिथं सिगारेटचं थोटूक चुरगळून टाकलेलं त्याला दिसलं. आंधळीपुढं मिठाईचा पुडा सोडला होता. अन् त्यांतले पदार्थ तानाशा तिला खाऊ घालीत होता !

बानाशाला आश्चर्याचा जबर धक्का बसला !

चाहूल लागल्यामुळं तानाशानं एकदम कडाडून विचारलं,

" कोण ? "

" मी, बानाशा ! तूं जवळ दिसला नाहींस; पाऊस पडूं लागला. या झोपडीची काय अवस्था होईल म्हणून पाहायला आलों ! " स्वतःला सांवरीत बानाशा उत्तरला.

" ठीक ! ईश्वर तुझ्या भलाईची नोंद घेतल्याशिवाय राहाणार नाहीं. तुला न उठवितांच आलों मी इकडं ! झोंपमोड करण्यासारखं पाप नाहीं दुसरं ! गरिबासाठीं आज एवढा खाना झाला ! पण ह्या आंधळीची दखल कोण घेणार ? मी तिला मिठाई चारतों आहे. उडवा म्हणावं लेकाच्यांनो बिरयानी न् कबाब ! "

" धन्य आहे तुझी तानाशा ! तूं आहेस म्हणूनच धर्म थोडाबहुत टिकून राहिला आहे ! मला वाटतं तूं आतां आराम कर जाऊन ! दिवसभराचा उपाशी न् तशांत जागरण ! पाऊस पुन्हां यावयाचा संभव आहे ! मी करीन या झोपडीची देखभाल आतां ! अनाथ अपंगाची सेवा करण्याचं पुण्य थोडसं माझ्याहि पदरांत पडूं दे ना ! "

" झोंपून कसं चालेल, बानाशा ! धर्म बुडत चालला आहे याची आज तर अधिक प्रचीती आली आहे ! अन् आतां तर अधिकच सावध राहायला पाहिजे मला !... " ◆ ◆ ◆

# नागझरीचे पाटील

**दहा** वाजले कीं ' माळधामणी 'च्या एका भल्या मोठ्या इमारतीच्या विस्तृत आवारांत खूप गर्दी होत होती !

ती इमारत म्हणजे माळधामणी जिल्ह्याचं न्यायालय होतं. न् ती गर्दी म्हणजे वकील, अशील, पोलीस, साक्षीदार आणि ज्यांच्या कल्याणासाठीं तें न्यायालय उभारलं होतं त्या गुन्हेगारांची होती !

' संपतराव बनाम सरकार...' वगैरे प्रासादिक मथळ्यानं सुरू झालेला एक ' संगीन मुकद्दमा ' या न्यायालयांत आला होता !

या खटल्याबद्दल जो गलबला झाला होता तो असा :

माळधामणी जिल्ह्यांतील नाझरीचे संपतराव पाटील आणि त्यांचा पुतण्या सर्जेराव यांच्यांत कित्येक दिवसांची तेढ होती. इस्टेटीचा खरा वारस सर्जेराव ! संपतराव कावेबाज आणि धोरणी असल्यामुळें सबंध इस्टेट आपल्या घशांत रिचवूं पहात होता. सर्जेरावाला हिकमत करून त्यानं घराबाहेर काढलं. बोलून चालून सर्जेराव खराखुरा वारस ! तो कां संतापणार नाहीं ? पण संपतरावांनीं ' जांभळीच्या वावरां'त त्याला गांठलं न् बंदुकीनं उडविलं ! पोलीसखातं चांगलं जागरूक होतं म्हणून खुनी, त्याचे साथीदार आणि प्रेत जागच्या जागींच धरतां आले होते ! अन् प्रेताचा यथाविधि पोस्टमॉर्टम् झाल्यावर साक्षिपुराव्याच्या कडेकोट तयारी-सह खटला न्यायासनापुढं आणतां आला होता !

तारखेच्या दिवशीं बेड्यांनीं भारावलेले पाय फांकून टाकीत पोलिसांच्या पहाऱ्यांत आठ-दहा माणसांचं एक लंगर येतांना दिसलं कीं एखादा माहितगार (!) म्हणे, ' ती पहा नागझरीची खुनी टोळी, अन् तो मधला कळे राखलेला

म्हातारा–तो नागझरीचा संपतराव पाटील ! आहे कीं नाहीं बेरड ! पुतण्याचा खून केलाय् त्यानं ! हां हां, पुतण्याचा खून ! पैसा काय करायला लावील कांहीं सांगवत नाहीं बाबा !......'

संपतरावांना यापेक्षांहि भयंकर शिव्या ऐकण्याची आतां संवय झाली होती !

पोलिसांनीं बेड्या घालून आधींच पाटिलकीच्या इज्जतीचे लचके तोडले होते. उतार वयांत हा केवढा कलंक होता ! घरंदाजांच्या इभ्रतीची निर्दय लूट झाल्यावर कोणता रुबाबदार चेहरा झळकलेला दिसेल ? तशांत, जेलखान्यांतल्या विचित्र दिनचर्येनं त्यांच्या चेहऱ्यावर मालिन्य आलं होतं न् कैद वांट्याला आल्यापासून आपल्याच विचारांनीं ते अतिशय पोळून निघाले होते.

सुनेचा मर्मांतक प्रहार बसल्यावर, पुतण्याचा खून झालेला पाहिल्यावर, खुनी म्हणून कैदी झाल्यावरहि आपण जिवंत कसे राहिलों हा प्रश्न सुटेनासा झाला म्हणजे ते समोरच्या इमारतीकडे पहात.

पोलिसांच्या दंड्याखाली विविध अंगक्षेप करणारी, वकिलांच्या बडबडींतून आकार घेणारी, पैशापुढं कधी निःसंग होणारी तर कधी सत्याच्या नांवानं झिरझिरित न् छाकटं वस्त्र नेसणारी न्यायदेवता कांहीं पेशा, कांहीं तारखा झाल्यावर कोर्टाच्या कलमांतून जिथं साक्षात् होईल असं ते भव्य ठिकाण होतं ! कांही दैवशाली माणसांचे निकाल तिथल्या तिथंच लागून एक घाव दोन तुकडे होत होते ! कांहींच्या नशिबांत सेशन्स् न् हायकोर्टासारखा न्यायाचा आणखी मोठा विलास पाहाण्याचा योग लिहिला जात होता. अन् कांही धड जीवन नाही न् मरणहि नाहीं अशाच कांहींशा आध्यात्मिक अवस्थेत तारखेच्या दिवशीं पोलिसांच्या पहाऱ्यांत येत होते अन् पेशी वाढली म्हणून परत जात होते !

संपतराव या तिसऱ्या अवस्थेत होते !

तें न्यायालय म्हणजे लोकव्यवहारांतली घाण नाहींशी करणारं ठिकाण समजावं, कीं लोकव्यवहारांतला गाळीव माल सांठविण्याची न् वाढविण्याची अभिजात सोय म्हणावी ? जीवनांतील अनैतिक भानगडींना इथं आळा घातला जातो, कीं नीतिमत्तेचे कसकसे खेळ होऊं शकतात हें प्रदर्शित केलं जातं ? गुन्हेगारीवर इथं तोडगे योजतां येतात, कीं गुन्हे उघड रीतीनं इथं छपवून ठेवले जातात ? पोलिसांनीं रक्षण केलं कीं भक्षण ? कागदकलमांनीं न्यायनिवाड्याची तजवीज

केली कीं कलमबंदीचा भ्रष्टाकार मांडला ? अन् जिला ' रोषनाई ' म्हणतात त्या शाईनं सत्येच नोंदलीं कीं असत्यांना उजळा दिला ?

संपतरावांना या प्रश्नांचीं उत्तरं सांपडत नव्हतीं !

मग ते सभोंवतालच्या जमावाकडे पाहूं लागत. तो पठाणी पोषाखांतला लाला रोहिला ! तेथल्या सगळ्या गर्दीत तो उठून दिसत होता. इमारतीपुढल्या एवढ्या स्वच्छ सूर्यप्रकाशांत सर्वांच्याच नजरेंत भरणारी ती व्यक्ति, न्यायदाते, त्यांचे संरक्षक आणि संयोजक यांना मात्र दिसून येऊं नये हे आश्चर्य होतं ! तो पोलिसांशीं मजेंत बोलत होता. बाजूला साक्षीदारांचं जें टोळकं होतं त्याच्याकडे जरब ठेवण्यासाठीं करड्या नजरेनं पाहात होता, न् संपतरावांकडे मधूनमधून दृष्टिक्षेप करतांना बंदुकीकडे हात नेत होता !

पाटलनांहि शस्त्र वागवावयाची संवय होती. त्याचा उपयोग कसा आणि केव्हां करावा हे ते चांगलं जाणत होते.

संपतरावांच्या आयुष्यांत असेहि कांही प्रसंग आले होते कीं, त्यांनीं शस्त्राचा उपयोग केला असता तर आजचा अनर्थ ओढवला नसता ? पण प्रसंग निघून गेले. शस्त्रं सरकारजमा झालीं. अन् पुतण्याच्या रक्तानं हात रंगविल्याचा आरोप माथीं आला !

ज्यांच्याकडून निर्दोषता सिद्ध करणारे कबुलीजबाब यायचे त्यांच्या छातीवर बंदुकी रोखायचा हा नवा प्रकार मात्र पाहायला मिळाला !

या विचित्र कल्लोळांत नागझरीची एक जवान पोरगी तारखेच्या दिवशीं येऊन बसत होती ! ती पाटलांच्या घरची कुळंबीण सकनी !

पाटलांच्या गाड्या एखाद्या देवस्थानी सुटल्या तर पांढऱ्या तलम ओढण्यांचा गोषा केलेल्या स्त्रिया देवळाकडे जाऊं लागत. त्यांचे गोरे नाजुक पाय आणि स्वाभाविक गजगति अधिकच सुललित करणाऱ्या पायांतल्या सांखळ्याच काय त्या लोकाना दिसून येत. त्यांचं मार्गदर्शन करण्यासाठीं बिनगोषाची एक ' रानसारजा ' ज्वानीचा झोक शालीनतेनं घेऊन चालत असे. तिच्याच चेहऱ्यावरून गोषांतल्या धवधवीत चेहऱ्यांची लोक कल्पना करीत होते !

—ती सकनी होती !

नागझरीच्या रानांतून पिकणारं धान्य, नागझरीवर तळपणारं आकाश आणि नागझरीच्या आडांतून डबडब करणारं पाणी या सर्वांच्या कसदार विशेषांतून ती मूर्ति घडविली होती कीं काय नकळे !

सकनीचा नवरा किशा हा संपतरावांचा गडी म्हणून त्यांच्याबरोबर खटल्यांत ओढला गेला होता. त्याची न् अन्नदात्या पाटलांची खबरबात घेण्यासाठी ती येत होती.

तिला पाहातांच, हे एखाद्या भानगडीच्या खटल्याचं मूळ तर नाही, असा काहींच्या दृष्टींतला अभिप्राय असे. तें साहजिकच होतं. कारण कोर्टाचं आवार म्हणजे तरण्याताठ्या पोरींनी येऊन बसावं अशी जागा नव्हती. तिथं सुशील आणि सभ्यता येणार तरी कशाला ?

संपतरावांनी पाहिलं त्या वेळीं एक पोलीस तिच्याकडे अशा कांही आशाळ-भूतपणानं न् विस्मयानं पाहात होता की जणूं हा ज्वानीचा शिगोशिग भरलेला घडा कोर्टाच्या आवारांत आपल्यासाठी घटका टाकीत बसला आहे, याचा पूर्वीच आपल्याला सुगावा कां लागला नाही !

सोवळ्यांतल्या सबळीला एखाद्या अमंगळानं हात लावावा तसं वाटलं सपतरावांना तें !

एक भला सरकारी माणूस असं समजून अन् 'दादा' असे अतीव स्नेहलतेचं संबोधन वापरून, 'नागझरीची माणसं केव्हां सुटतील' असं सकनीनं त्या पोलिसाला विचारलं.

तिच्या डोळ्यांतील अश्रु, आवाजांतील मार्दव आणि विकलता, चेहऱ्या-वरील करुणभाव......

दयाशीलतेला तें आवाहन होतं !

पण कोणत्याहि उत्कट रसानं दगड भिजला तरी विरघळण्याऐवजीं तो शेवाळून जाण्याचाच संभव अधिक ! एखाद्या दुर्मिळ नामी पदार्थाकडे पाहावं त्याप्रमाणें त्या पोलिसानं तिची लांबी, रुंदी, आकार आणि रेषा बारकाईनं पाहून विचित्र स्मित केलं !

खेड्यांतील अश्रापपणाचं तें प्रतीक आणि तें मळवूं पाहाणारा तो सरकारी दूत......

संपतरावांना आपल्या असहायतेची अत्यंत तीव्रतेनं जाणीव झाल्याशिवाय राहिली नाहीं !

इतक्यांत खटल्याची पुकार झाली न् न्यायाचं माप पदरांत घेण्यासाठीं संपतराव आंत गेले—नव्हे त्यांना नेण्यांत आलं !

◆ ◆ ◆

असं सांगतात की चौथरमाथ्याच्या लढाईत विजयी झालेल्या शत्रूच्या फौजा आंत घुसून दुधना नदीच्या कांठाकांठानं हिंडूं लागल्या. शंकर सोनाजी नांवाचा विठ्ठल सुंदरचा कुणीसा एक नातलग आणि दक्षिणेतलं आणखी एक दरबारी प्रस्थ वेषांतर करून त्या भागांत असल्याची बातमी होतीच. एका संध्याकाळीं नागझरी नांवाच्या खेड्यांत शत्रुसैन्याची टोळी शिरली. भयान दारन् दार हादरलं. प्रत्येक घर हुडकलं तरी शत्रूला पाहिजे तें मिळालं नसावं. मग नेहमीं-पेक्षां जरा उशीराच मारुतीच्या देवळांतला दिवा लागला गेला अन् टाळ-मृदंगाच्या झणत्कारांत भक्तियुक्त कंठांतली अभंगवाणी ऐकूं येऊं लागली,—

**' बहुत सुकृताची जोडी ऽ '**

देवराव नांवाच्या शिपाईगड्याच्या घरांत दडलेले दोन नवखे मुशाफर सभय आणि साशंक दिसत होते. तें ओळखून देवराव हलकेच पण अदबीनं म्हणाला, ' हुजूर ! गर्दन् उडाली तरी या देवरावाचं इमान चाळणार नाहीं. खुदावंतांनीं आतां निर्धोक आराम करावा !.....'

मग चंद्र मावळल्यावर देवरावनं लादणींतल्या दरबारी मुशाफरांना उठविलं न् मजल दर मजल करीत इच्छित स्थळीं सुरक्षित नेऊन पोंचविलं !

फार दिवस झाले नाहीत; एके दिवशी नागझरीकडे येणाऱ्या रस्त्यावर डफडे न् सिंगाडे झडूं-गर्जूं लागले. चौघडा न् सनईचा आवाज येऊं लागला. हवेंत बंदुकीचे बार होऊं लागले. फुलांच्या माळा घातलेला, उमद्या घोड्यावर बसलेला अन् खांद्याला बंदूक अडकविल्यामुळं अधिकच रुबाबदार दिसत असलेला देवराव नागझरीच्या वेशीत शिरला !

नागझरीची कुलमुखत्यारी त्याच्याकडे आली होती !

मग नागझरीचा पाटील म्हणून लोक देवरावाला ओळखूं लागले न् मान देऊं लागले. सामान्य घराण्याला इतिहास आला. शेतांत सोनं पिकूं लागलं.

घरांतून वैभव हिंडूं लागलं. वतनदारीचा नोकझोक झगमगूं लागला. गांवांत आबादानी न् नांव करीत पिढ्या जाऊं लागल्या. ऊर्जित काळानं घराण्याची कायमची साथ केली. गांवाच्या मध्यावरला पाटलांचा 'वरवाडा' (गढी) वाढता न् उंचावलेला दिसूं लागला. अन् मग गढीवर असा वास्तु तयार झाला की देवडीवाल्या देशमुखांनाहि त्याचा हेवा वाटावा !

गच्चीवरला लाल विटांचा जिना तर दोन-दोन मैलांवरून दिसून येत होता !

जिन्यावर उभं राहून पाहिलं तर उत्तरेकडे 'मैनावळ'च्या टेकड्या आभाळाला आधार देतांना दिसत होत्या. दक्षिणेच्या अफाट सपाटीच्या त्या शेवटच्या टोंकाला दुधना न् गंगामाईच्या स्तन्यासाठी नीलांबरी झेप घेत असल्याचा भास होत होता. नांगरलेल्या काळ्याभोर गव्हाळीच्या रानांना रसार्द्र करू निघालेले मृगाचे न् आर्द्रांचे भारावलेले मेघ पश्चिमेकडून वर चढतांना दिसत होते. अन् पूर्वेकडे जागृत स्थान म्हणून मानल्या गेलेल्या बेलझाडीच्या देवीच्या देवळाचं शिखर न् दीपमाळ दिसून येत होती !

सुगी संपली की नागझरीच्या शिवारांत आनंदोत्सव करण्याइतकं ऐश्वर्य तुडुंब भरत होतं ! नागझरीभोंवतालच्या रसाळ आंबराईचं अंतरंग प्रकट करीत मग वसंत-वारा नागझरीतून वाहात होता. जीवनसर्वस्व अशा काळ्याभोर रानांना तापविण्यासाठी आकाश तप करीत होतं. मग रसनिर्भर उरावरला पदर फडफडतो आहे अशी वर्षा पुंजमेघाच्या राशीतून चालत येत होती. मग हिरवं न् हिवाळ्याचं युग येत होतं न् ज्वारीची धाटं कणसं धरूं लागत होतीं !

पाटील जिन्यावर उभं राहून हे वैभव पाहात होते; गढीच्या छायेखालचं जीवन सुखी आहे, हें पाहून सुखावत होते. त्यासाठी पिढ्यानुपिढ्यांचे प्रामाणिक श्रम आणि सद्भाव खर्ची पडले होते याची त्यांना कल्पना होती न् त्यांची आपल्याकडून जोपासना व्हावी अशी इच्छा ते मनांत वागवीत होते !

गढीवर यायला पंधरा-वीस रुंद पायऱ्या ! प्रवेशद्वार मोठं न् मजबूत ! सुगीच्या दिवसांत खालच्या पटांगणांत गाड्यांची नुसती रीघ लागत होती. पटांगणांतले ज्वारीचे पेव भरून जात होते. शेतें पिकलीं नाहींत तरी गांवकरी उपाशी मरतील हे शक्य नव्हतं. संध्याकाळी गांवांतली सुजनता न् सभ्यता पाटलांना वंदन करण्यासाठीं येत होती. गांवांतला फकीर गांवाला न् गांवदेवाला

दुवा देत होता. गोंधळी न् पोतराज दारापुढं येऊन कटकट करूं लागले कीं पाटलांनीं अंगावरचं नागपुरी उपरणं भिरकावलंच म्हणून समजावं !

एखादे वर्षी पावसाचं मान बिघडणार असं दिसलं कीं गांवांतल्या सुवासिनी गढीखालच्या आडावरून घागरी भरून देवानंतर पाटलाच्या अंगावर भडाभड ओतीत होत्या !

मग काय विचारतां ! नागझरीवर जीवनमेघांची दाटी होत होती. जमिनीवर जिकडेतिकडे जल्थल् होऊन जात होतं. अन् मग नागझरीचं शिवार नुकत्याच वागायला उठलेल्या एखाद्या कोवळ्या बाळंतणीसारखं ओलसर, हिरव आणि रम्य दिसत होतं !

नागझरीच्या पाटलांची परपरा ही अशी होती !

◆ ◆ ◆

नागझरीच्या वेशीत एक दिवशीं एक नवाच माणूस शिरला !

नवाच नाहीं तर काय ! वाळवटासारख्या रुक्ष आणि जीवनहीन प्रदेशांतला तो असावा. नागझरीसभोवतालची हिरवींगार शेत, बहरान लवथवलेले मळे आणि ठिकठिकाणीं तुडुंब भरलेल्या विहिरी पाहून आपण एखाद्या स्वर्गभूमीतून चाललों आहों असं त्याला वाटत होतं ! त्या भूमीवर तो लुब्ध झाला होता. त्याच्या मनांत अशीहि एक वृत्ति जागृत झाली होती की, या भूमीचा एखादा तुकडा,--जमल्यास त्यापेक्षां मोठा, किंवा, सर्वच भूमि स्वाधीन व्हावी ! तिची संपूर्ण समृद्धि फक्त आपल्याला लुटतां यावी !

माणसांपासून देवांनी स्वर्ग दूर ठेवला होता तो या वृत्तीला भिऊनच कीं काय ?

तो मुशाफिर गांवांत प्रवेशतांच कुत्र्यांचा जमाव त्याच्या अंगावर चवताळून धांवला. त्या आवाजाचा एकच कल्लोळ उडाला. रस्त्यांत खेळणारीं उघडींनागडीं मुलं घराकडे नाहीं तर वाट दिसेल तिकडे धूम पळत सुटलीं. श्वास लागल्यामुळं भयाचं कारणहि त्यांना धड सांगतां येईना.

संपतराव त्यावेळीं दहाएक वर्षांचे असतील. ते त्या मुलांच्या घोळक्यांत होते. पाटलाच्या मुलाला हात लावायची कुणाची छाती नाहीं, अशा समजुतीनं ते जागच्या जागींच उभे राहून त्या नवख्या माणसाकडे पाहात होते.

घोळदार विजार, खूप सैल अंगरखा, त्यावर कलाबतूचं विटकं वासकूट, देवळाच्या शिखरासारखं ज्याचं टोक वर आलं आहे असं शिरोभूषण, अशा पोषाखांतला गव्हासारख्या रंगाचा तो माणूस! ऐन रंगांत आलेला आपला खेळ त्यानं विचकला म्हणून संपतरावांना राग आला. बंदूक घेऊन तो गढीच्या पायऱ्या चढतो आहे हें त्यांना सहन झालं नाही. अन् नाना पाटलांनी–आपल्या वडलांनी–त्याला नोकरीवर ठेवावं ही गोष्ट तर त्यांना मुळीच आवडली नाही!

पुढं कित्येक दिवस हट्टी, रडक्या मुलांना गप्प करण्याच्या हेतूनं त्यांच्या आया म्हणत—

'तो बघ रोहिला आला!'

अन् खरंच ते भयकारक चित्र डोळ्यापुढं येतांच मुलं चुपचाप होऊन जात!

रोहिला गढीवर दरवानगी करीत होता. केव्हां त्यानं शेतांना वेढा करायचा, खळेदळे पाहायचे, खुरपण–निंदणाची देखरेख करायची अन् पाटील बाहेरगांवी गेले की शरीररक्षक म्हणून त्यांच्याबरोबर मिरवायचं!

नाना पाटलांची रोहिल्यावर मर्जी बसली!

पाटलांनी गांवाबाहेर त्याला झोपडं करून दिलं. जीवनाला स्थैर्य आलं अशा समजुतीनं रोहिल्यानं जनाना आणला अन् बायकामुलं अन्नाला लागल्यावर दिवस मोठ्या मजेत जाऊं लागले!

नाना पाटलांच्या उदार स्वभावाचा रोहिला अपलाभ घेऊं लागला. माझा अमका नातलग देशावर अडचणींत आहे, तमक्याला अकारण तुरुंगांत घातलं जाणार आहे असं सांगून तो पगाराखेरीज उचल करूं लागला. पाटील वेळीं अवेळीं लहानलहान रकमा देऊं लागले. एवढ्यावरच थांबलं नाही. दरवान इतर गोष्टीत हात घालूं लागला न् हात मारूं लागला. धनधान्याची जमेल त्या मार्गानं न् साधेल तेवढी चोरी तो करूं लागला.

नाना पाटलांना तें समजलं मात्र!

प्रवेशद्वाराला लागूनच असलेल्या मोहटीत, प्रशस्त तक्क्याला टेकून बसलेली झुपकेबाज पांढरे कल्ले असलेली एक भव्य मराठी मूर्ति संतापलेली पाहाणं अथवा ऐकणं म्हणजे साधी गोष्ट नव्हती. मूळचाच करडा, घोगरा आवाज थोडासा चढलेला ऐकला कीं गढीखालून जाणाऱ्या माणसांचे पाय क्षणभर लटपटत! तें तामसी ध्यान रोहिल्यानें पाहिलं तें किती विचित्र अवस्थेत!

सभोंवतीं गांवांतल्या स्त्रीपुरुषांचा जमाव जमला आहे, अन् नाना पाटलांची बंदूक रोहिल्याच्या छातीला भिडली आहे !

गांवाबाहेरच्या झोपडींतून गोषा केलेली एक स्त्री धांवत आली न् कडेवरलं मूल तिनं पाटलांच्या पायावर घातलं. रोहिल्याची बायको होती ती ! पाटलांचा राग शांत झाला.

मग रोहिल्याला त्यांनी गांवाबाहेर घालवून दिलं !

नाना पाटलांना चोरीबरोबर आणखी एक गोष्ट आवडत नव्हती. ती म्हणजे छिनाली ! गावांत एक मास्तर होता. पाटलांपुढं तो फार नमून वागत होता. पाटील त्याचं लगीन करून द्यायचीच भाषा करीत होते. ' दवापाणी ', ' गंडेदोरे ' न् ' छाछू ' या गोष्टी मास्तर जाणत होता. म्हणून घरोघर त्याची ये जा होती !

एक नाजूक नाडी पाहातां पाहातां मास्तर चळल्याची बातमी नाना पाटलांच्या कानावर आली !

एकदम गर्जून नाना पाटलांनी एक मासलेवाईक शिवी हांसडली न् बदुकीला हात घालून म्हटलं,—

" म्हाद्या ! त्या मास्तरड्याला धरून आण इकडे ! गांवांत छिनालवाडा करतोय् नव्हं का ? "

मास्तरनं गांवातून केव्हांच पोबारा केला होता. नाही तर पाटलांनी त्याला गोळी घालायला कमी केलं नसतं !

असं होतं नाना पाटलांचं काम !

◆ ◆ ◆

हैबतरावाकडून—नाना पाटलांच्या वडील मुलाकडून—पाटलाची ही परंपरा कितपत सांभाळली जाईल याची शंका येऊं लागली. नाना पाटील तक्क्याला टेकून होते तोंवर सारं कांही छपून चाललं होतं न् तें छपवून ठेवण्याचा इतरांकडूनहि प्रयत्न होता. पण नाना पाटलांचा शेवटचा दिवा विझला न् हैबतरावाचा एकेक गूण उजळ होऊं लागला ! हैबतराव उघड उघड पिऊं लागले. भारी साड्या मधूनमधून कुणाला पाठवूं लागले. रात्रीहि बाहेर काढूं लागले. एक काळ असा होता कीं एखादा ताफाबिफा आला तर चावडीवर हजरी होऊन

घरच्या बाया झोंपायच्या आंत पुरुष परत येत, न् मग पासोडीला पासोडी जोडली जाई !

हैबतरावाच्या अमदानींत कोल्हाटणी गढीच्या पायऱ्या चढून येऊं लागल्या. लग्नाची लक्ष्मी रिकाम्या पलंगावर उसासत न् हुसहुसत पडूं लागली. गांवांतलीं सुजाण म्हातारीं माणसं मारुतीच्या पारावर बसून कुजबुजूं लागलीं,—

'पाटलाच्या घरांत आता अवदसा शिरली !'

कर्त्या पुरुषाचे वामाचार मुलाबाळांना कळूं लागले. हैबतरावाचा मुलगा दादाराव तर अगदी बापाच्या पावलावर पाऊल टाकून चालणार असं दिसूं लागलं.

करडपूरच्या 'दिल्वर' नांवाच्या एका वेश्येच्या दारावर एका अपरात्री थाप पडली. हैबतराव आले होते !

म्हाताऱ्या कुंटिणीनं कालहरण करण्यासाठीच की काय त्यांना संभाषणांत गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न केला. पण तो जमला नाही.

हैबतराव धाड् धाड् जिना चढून वर आले न् दिल्वरच्या खोलीचं दार त्यांनीं लाथेनं धडकावलं. आंत दादाराव होता !

पितापुत्रांनी परस्परांकडे पाहिलं मात्र !

हैबतरावांनी निशा केली होती न् दादारावाला कामाचा नशा चढला होता. रागाच्या झटक्यात हैबतरावांनीं आपल्या रखेलीच्या गालफडांत भडकावली. एक बारिक किंकाळी फोडून तिनं दादारावाच्या छातीचा आधार घेतला. दादारावानं कमरेचा तमंचा उचलून हैबतरावावर रोखला न् म्हटलं, 'हं ! खबरदार !'

हैबतरावांनी मिशांवरून तर्जनी फिरवली न् तुच्छतेची परमावधि प्रकट करणारा एक हुंकार काढून तेथून पाय काढला. दादाराव गढीवर आलेला पुन्हां मात्र कुणाला दिसला नाहीं !

संपतराव—हैबतरावाचा धाकटा भाऊ—हे सारं पहात होते न् ऐकत होते. गढी सोडावी नाही तर गढीवरली बिघडलेली हवा नाहींशी करावी असं त्यांना वाटत होतं !

व्यसनाच्या अतिरेकानं की पश्चात्तापानं कुणाला माहित, हैबतरावांनी अंथरूण धरलं. कुळांतली माणसं जो मुहूर्त साधून अस्तंगत झाली, तशाच एका संध्याकाळीं हैबतरावानं संपतरावांना जवळ बोलावून घेतल न् म्हटलं,

' संपती ! माझे दिवस भरले. दादाराव तर गेलाच...आतां सर्जेराव तुझ्याच वसंगळीं आहे. त्याला संभाळ......'

मग संपतरावांची कारकीर्द सुरू झाली !

◆ ◆ ◆

संपतराव पाटलाचा खाक्या अगदीं थेट नाना पाटलासारखा दिसत होता. कपाळावरला गंधाचा टिळा अंतर्बाह्य सोज्वलतेची साक्ष देत होता. भोगलालसा एखाद्या खानदानी स्त्रीसारखी संपतरावापुढं पदर ओढून लपून चालत होती. दोन लग्न करण्याचा पाटलांच्या घराण्यांत मधूनमधून क्रम होता. नाना पाटलांच्या हयातीत संपतरावांचं जे लग्न झालं तेंच अखेरपर्यंत टिकलं. एकदोन मुलं झालीं न् अपुऱ्या वयांत खरचलीं. दुसऱ्या लग्नाला केवढ चागलं निमित्त होतं ! पण संपतरावांनीं सांगून आलेल्या मुली डावलून लावल्या !

त्या दिवशीं लिबाजी नांवाचा एक शेतकरी गढीवर चढला न् रोहिल्यानं मारलं अस संपतराव पाटलांना सांगूं लागला.

नागझरीच्या आसपासच्या कित्येक खेड्यांतून रोहिल्यांनी प्रवेश केला होता. एका रुपयाच्या सावकारीपासून त्यांनीं चरितार्थाला आरंभ केला. रुपयाचे दोन रुपये करायला त्यांना मुळींच वेळ लागत नसे. पंधरा–वीस रुपयांच्या भाडवलावर कांहीजण घरदार न् जमीनजुमला करून राहूं लागले. पाटलांच्या दरवानानं एका खेड्यांत असच घर केलं होतं. त्याचा मुलगा लाला आतां मोठा होऊन विविध प्रकारें कमाई करूं लागला होता. इतर खेड्यांप्रमाणंच नागझरीकरांनाहि रोहिल्याची झळ पोचूं लागली. नागझरीच्या बाजारांत रोहिले येऊं लागले अन् मधूनमधून गांवकऱ्यांना झोडपून जाऊं लागले. परगांवी जाणाऱ्या गाड्या लुटल्या जाऊं लागल्या. एकदां संपतराव मालाची रक्कम घेऊन परत येत होते. पाळतीवर कुणी तरी असावं. मांडीखालीं त्यांची लाडकी बालम् घोडी होती. परतीच्या न् पायाखालच्या रस्त्यावर जनावर मधूनमधून अडूं लागल. कांहीं दगाफटका तर नाहीं, अशा संशयानें संपतराव सांवरून बसले न् झावळमावळ प्रकाशांत सभोंवार पाहूं लागले. आहिरवाडीचं शिंदबन त्यांनीं ओलांडलंहि नसेल, तोंच अकल्पित घडलं ! धामाधूम झालेली पाटलांची घोडी रिकामीच गढीच्या दारापुढं येऊन

थांबलीं. मशाली न् काठ्या घेऊन गडीमाणसं शोधाला निघालीं. पाटील शिंदबनांतल्या ओढ्यांत रक्तबंबाळ झालेले आढळले !

मग सरकारदरबार झाले. सरकारदरबार करतांकरतां जिथंतिथं पैसा रिचवावा लागूं लागला. अन् कचेरींत चकरा करतांकरतां पाटील कटाळले. कांहीं अनुकूल निष्पन्न होण्याच चिन्ह दिसेना. मग पाटलांनीं कचेरीचा रस्ता सोडला. निवडक रोहिल्यांना त्यांनी गांठलं अन् वेशीबाहेरच्या पिंपळाच्या झाडाला आणून बांधलं !

किशा गडी त्यांच्या अंगावर आसुडाचे फटकारे ओढीत होता—कडाड् ! कडाड् !

तो आवाज विरतो न विरतो तोच संपतराव तशाच भरीव आवाजांत म्हणत होते,

‘ किशा ! आणखी एक ! आणखी एक ! ’

पुन्हां मात्र रोहिला नागझरीच्या वाटेला जाईनासा झाला !

पण रोहिले चिवट ! थोडासा काळ गेल्यावर परिस्थिति निवळली कीं नाही हे ते पाहूं लागले.

लिंबाजीला मारणं हा त्याच चांचपण्याचा एक प्रकार !

शिंवेवर लिंबाजीचं एक शेत होतं. त्या शेताशेजारचं वावर लाला रोहिल्यानं बटाईनं केलं. टिकं मोठं असलं तरी पीक समाधानकारक नव्हतं. परक्या माणसावर ती जमीन नाराज होती कीं काय न कळे ! रोहिला जमिनीच्या नाराजीची थोडीच पर्वा करणार ! आजूबाजूच्या शेतांतला कापूस त्यानं रातोरात वेचून नेला. पुरावा नाहीं म्हणून शेताचे धनी कर्माला दोष देत बसले. लिंबाजीचं उभं शेत रोहिल्यानं बैलांना चारलं. लिंबाजीन बैल धरले न् कोंडवाड्यांत घातले. आतां त्याला देहदंड सोसावा लागला तो या अपराधासाठी !

संपतरावांचं रक्त गरम होऊं लागलं. त्यांनीं रोहिल्याला गढीवर बोलावून आणलं न् म्हटलं,

‘ लाला ! आजवर नुसत्या फटकाऱ्यांनीं काम घेतलं ! यापुढं मात्र बंदूक उचलावी लागेल ! ’

प्रकरण वाढविण्यांत अर्थ नाहीं असा विचार करून लालानं नुकसान भरून द्यायचं कबूल केलं. गढीच्या पायऱ्या उतरतांना मात्र पाटलांना चिरडून टाकण्याचे त्याचे बेत चालले होते !

रात्र बरीच झाली म्हणून नेहमीप्रमाणं बोलण्यासाठीं आलेल्या गांवकऱ्यांना निरोप देऊन संपतराव उठले. आंतल्या घरांत वळतांना त्यांनी हांक मारली,

' किशा ऽ ! '

किशा चिलीम भरण्याच्या तयारीनं ती तळहातावर पालथी आपटीत होता. हांक ऐकतांच ' जी ऽ ' असं प्रत्युत्तर करीत तो लगबगीनं पाटलांपुढं येऊन उभा राहिला.

' रामप्रहरीच चलायचं आहे, ध्यानांत आहे ना ? '

' तर ! '

' बैलांना वैरण टाकलीस ? '

' व्हय तर ! '

' बाल्मूला दाणा चारलास ? '

किशा कांहींच बोलला नाही. उत्तर नाहीं त्या अर्थी कांही तरी कमजास्त झालं होतं यांत शंका नव्हती. मग त्यानं सांगितलं की घोडी सर्जेराव घेऊन गेला आहे. सर्जेराव घोडी न् बैल निष्काळजीनं वापरतो हे संपतरावांना माहित होतं. एकदां एका यात्रेंत पळवा-पळवीच्या शर्यतींत खिल्लारी जोडीतला एक बैल सर्जेरावनं लंगडा करून आणला. दुसऱ्या एका वेळीं घोडी रोगट करून टाकली. तीं जनावरं सुधरायला पुढं कित्येक दिवस लागले. आतां यात्रा वगैरे कांहीच नव्हती. मग सर्जेराव कुठं गेला होता ? न् संपतरावांना न विचारतां निघून जाण्याइतकं असं कोणतं निकडीचं काम नडलं होतं ?

किशाला धमणी तयार ठेवायला सांगून संपतराव आंतल्या घरांत वळले. सर्जेरावाच्या शयनमंदिराच्या दारावर हलकेच थाप मारून त्यांनीं हांक मारली,

' गजरा ऽ ! '

दाराला आंतून कडी नसावी. तें उघडलं गेलं. प्रशस्त बुडाचा भलामोठा कंदील आंत प्रकाशत होता. प्रकाशासारखी शक्ति जिच्या सान्निध्यांत जागृत

राहात होती अशी एक कांतिमति पासोडी दूर करून लांबरुंद पलंगावरून उठून दाराशीं आली.

अनिष्टापासून रक्षण करण्यासाठीं, सत्कृत्यांना चेतना देण्यासाठी प्रार्थना करतांना संपतराव जें ध्यान मनांत आणीत, त्याच्याच कांहीं छटा आपण साकार पाहात आहों कीं काय असं त्यांना वाटलं !

ही त्यांची भावना आजची नव्हती.

◆ ◆ ◆

सर्जेरावाचं थाटामाटांत लग्न झालं, न् संपतरावांच्या कर्तृत्वाच्या युगांत घरांत पहिल्यांदा लक्ष्मी आली. झगमगती बनारसी लेवून ती गढीच्या पायऱ्या चढली तेव्हां गढीवरल्या वैभवाची पूर्तताच निवासाला आली असं संपतरावांना वाटलं. गढीचा न् गढीच्या छायेंतल्या वस्तीचा हा केवढा सन्मान होता ! तिचं ओटी-भरणं झालं न् ती सालंकृत शालीन मूर्ति घरधनिणीच्या अधिकारानं घरांत हिंडू-फिरू लागली. चालू पिढींतलं भाग्यदेवतेचं स्थान तिनं भूषविलं होतं ! पुढच्या कित्येक पिढ्यांना जीवन पुरविणारी ती देवताच होती !

संपतरावांचा जीव नुसता हरखून गेला न् गजरेबद्दल त्यांच्या मनांत मोठे नाजुक, वत्सल आणि उदात्त भाव जागृत झाले.

हैबतरावासारखा कर्ता पुरुष बाहेरख्याली निघाला होता. दादारावालाहि घराण्याचं वळण सांभाळतां आलं नव्हतं. हा रोग सर्जेरावाला बाधणार नाही अशा रीतीनं त्यांनी त्याला वाढविलं होतं न् बायकोहि अशी लायक पाहून दिली होती कीं जी नवऱ्याचं चित्त आपल्या कह्यांत ठेवील !

पण मग सर्जेरावाचं रात्री न सांगतांच निघून जाणं म्हणजे त्यांच्या विश्वासाला धक्काच नव्हता काय ? जवळपास एखादा ताफाबिफा तर आला नव्हता ? कीं आणखी कांही भानगड होती ?

गजरेला खरं काय तें माहित असेल अन् आपल्याला आलेली कुशंका खोटी ठरेल म्हणून ते आतां तिच्याकडे चौकशीला आले होते. त्यांनीं विचारलं,

‘ सर्जेराव कुठं गेलाय् ? ’

गजरेनं खालीं पाहात हलक्या आवाजांत उत्तर दिलं ‘ मला माहित नाहीं ! ’

मला माहित नाही ! अशा उत्तराची संपतरावांनीं अपेक्षाच केली नव्हती कीं काय कोण जाणे !

मग रात्रभर संपतरावांचा डोळ्याला डोळा लागला नाही !

संपतराव बैठकींतून समोरच्या रस्त्याकडे पाहात होते. हळूहळू रस्त्यावर एक पुसट आकृति दिसूं लागली. धूळ उडूं लागल्यामुळं तर त्यांची खात्रीच झाली. एक करडी घोडी छुळछुळ नाचत येऊं लागली. पाहातां पाहातां ती गढीपुढं येऊन थांबली. हिरवा शेमला बांधलेला, रेशमी शर्टवर सन्‌फ्रूफचा कोट घातलेला एक जवान गडी घोड्यावरून उतरला.

काय तो नूर ! केवढी ऐट न् रुबाब !

कित्येक रानहरणींना तहान विसरायला लावील अशी भिकबाळीच्या मोत्यांची चमक ! न् तें डोळ्यांतलं पाणी !

तो साराच थाट पाहून पाटलांना आनंद झाला, तसाच संतापहि आला. त्याच्या हालचाली पाहून त्यांना सुख झालं, तशी असुखाची लकेरहि त्यांच्या मनांत उद्भवली.

तो सर्जेराव होता !

हा उद्यांचा नागझरीचा पाटील कसा राजबिंडा आणि देखणा आहे, या विचाराचा तो आनंद होता ! आतांशा त्याचं वर्तन असं होत चाललं होतं कीं ' केवळ पोरवय आहे, आपोआप समज येईल, ' हें समाधान व्यर्थ होतं; अन् त्याच्या या वागणुकीचा त्यांना संताप येत होता ! मोठ्या प्रेमानं न् काळजीनं त्यांनी त्याला वाढविलं होतं अन् तो त्यांच्या मनासारखाच वाढला होता या समजुतीचं तें सुख होतं ! अन् अ;पल्या त्याच्याविषयींच्या आकांक्षा विफल तर ठरणार नाहींत ना, या शंकेंतून असुख डोकावत होतं !

प्रसंग पाहून पाटलांनीं सर्जेरावाला त्याच्या वर्तनाची जाणीव करून दिली अन् म्हटलं,

' घराण्याच्या नांवाला कलंक लागेल असं कांहीं घडलेलं मला सहन होणार नाहीं ! '

संपतरावांना त्याची प्रचीती येऊं लागली. सर्जेराव कामधामांत लक्ष घालूं लागला. शेतांना वेढा करूं लागला. पैशाच्या देवघेवींचे व्यवहार मिटवूं लागला

अन् रात्री गढीवरून बाहेर जाईनासा झाला. संपतरावांना वाटलं, सुधारला सर्जेराव !

◆ ◆ ◆

संपतराव परगांवाहून परत येत होते. आहेरवाडीच्या दौलतराव पाटलाच्या कर्त्या मुलाचं रोहिल्याशीं भांडतांना डोकं फुटल्याची बातमी त्यांनीं ऐकली. आहेरवाडींत रोहिल्यांचा चांगला जम बसला होता. रोहिल्यांचे न् दौलतरावांचे संबंध बिघडत चालले होते. रोहिल्याच्या शेताशेजारच्या दौलतरावांच्या शेताचा धुरा फुटला. तो अर्थात् रोहिल्यानं फोडला होता ! कुठं नाठाळांच्या नादीं लागायचं, असा विचार करून दौलतरावांनीं आपली पांचसहा हात जमीन रोहिल्याला घेऊं दिली. मग लगेच रोहिल्यानं दौलतरावांच्या शेतांत जबरीनं औतं घातलीं न् त्यांचं शेत पेरूनहि काढलं ! या आक्रमणाबद्दल मारामारी झाली न् पाटलाच्या मुलाचं डोकं फुटलं !

आहेरवाडीचे न् नागझरीचे स्नेसंबंध होते. संपतराव दौलतरावांना भेटायला गेले.

दौलतरावांनीं म्हटलं, ' काय नादान दिवस आले आहेत, संपतराव ! शेतं आमची ! वाडवडिलांपासून आम्ही तीं वहात आलों. पण आज तीं आम्हांला वहाता येत नाहींत. रोहिले येतात न् जबरीनं कबजा करतात ! सरकारांत जावं तर फिर्याद ऐकायलाहि कुणी तयार होत नाहीं !...'

ते खरंच होत ! दौलतरावांचा मुलगा दवाखान्यांत दाखल झाला होता. पोलिसाकडे रीतसर तक्रार नेली होती. तक्रारीवर कागदपत्रांचा प्राथमिक क्रम व्हायचा तो सरकारकडून झाला. पण रोहिल्याविरुद्ध साक्ष द्यावयाला गांवांत कुणी धजेना, म्हणून तक्रार फेटाळली गेली. जणुं पाटलाच्या मुलाचं डोकं फुटलं तें खोटं ! आहेरवाडींत कांहीं अनैतिक घडलं तें निराधार ! आहेरवाडीचं न् तेथल्या वस्तीचं अस्तित्वहि निव्वळ काल्पनिक !

संपतराव म्हणाले, ' पाटील, हा नाद सोडा ! सरकारदरबार करून कधीं कांहीं चांगलं झालयं ? पोरगा बरा होऊं द्या, मग करूं काय करायचं तें ! '

ते जायला उठले तेव्हां रात्र बरीच झाली होती. दौलतराव म्हणाले,

' संपतराव सकाळींच जा आतां ! दिवसमान चांगलं नाहीं.'

संपतराव दोनतीन दिवसांपासून घराबाहेर होते. घरीं जाणं आवश्यक होतं. अन् दुसऱ्या वाक्याच्या उत्तरादाखल त्यांनीं नुसता तमंचा चाळविल्यासारखा केला होता !

दुधना ओलांडल्यावर पुढच्या गांवकोसांत धमणी आली तेव्हां पेटी–तबल्याचा आवाज संपतरावांना ऐकूं येऊं लागला.

गंमतच नव्हती तर काय ? जवळच्या गांवांत जमिनीच्या वहितीसाठीं,– मालकीहक्कासाठीं डोकी फुटत होतीं न् शेजारचं गांव गाणं–बजावणं करीत मारे चैन करीत होतं !

रस्ता गांवाच्या मारुतीपुढून जात होता. देवदर्शनासाठीं संपतराव खालीं उतरले. पायातणं काढून उभ्याउभ्याच त्यांनीं मारुतीला हात जोडले. पुढं उभ्या केलेल्या धमणीकडे जाऊं लागतांना बाजूच्या चावडीकडे त्यांची नजर गेली. चावडीपुढल्या पटांगणांत बत्त्या झगमगत होत्या. खेडवळ शौकिनांचा जमाव जमला होता. हिरवे–जांभळे शालू नेसलेल्या दोन जवान गाहिऱ्या कोल्हाटणी अदा करीत मध्यभागीं जोसांत नाचत होत्या. संपतरावांनीं पाहिलं त्या वेळीं त्या गात होत्या,—

**'नका हरीऽ रंगऽ टाकूंऽ —'**

गाणं म्हणतांच एकीनं डोक्यापुढं ओढलेला पदर दोन्ही हातांत आडवा धरून प्रतिष्ठित प्रेक्षकांपासून चेहरा लपविण्याचं मिष केलं. जणूं रंगाची पिचकारी त्याच दिशेनं येत होती ! मग डोळे मोडून काममोहितेसारखी तिनं अंगाची हालचाल केली; तेव्हां त्या हावभावाचा अर्थ व्यक्त होण्यासाठींच कीं काय, पेटी-तबला किंचित् थांबला. अन् मग प्रेक्षकांच्या बेहोष उद्गाराबरोबर त्यांना एकदम गती येऊन नाचरीं पावलं वेगानं थयथयूं लागलीं !

संपतरावांना तें दृश्य आवडलं नाहीं. प्रतिष्ठित प्रेक्षकांत एक हिरवा शेमला चमकलेला त्यांना दिसला. त्यांनीं आणखी रोखून पाहिलं.–सर्जेराव ! अन् शेजारीं लाला रोहिला ! सर्जेराव रुपायामागून रुपाया उधळीत होता न् लाला त्याला प्रोत्साहन देत होता !

संपतरावांनीं मोठ्या शिकस्तीनं राग आवरला. धमणीपर्यंत जाईतों दोनतीन वेळां त्यांचा हात पिस्तुलाकडे गेला. घरीं लौकर पोंचायला पाहिजे म्हणून त्यांनीं बैल दामटायला सांगितलं न् जरा वेळानं तेच गड्याला म्हणाले,

' किशा, बैल मारायचा विचार आहे? '

◆ ◆ ◆

संपतराव चावडीपुढून गेल्याच सर्जेरावाला जलसा आटोपल्यावर कळलं. दोनतीन दिवस तो घराकडे फिरकला नाही. बायामाणसं घाबरलीं. सर्जेरावाच्या शोधासाठी इकडे तिकडे माणसं फिरूं लागलीं. संपतरावांना ते कळतांच एकेकावर खेकसून ते म्हणाले, ' खबरदार त्या काट्र्याला कुणी शोधून आणलं तर! '

चवथ्या दिवशी स्वतः सर्जेराव दारांत प्रकट झाला!

' बदमाष! '

बैठकींतून संपतराव एकदम कडाडले—' याद राख पुन्हां घरांत पाय ठेवलास तर! '

आंतून गजरा आली न् हा प्रकार पाहून रडूं लागली.

तिच्याकडून पुन्हां सर्जेरावाकडे नजर वळवून संपतरावांनी गहिंवरल्या कंठानं म्हटलं,

' सोन्यासारखी बायको घरांत टाकून मोकाट आवांच्या नादीं लागलास! कुळशीलाची कांहीं चाड तुला? '

पिढ्यान् पिढ्यांपासून चालत आलेल्या अन्नावर धाड घालूं निघालेल्या माणसांच्या निःपाताचे विचार वागवायचे कीं, त्यांची सोबत करून नाचरंगांत रमायचं? संपतरावांना आडरानांत ज्यांनी लुटलं होतं, आहेरवाडीच्या नाशासाठीं ज्यांचा कसून प्रयत्न चालला होता, त्या रोहिल्यांपैकीच एकाशीं सर्जेरावाची मैत्री असावी ही केवढी लाजिरवाणी गोष्ट होती!

' चल निघ! निघ माझ्यापुढून! '

सर्जेराव निघून गेला! त्यावेळीं ऐन संध्याकाळ टळली होती. खूप मोठा आवाज काढून ' सर्जेराव, परत फिर, ये! ' असं म्हणावंसं संपतरावांना वाटलं. पण तो दिसेनासा झाला अन् पाटील बैठकींत सुन्न होऊन बसले!

सर्जेरावाची बुद्धि भ्रष्ट झाली होती कीं काय न कळे! वार्ता तर अशा उठत होत्या कीं सर्जेराव इस्टेटीच्या वांटणीसाठीं सरकारदरबार करणार आहे. त्याखेरीज गत्यंतरच नव्हतं! उद्यां संपतरावांनीं सबंध इस्टेट बळकावली तर काय करतां

येणार होतं ! गढीवरल्या जनानखान्यांतल्या मनाची घडणहि बिघडत चालली होती !

मग वहितदारांना निरोप येत होतेः ' शेतांचा खरा धनी सर्जेराव आहे. शेतांतलं धान्य गढीवर पोंचविण्याऐवजीं लालाच्या घराकडे पोंचविण्यांत यावं.'

या वार्तांनीं अत्यंत संतप्त आणि अत्यंत विमनस्क होत त्या दिवशीं संपतरावांनीं गढीवर पाय ठेवला. आंतल्या दारांत गजरा कुणाशीं तरी जोरजोरानं बोलत होती. त्यांनीं पाहिलं तों कुळंबीण सकनी रडत उभी आहे अन् गजरा तिच्यावर शिव्यांचा वर्षाव करते आहे !

पाटलांना पाहातांच गजरा दचकली. तिच्या हातांतली वस्तू खालीं पडली न् खणकन् वाजली.

सोन्याची पाटली ! ती सकनीनं चोरली होती ?

छे ! चोरी नव्हती ! सर्जेरावाचा पैशांसाठीं कुणाबरोबर तरी निरोप आला होता. गजरेनं पाटली काढून त्याच्याकडे पोंचविण्यासाठीं सकनीजवळ दिली होती. संपतरावांच्या परवानगीखेरीज असे व्यवहार करण्यास सकनी तयार नाहीं म्हणून गजरा संतापली होती !

संपतरावांनी पाटली उचलली न् खिशांत घातली. जवळपास कुणी नव्हतं म्हणून ठीक. नाहीं तर एखाद्याला वाटलं असतं पाटील कफल्लक होत चालले आहेत, बायांचे अलंकार मोडण्यापर्यंत घरांत दारिद्र्य येत चाललं आहे !

' गजरा ! सर्जेरावाला आतां कांहीं सुमार राहिला नाहीं. मोडून फस्त करायला का पाठवीत आहेस हे ?' संपतरावांनी करड्या आवाजांत विचारलं.

गजरेला एकदम हुंदका आला. त्या तशा उबळींत तिनं एकदम म्हटलं,

' माणसं आहेत तंवर त्यांना खाऊंपिऊं द्या ना ! का सारीच राशी तुम्ही घेणार आहां ?'

अनपेक्षित जबर घाव बसल्यावर धड किंचाळतांहि येऊं नये न् प्रहारहि रोधितां येऊं नये तशी पाटलांची अवस्था झाली ! उरांतली कळ शांवविण्यासाठीं कीं काय त्यांनीं क्षणैक डोळे मिटून घेतले, न् मग पाहिलं तों गजरा पाय आपटीत घरांत परत जात होती !

अंगणांतल्या तुळशीच्या मंजुळा एखाद्या पोरानं कीं ढोरानं ओरबडून काढल्या होत्या !

मग कित्येक दिवस गढीवरले व्यवहार सुसूत्र चालत नव्हते. प्रसन्नता नव्हती. माणसं न् जनावरं मुकाट्यानंच हालचाल करीत होती; तीं अशी कीं प्राणासारखी एखादी महत्त्वाची वस्तु गडप झाली होती न् ती शोधण्याचा तीं रेंगाळत उगीचच प्रयत्न करीत होती.

◆ ◆ ◆

मग एके दिवशीं संपतरावांनी किशाला बोलावलं, न् धमणी जुंपायला सांगितली. एकवार शेतं पाहून यावी न् मारुतीचं दर्शन घेऊन अखेरपर्यंत वाड्यांतच पडून राहावं असं त्यांनीं ठरविलं.

धमणी गांवाबाहेर पडली. गुरंढोरं परतायची अद्याप वेळ झाली नव्हती. रस्ता निर्मनुष्य होता. सभोंवताल सारं कसं विलक्षण शुष्क दिसत होतं. शिशिराच्या सुसकाऱ्यानं पानं गळून पडत होती.

पानझडीच्या मोसमाच्या त्या ऐन तिसऱ्या प्रहरांत एक व्यथित पुरुष-प्रकृति उदासीन विचारांनी भारावून घुंगराचा कर्णकटु खळखळाट होत असलेल्या गाडींतून जात होती !

धमणी अर्ध्या रस्त्यावर आली तेव्हां पुढून एक गडी धांवत येत असलेला दिसला. जांभळीच्या वावरांत लाला रोहिला आपल्या साथीदारांसह थांबला होता. सर्जेरावाच्या हुकमाप्रमाणं ज्वारीचं गूड रोहिल्याच्या खळयावर नेण्याच्या तयारीनंच ते आलं होते.

संपतरावांनी जांभळीच्या शेताकडे धमणी वळवायला सांगितली. गडी गाडी-पुढं आला न् म्हणाला,

'एकट्यादुकट्यानं जाणं बरें नाही पाटील ! वेळवखत कांही सांगून येत नाहीं !'

पाटील ऐकतील हें शक्य नव्हतं. कित्येक दिवस ज्या संधीची ते वाट पाहात होते ती आतां आली होती न् काय !

माणसं जमा करण्यासाठीं गडी गांवाकडे धांवला. बंदूक सांवरून पाटील किशाला म्हणाले,

'हं किशा ! लौकर !'......

प्रकाश कमी होत चालला तशी संपतरावांची अधीरता वाढत चालली. शेताजवळ येतांच कांहीं भरमाराचे बार झालेले त्यांना ऐकूं आले. त्यांनीं बैल

आणखी वेगानं पळवावयाला सांगितलें. गाडी थांबली ती एकदम खळ्याजवळ. आजूबाजूला कुणी माणसं नव्हतीं.

पाटील येताहेत असं पाहून रोहिले पळून गेले होते कीं काय ?

संपतराव खालीं उतरले न् त्यांनीं खळ्यासाठीं साफसूफ केलेल्या जागेकडे पाहिलं, तों काय ! सर्जेराव गोळी लागून पडला होता. पाटील जवळ येईतों त्याचं प्राणोत्क्रमणहि झालं होतं !

संपतरावांचं सारं अवसान नाहीस झालं.

' सर्जेराव ! काय झालं हें ? '

अत्यत दीन आणि कमालीच्या गद्गद आवाजांत पाटील उद्गारले. त्यांनीं त्याच्या छातीवर डोकं टेकलं !

कांहीं वेळानं सावध होऊन त्यांनी पाहिलं तों गजरा जवळ उभी असलेली त्यांना दिसली !

' माझा संसार धुळीला मिळविलांत मामंजी ! ...... '

असं म्हणत तिनं हृदयभेदी हंबरडा फोडला ! ' गजराऽ ' असं विव्हळ स्वरांत म्हणत पाटील स्पष्टीकरण करणार तोच सभोंवतीं पोलिसांचा गराडा पडला होता, न् खुनी संपतरावांचे साथीदार म्हणून निवडक गड्यामाणसांचीं नांवं लाला रोहिला सांगत होता !

मानवी प्रयत्नांनीच एका विशिष्ट हेतूनं चालविलेल्या एखाद्या महान् योजनाबद्ध कार्यक्रमांतले हे दुवेच तर नव्हते ?

◆ ◆ ◆

त्या दिवशी नागझरीचा मुकद्दमा सेशन–कमिट झाला.

सकनीला कळलं तें एवढंच, कीं तिचे अन्नदाते पाटील आणि तिचा नवरा किंवा वरच्या सरकारांत नेले जाणार ! सरकारच्या आणखी मोठ्या जबड्यांत पडणार !

सकनी ढलढसा रडूं लागली ! ◆ ◆ ◆

# रक्त आणि अश्रू

**संध्याकाळपासूनच** गांवांतलं वातावरण गरम व्हायला लागलं होतं. बाबा 'बोरूड' (बुरूड) आणि चाकू सुरे विकणारा दाढीवाला इस्माइल यांच्या दुकानापुढं ग्राहकाची सारखी ये-जा चालू होती. भारतीय राजकारण निरनिराळ्या विचारप्रवाहांनी हेलकावूं लागल्यापासून बाबा अन् इस्माइलला भाव येऊं लागला होता. रोगराईच्या ऐन कहरांत देखील बाबा बोरुडाचे फारसे बांबू खपले नव्हते. कमालीच्या सस्ताईचा काळ होता तेव्हां इस्माइलच्या अस्सल पोलादी पात्यांच्या चाकूसुऱ्यांना जागच्या जागीच गंज चढत होता. परवां एवढं महायुद्ध झालं न् आटोपलं; पण एकाहि राष्ट्रानं इस्माइलच्या 'जीवघेण्या' हत्यारांना विचारलं नाही !

बाबा बोरुडाच्या दुकानांतल्या वेळाच्या काठ्या बहुतेक खलास होत आल्या होत्या. वंशवृक्षाच्या तुकड्यांतून कुण्या एका अवतारी महात्म्यानं त्रिभुवनाला मोहित करणारे सुस्वर काढले ! जीवनांतून विमुक्त झालेल्यांना ह्याच वंशवृक्षानं आधार दिला ! आतां डोकीफोडीसाठी त्याचा उपयोग केला जात होता ! अत्युज्ज्वल इतिहास (!) असलेली एक जमात लाठ्याकाठ्यावर आपली परंपरा न् संस्कृति टिकविणार होती, हें पुढील शतकांना दिसून येणार होतं !

इस्माइलचे चाकू आजवर फक्त बकऱ्यांच्या मनांवर फिरत होते. ते आतां भोसकाभोसकीसाठी उपयोजिले जात होते, अन् जाणार होते !

उपकरणांच्या वाढीबरोबर संस्कृति प्रगत होत जाते असं म्हणतात ! उपकरणांच्या उपयुक्ततेची विविधता प्रदर्शित करणाऱ्या समाजाला उच्चतेचं कोणतं प्रमाण लावावं !

उद्यां गुरुवार—जुम्मेरात ! सुलतानपुऱ्यांतून शहासाहेबांचा संदल निघणार होता न् त्याची कडेकोट तयारी संध्याकाळपासूनच चालू होती !

रात्रीं दहा साडेदहाला गुलाब ताशेवाल्याच्या दारावर काठीनं जोरानं कुणी तरी खडाडलं. बेंबीच्या पुष्कळच खालीं विजारीचा नाडा बांधलेलं, हातांत दिवट घेतलेलं एक उघडबंब प्रशस्त धूड दाराशीं आलं — गुलाब ताशेवाला !

'कोण ?' असं विचारून दिव्याच्या उजेडांत आलेली व्यक्ति ओळखूं येतांच त्यानं अदबीनं सलाम केला.

'मुस्लिम बूट हाउस्' नांवाचं सामान्य दुकान चालविणारा, स्वयंसेवकांचा सेनानी रहीम होता तो ! तो या वेळी गणवेशांत होता. तो तसा दिसला म्हणजे कित्येक हात सलामासाठी वर जातांना अलीकडं दिसून येत होते.

'गुलाब, उद्यां संदल आहे आपला ! चार वाजतां तयार असलं पाहिजेस तूं !'

गुलाब ! कांहीच बोलला नाहीं !

सेनानीनें विचारलं,

'क्यूं ? क्या बात है ? कहो !'

'एका मारवाड्याच्या शादीची सुपारी घेतली आहे मी ! संदल मिरवायला कसं जमेल मला ?'

'उफ् ! काय बोलतो आहेस हें गुलाब ? मशीदींत आला नव्हतास वाटतं ? 'जंगबहादूर'च्या 'तकरीर'ला ? आपलं धार्मिक कार्य सोडून काफरांचीं लग्नं वाजवायला जाण्यासारखा दुसरा धर्मद्रोह नाही ! जंगबहादूरला समजलं तर काय होईल माहीत आहे ? प्रत्येक हमालानं, प्रत्येक तांगेवाल्यानं, संध्याकाळींच शपथा खाल्ल्या आहेत की, उद्यां हिंदूंची ताबेदारी म्हणून करायची नाही !'

'रहीमभाई ! शादीचा मी तर बयाणा घेऊन बसलों आहें !'

'मग त्यांत काय बिघडलं ! घेतला असशील बयाणा ! आलाच उद्यां मारवाडी बोलावूं तर चक्क सांग, येत नाहीं म्हणून ! कांहीं कमजास्त होऊं लागलं तर दोन तीन माणसं पाठवीन मारवाड्याची सोय पाहायला ! मग तर झालं ? इस्लामच्या रक्षणासाठीं एवढा क्षुद्र त्याग तुला करतां येणार नाहीं, गुलाब ?'

इस्लामच्या संरक्षणाच्या कल्पनेपेक्षां मारवाड्याकडील रकमेचा, लग्नांत मिळणाऱ्या खाद्यपदार्थांचाच विचार गुलाबच्या मनांत घोटाळत होता. स्पष्टपणें

बोलण्याची कांहीं सोय नव्हती हें तो ओळखून होता. मग त्याच्या मनांत घरीं आलेला एक मेहमान आला. त्याला शादी वाजवायला पाठविण्याचं ठरवून त्यानं बाह्यात्कारी रुकार दिला. पण सुग्रास खाद्य पदार्थांना उद्यां आपल्याला मुकावं लागेल याविषयीं त्याला वाईट वाटल्याशिवाय राहिलं नाहीं !

'उमर' नांवाच्या बॅन्डवाल्याचं दारहि असंच खडखडलं जात होतं! इथं एकाच्या ऐवजी दोघेजण होते. घरांतून उत्तर येत नाही असं पाहून एकानं म्हटलं, 'या वेळीं घरीं असणं शक्यच नाहीं तो! सिंदखान्यावर नाही तर सिनेमा थिएटरांत पडली असेल स्वारी !'

'तकरीरच्या वेळीं पाहिल्यासारखं वाटतं त्याला !' पहिल्यानं आणखी एक जोराची हांक मारून कुणी तरी बाहेर येण्याची वाट पाहात संभाषण चालू ठेवलं.

'जंगबहाद्दरची आजची तकरीर मात्र फारच 'पुरजोश' झाली बरं का ?'

'तर ! उद्यां कांहीं तरी घडलंच पाहिजे, असा एकच विचार मघांपासून मनांत मी पुन्हां पुन्हां आणतों आहें !'

इतक्यांत कमालीची मलीन वस्त्रं परिधान केलेली एक मूर्तिमंत जरा दाराचा फाटका पडदा सरकवून डोकावली.

धर्मयुद्धाच्या भावनेनं नसनसांत फुललेले ते धर्मवीर आणि फाटका पडदा सारून डोकावणारी ती जरा—कोणत्याहि राष्ट्रांतील आवेशी सैनिकांचं असं विलक्षण स्वागत झालं नसावं !

जुनाट, जीर्ण विचारांना सामोरा कोण येतं हेंच तर नियतीला दाखवायचं नव्हतं ना ?

म्हातारीनं अपशकुनच केला की काय कुणाला माहीत ! तिनं सांगितलं—

'उमर परगांवीं गेला आहे !'

स्वयंसेवक नाराज होऊन परतले.

संदल वाजतगाजत धूमधडाक्यानं निघायला पाहिजे असं 'जंगबहाद्दर'ने पुन्हां पुन्हां घोषवून सांगितलं होतं ! अन् उमर तर अकस्मित परगांवीं निघून गेला होता ! गांवांत मुसलमान बॅन्डवाला तेवढाच !

'आतां कसं करायचं ?'

'महारवाड्यांत आहे ना वाटतं कुणीसा एक बॅन्डवाला !'

'जंगबहाद्दरनां नाहीं चालणार तो !'

' कां ? '

' काफर म्हणून ! तुला माहीत नाहीं. मागं इदग्याच्या मैदानावर जगबहाद्दरची तकरीर होती. दीड दोन तास एकसारखं भाषण झाल्यावर त्यांचा हलक् ( घसा ) कोरडा पडला ! ' पाणी ' अशी पुकार झाली. मैदानावर पाणी कुठून असणार ? पण सुदैवानं तें मिळालं. कारण हजारोंनीं जमलेल्या इस्लाम-भाईंचे कान जंगबहाद्दरचा एकेक शब्द ऐकण्यासाठीं प्यासे होते. पाणी मिळालं नसतं तर भाषण आटोपतं घ्यावं लागलं असतं अन् समुदायाची निराशा झाली असती ! तर सांगायची बात अशी की, पाण्याचा प्याला ओठाशीं लावण्यापूर्वी जंगबहाद्दरनं एकाला विचारलं, ' पाणी कुठून आणलंस ? ' जवळच्या शेतांतल्या हिंदू रखवालदाराच्या झोंपडींतून ते आणल होतं. तें ऐकतांच जंगबहाद्दर खवळून म्हणाले, ' ज्याच्याबद्दल नुकतीच आपण प्रतिज्ञा केली, त्याच्या हातचं पाणी ? घसा सुकून प्राण निघून गेले तरी हरकत नाहीं, पण मी हें पाणी पिणार नाहीं ! ' तेव्हांपासून कुठं तकरीर ठरली कीं इस्लामी पाण्याची व्यवस्था आधीं केली जाते ! जंगबहाद्दरांना इतरांचा बॅन्ड नाही चालणार ! परगांवचा आणावा लागेल कुणी तरी ! '

' आहे त्यालाच मुसलमान करून घेतल तर ? '

' कल्पना चांगली आहे. पण जंगबहाद्दरचा विचार घ्यायला पाहिजे याबद्दल ! '

◆ ◆ ◆

अशा तऱ्हेनं, विविध साधनांच्या जुळवाजुळवींत गुरुवारचा तिसरा प्रहर झाला ! मुलतानपुऱ्याकडं लाठ्या, बरचे, बंदुकी, तरवारी घेतलेला मुसलमानांचा समुदाय जाऊं लागला. दर्ग्याच्या बाजूला असलेल्या एका झाडाभोवतींच्या कांहींशा उच पडक्या चौथऱ्यावर गर्दीतून आलेली एक व्यक्ति चढली न् लगेच जयजयकार झाला :

' जंगबहाद्दर झिंदाबाद ! '

समुदायाचा आवाज गगनभेदी होता यांत शंका नाहीं ! पण त्या आवाजानं एकहि तारा निखळून पडला नाहीं; अथवा भूगोलाचा एकहि भाग डळमळला नाहीं. मध्याकाश सोडून सूर्य मात्र बराच खालीं उतरला होता. खलुतेच्या

आवाहनांत आणि पूजनांत रमणाऱ्या शक्तीकडं ग्रहगोलांनीं सौम्य, शांत होऊन पाहावं ह्यांतच त्यांच्या क्षमाबुद्धीचा केवढा साक्षात्कार होता !

'जंगबहाद्दर' म्हणून मानला गेलेला इसम धिप्पाड आणि क्रूर दिसत होता. गणवेशामुळं त्या आकृतीला मोठाच रुबाब आला होता. अंगाभोंवतींच्या काडतुसांच्या माळेनं न् शस्त्रानं त्याच्या लढाऊ थाटाला परिपूर्णता आली होती. पण सज्जनांनीं वंदनासाठीं हात जोडावे असं तें चित्र दिसत नव्हतं. तर अर्भकांनीं आईला अधिकच बिलगावं, किंवा कुलांगनांनी पदर सांवरून दार ढकलून घ्यावं असं भयकारक दिसत होतं !

धर्म, देश, जाति, ध्येय आणि तत्सम इतर परमोच्च गोष्टींच्या उपासनेंत अथवा जोपासनेंत अश्रूसिंचन अथवा रुधिराभिषेक करण्याच्या कल्पनांना व कृतींना उदात्त मानलं गेलं. पण क्रूर कल्पनेच्या निदिध्यासानं डोळयांत उफाळणारी लाली, आणि अश्रूंचे घोट पिण्याच्या आकांक्षेनं चेहऱ्यावर दिसणारा कठोर भाव ह्यांनच शौर्य आणि वीरतेचे आदर्श पाहाणाऱ्या भाविकांना काय म्हणावं ?

'जंगबहाद्दर' स्वतःला फार कडवा समजत होता. त्याच्या मतानें काफरांना लुबाडणं, लुटणं अशा तऱ्हेचं 'राजकारण' फार पूर्वीपासूनच तो करीत आला होता. वकील झाल्यावर तर आणखी जोमानं तो 'राजकारण' करूं लागला. खेड्यापाड्यांतून लूट आणून त्यानं बंगला बांधला, अन् मजेंत चरितार्थ चालविला. राजकारण 'रंगविण्या'साठीच की काय कांही दिंड्या, गणपतीच्या कांहीं मिरवणुकी त्यानं झोडपून काढल्या न् ह्या कार्याबद्दल त्याला 'जंगबहाद्दर' हा किताब मिळाला ! घरी खायला प्यायला भरपूर असल्यामुळं त्याच्या द्वेषाला कांही सीमा नव्हती. हिंदूच्या हातचं त्याला पाणी चालत नव्हतं. हिंदू शिप्यानं शिवलेले कपडे चालत नव्हते. हिंदूच्या तांग्यांतून तो कधीं फिरेल हें शक्य नव्हतं. पण सामान्य मुसलमानाचं सारं जीवन हिंदूवर अवलंबून असल्यामुळं संदलच्या निमित्तानं का होईना हिंदूंशी एक दिवसापुरता असहकार करायचा, कसलाच संबंध ठेवायचा नाही, अशी प्रतिज्ञा तो करवून घेत होता !

आजच्या संदललाहि अशा तऱ्हेची प्रतिज्ञा करवून घ्यायला तो विसरला नाहीं !

जमावावर सावेश आणि गंभीर असा दृष्टिक्षेप टाकून त्यानं प्रारंभीं छोटसं आवेशपूर्ण भाषण केलं--

"इस्लामच्या सच्च्या सेवकांनो ! सरकारी परवानगीचे अडथळे (?) ओलांडून आज आपण आपली पवित्र मिरवणूक काढीत आहों ! हजरत सुलेमानचा हा संदल आहे ! सुलेमान शहीद होते (?). आज परिस्थितीच अशी येऊन ठेपली आहे कीं आपलं, आपल्या धर्माचं, संस्कृतीचं अस्तित्व टिकविण्यासाठी शहीद होण्याखेरीज दुसरा मार्गच आपल्याला उरला नाहीं ! या विशाल देशांत आपण पाऊल ठेवलं ते राज्य करण्यासाठीं ! सिंहासनं भूषविली तीं आपणच ! राज्यसंस्था हादरविल्या त्या इस्लामियांनींच ! या तेजस्वी परंपरेच्या इतिहासावर पुरातनतेचा अथवा विस्मृतीचा जंग चढलेला नाही ! बदलत्या कालप्रवाहाच्या एकेका लहरीकडे नजर टाकली तर जे आपले दास होते ते काफर आपल्यावर राज्य करूं इच्छिताहेत ! आपली कौम दास्याची लोढणीं वागविण्यासाठी जन्मली नाहीं, हें पुन्हां एकदां पटवून द्यावयाची वेळ आली आहे ! त्या 'जंगे आझम्' साठीं प्रत्येक भाईनं आतांपासूनच तयार असलं पाहिजे ! सुलेमानशहाच्या आजच्या संदलचा हाच संदेश तुम्ही मनांत वागविला पाहिजे !'

झिंदाबादची आणखी एक आरोळी उठली; न् मग मिरवणुकीला आरंभ झाला !

◆ ◆ ◆

'जंगबहाद्दर' स्वतः एका उमद्या घोड्यावर स्वार होते. वाद्यांचा धूमधडाका चालू होता. अनुयायांची छोटीशी पलटण शिस्तीत चालली होती. वेगवेगळे 'नारे' जोरजोरानं चालू होते. रस्ता जवळजवळ निर्मनुष्य होत चालला होता.

लग्नाच्या मिरवणुकी तर सोडाच, पण साध्या प्रेतयात्रा देखील नेहमीं कुतूहलानं पाहाणारी वस्ती या मिरवणुकीकडे पाहून पटपट् दारं लावून बसूं लागली ! ब्राह्मणआळींतलं, वकीलगल्लीतलं एकहि दार उघडं नव्हतं, किंवा सज्जा–खिडक्यांतून एकहि नजर डोकावूं धजत नव्हती ! मिरवणुकीच्या प्रणेत्यांची खूप जोरकस इच्छा होती की या गल्ली–आळीतली दारं उघडीं असावीं, भांडण करायला निमित्त मिळावं, अन् 'जंगे आझम्'ची पहिली लढाई आटोपून टाकावी !

वाद्यं आणखी जोरजोरानं बडविली जाऊं लागलीं ! जयघोष कमालीच्या चढत्या सुरांत होऊं लागले ! कांहीं ठराविक दारांवर थोडीशी दगडफेक झाली. मग कांहीं नामांकित नांवें उघड उघड उच्चारून शिवीगाळ झाली. तरी

अपेक्षित कांहींच घडलं नाही ! वकीलगल्लींतून अखेर मिरवणूक चिडून पुढं गेली, अन् माळीगल्लींत थांबली ! त्यांतहि हेतु होता. मागं एका दिंडीच्या प्रसंगीं हल्ला झाला तेव्हां भजनकऱ्यांनीं मुसलमानांना याच ठिकाणीं वेढून बेदम चोपून काढलं होतं ! त्याचं या प्रसंगीं उट्टं निघालं तर काढावं असे इरादे आणि बातमेत पूर्वीच झाले होते ! कामधामाला गेलेली तेथलीं माणसं या मिरवणुकीची खोडी काढण्यासाठीं मुद्दाम घरी राहतील एवढी आक्रमक वृत्तीचीं नव्हतीं !

' जंगबहाद्दर ', आणि शहीद होऊं इच्छिणारे इतर सशस्त्र स्वयंसेवक, तांगेवाले न् हमाल इकडं तिकडं पाहात मनांतल्या मनांत नुसते जळफळत होते ! सारी पृथ्वी निष्प्राण झाली होती कीं काय नकळे ! तोंच काय झालं कुणाला ठाऊक ! मिरवणुकीतला झेंडा एकाएकीं कलला न् खाली पडला ! कांहीं तरी गडबड झाली .या कल्पनेनं शस्त्र सज्ज झालीं. वार होऊं लागले. ' जंगबहाद्दर '-जवळ उभा असलेला एक शरीररक्षक म्हणाला,

' जंगबहाद्दर ! कांही ' खतरा ' तर नाहीं ! हिंदूंचीं सारीं दारं लावलीं होती ! म्हणून म्हटल ! पुढून हल्ला होतो आहे कीं काय ! '

' डरो मत ! साऱ्या लोकांना गोळ्या चालवायला सांग ! '

' मला तुमच्या जिवाची भीति आहे–जंगबहाद्दर ! चला येथून चटकन् ! जंग इकडं होत राहील याविषयीं निश्चित असा ! '

अन् खरंच ' जंग 'ला आरंभ देखील झाला ! बाजूचीं घरं–दुकानं फोडलीं जाऊं लागलीं. घरांत दिसेल त्यावर शस्त्र चालविलं जाऊ लागलं. माळी गल्लींत रडारडीचा, ओरडण्याचा एकच गोंधळ उडाला ! घरांना आगीहि लावण्यांत येऊं लागल्या; अन् मग वकील आणि ब्राह्मण गल्लीकडं दगेखोरांचा मोर्चा वळेल असं वाटूं लागलं !

दिवाणखान्यांत इकडून तिकडे येरझारा घालीत असलेल्या ' जगबहाद्दर 'च्या चेहेऱ्यावर विलक्षण समाधान खेळत होतं ! मधूनमधून दंग्याच्या विभागांतून खबर येत होती—अमूक इतक्यावर लाठीहल्ला केला, तितक्यावर तरवारी चालविल्या, गोळीबारानं इतके बळी पडले; अन् आग लावायचं काम चालूच आहे !

एकेक बातमी म्हणजे ध्येयसिद्धीचा एकेक टप्पाच वाटावा यांत नवल नव्हतं !

मोठ्या मुस्लिम–पुढाऱ्यांना संदेश पाठविण्याचा मजकूर ते मनाशीं जुळवूं लागले :–‘ तुमचं महान् पवित्र कार्य अंशतः का होईना पार पाडण्याचा मी प्रयत्न केला ! काफरांनीं आधीं कुरापत काढली ! झेंडा घेऊन मिरवणुकीपुढं असलेल्या लोकांवर आकस्मिक हल्ला झाला ! जमाव खवळला ! अन् त्यांनी भरपूर बदला घेतला ! मुसलमान मरतील पण इज्जतीनं ! आपल्या धर्माचा अपमान झालेला ते मुळींच सहन करणार नाहींत......’

इतक्यांत झेंड्याबरोबर पडलेल्या व्यक्तीची त्यांना आठवण झाली. लाठी, तरवार आणि बंदूक ही तिन्ही आयुधं अंगावर वागविणाऱ्या द्वाररक्षकाला त्यांनीं विचारलं,

‘ शहीद कुठं आहे ! ’

द्वारपालाला उत्तर द्यावयाची वेळ आली नाही. कारण पांचसहाजण एका युवकाला वाहून आणतांना दिसले. तो युवक म्हणजे झेंडा धरलेला स्वयंसेवक ! त्याला दिवाणखान्यांत आणून निजवलं. एखाद्या महारथीच्या शवाकडं ज्या सादर आणि सखेद गांभीर्यानं पाहावं तसं पाहात जंगबहाद्दर खालीं बसले.

‘ शहीद ! ’

एक रुद्ध गभीर उद्गार त्यांनी काढला.

मग त्यांनीं त्याच्या अंगावरून हात फिरविला. जखम अशी कुठं झाली नव्हती ! कायदेकानूच्या कक्षेत येऊं नये म्हणून त्याला मुका मार दिला असला पाहिजे !

आलेल्या माणसाकडं पाहात जंगबहाद्दर एकदम खवळून म्हणाले, ‘ चला ! इथं थांबूं नका ! या एका हुतात्म्याच्या पूजनासाठी हजार आहुति पडल्या पाहिजेत ! त्यांच्याच रक्ताची फुलं, आणि त्यांच्याच अश्रूंच्या कळ्यांनीं या शहीदचा जनाजा, आणि तुरबत सजविली पाहिजे...क्षणभरहि थांबूं नका इथं आतां ! ’...

मग त्यांनी हकीमसाहेबाला बोलावूं पाठविलं न् स्वतः त्या स्वयसेवकाला ते वारा घालूं लागले !

पांढऱ्या, काळ्या, तांबड्या रंगाचे एकाच ठिकाणीं ठिपके पडावे, त्याप्रमाणें रणवेष, संताप, विषाद, या भावनांच्या तीव्रतेनं त्यांचा चेहरा अधिकच क्रूर दिसूं लागला. डोळ्यांतली लाली म्हणजे खून चढल्यासारखा वाटला ! तोंच

बेशुद्ध पडलेल्या युवकाची हालचाल झाली; अन् अतिशय खोल आवाजांत त्यानं म्हटलं,

'पाणी!'

जंगबहाद्दरांनीं जवळच्या खुज्यांतलं पाणी ग्लासांत ओतून घेऊन त्याच्या तोंडाशीं धरलं. त्याला थोडीशी अधिक हुषारी आली.

जंगबहाद्दर म्हणाले—

'घबरावू नहीं! तूं अगदीं सुरक्षित आहेस! हकीमसाहेबाकडे माणूस पाठविला आहे मीं! कुठं कुठं लागलं आहे तुला?.....'

'मला कुठं लागलं नाहीं!'

'मग ग्लानि कशानं आली होती?'

स्वयंसेवकानं एक दीर्घ श्वास घेतला न् म्हटलं,

'झिंदाबादचे 'नारे' लावतां लावतां घसा कोरडा पडला! पण हातांतला झेंडा सोडायचा नाही अन् 'नारे' थांबवायचे नाहींत या निश्चयानं मी आहे तेवढा दम खर्ची घालीत होतों! मला एवढंच समाधान आहे, कीं अखेरच्या दमापर्यंत मी इस्लामचा जयघोष करीत होतों! प्रत्यक्ष युद्धांत नाहीं तरी 'नारे' लावतां लावतांच मरण येणं तरी कमीपणाचं ठरेल का?'

जंगबहाद्दरच्या रक्ताळलेल्या डोळ्यांत आतां अश्रू येणार होते की काय कोण जाणे!

गांवांतली दंगल सारखी वाढत होती! अन् सरकारी संरक्षण सिद्ध व्हायला किती अवकाश असेल हें सांगतां येणं शक्य नव्हतं! ◆ ◆ ◆

# घंटा वाजते आहे !

**ठाण्यावरला** पोलीस पहारेकरी वेळेच्या क्रमांकांतले कोणते तरी भाग सूचित करण्यासाठी घंटेवर टोले मारूं लागला. ठण्ऽऽठण् असे ध्वनि उमटूं लागले.

श्रवणशक्तीवर एकदम दणकेबाज आघात झाल्यामुळें लॉकअप्‌मध्ये असलेला काशीनाथ थोडासा दचकला कीं काय न कळे !

ठाण्यावर घंटा आहे हें गांवाला चांगलं माहीत होतं. सरकारनें जनतेसाठीं ज्या सुखसोयी निर्माण केल्या होत्या त्यांतली ही एक असावी कदाचित् ! लोकांना वेळेची कल्पना व्हावी म्हणून ती घंटा नियमानं ठण्‌ठणली जावी असे नियम केले होते. पण ठाण्यावर घंटा आहे, तासातासाला, अर्ध्या अर्ध्या तासाला ठाण्यासारख्या ठिकाणावर शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असलेलं सत्तेचं एक केंद्र आपल्या अस्तित्वाची घंटा बडवीत आहे, हा विचार मात्र कुणाच्या मनांत आला नव्हता.

काशिनाथानेंहि ती घंटा कित्येक वेळां ऐकली होती. 'लोकसभे'च्या स्थानिक शाखेचा तो संघटक होता. गांवाच्या ऐनमध्यावर शाखेची कचेरी होती. कचेरींत लोकांची जा-ये वाढल्यामुळे लोकांत राजकीय जागृति होत चालली आहे अशी कल्पना करतां येत होती. कचेरींत रोज ताजीं वर्तमानपत्रें येऊन पडत होतीं. बातम्या वाचल्या जात होत्या. चर्चा होत होती. या गराड्यांत काशिनाथ एका आलमारीपुढें बसून कामाचे कागद चाळीत होता; रिपोर्ट लिहीत होता; बातम्या पाठवीत होता; तालुक्याहून विचारणा करणारी आलेलीं पत्रें पाहून उत्तरें लिहीत होता. मध्यवर्ती केंद्राकडून आलेला कार्यक्रम किंवा सूचना स्थानिक कार्यकर्त्यांना सांगत होता. लिहिण्यांत, वाचनांत किंवा सांगण्यांत

केव्हां केव्हां अंधार पडूं लागत होता. आलेली मंडळी निघून जात होती. अन् मग ठण्ण असा आवाज झाला कीं तो कामाचे कागद आवरूं लागत होता.

ठाण्यावरील घंटा होती ती !

तिला वेळ सुचवायचा होता ? की लोकशाहीची मागणी करणाऱ्या लोकसभेसारख्या जनतेच्या प्रातिनिधिक संस्थेला विद्यमान प्रतिगामी सरकार घंटेवरील ठोक्यांच्या स्वरूपांत ठोसा मारीत होतं ?

सभासदांची नोंदणी अथवा इतर कामाच्या निमित्तानं काशिनाथ परगांवीं जाऊन आला की कचेरींत काम खूप तुंबून पडत असे. शिणलेल्या अवस्थेंत महत्त्वाचे तेवढे कागद पाहून तो झोंपी जात होता. मग उत्तर रात्रीं जाग आली की, प्रत्येक गोष्टीबाबत त्याचे मोठे प्रसन्न विचार चालत ! खोलींत बारीक केलेल्या दिव्याचा प्रकाश असे. थोड्याशा अंतरावर त्याची बायको झोपलेली दिसे. स्थानिक महिला-मंडळाच्या शाखेत तिजकडं कसलासा अधिकार होता. दिवसभर घरोघर फिरून पांढरपेशांच्या निरक्षर बायकांना ती कांहीसं सांगत होती. स्त्रीसमाजांत जागृति घडवून आणण्याचं ती कार्य करीत होती. हा विचार काशिनाथाला सुखद वाटत होता. पुढ्यांतल्या मुलावर पडलेल्या तिच्या हाताकडं काशिनाथ बराच वेळ पाहात असे. मंद प्रकाशांत त्या नाजुक हाताची गौर कांति मोठी विलोभनीय वाटत होती. मनगटांतले लाल पोपटी विलवर चमचमत होते. झोंपलेल्या मुलाच्या अंगावर वात्सल्याच्या ओढीनं ठेवलेल्या त्या सुभग सुंदर हातावरून काशिनाथाचं बराच वेळ लक्ष ढळत नव्हतं.

आणि त्याचे असे सांसारिक सुखद विचार चालू असतांच ठाण्यावरील घंटा ऐकूं येई.

कोणत्याहि सज्जन माणसाला शोभतील असे ते विचार असत. घंटेच्या टोल्यामुळ ते तुटत आणि तसेच राहात; आणि मग उठून तो आपल्या कामाला लागे.

◆ ◆ ◆

तीच घंटा अतिशय जवळून पाहाण्याचा आणि ऐकण्याचा, कुयोग कीं सुयोग काशिनाथाला आज लाभला होता !

नुकत्याच ऐकूं आलेल्या ठोक्यांनीं आतां अमुक इतके वाजले आहेत हें तर काशिनाथाला सुचविलंच; पण ठाण्यावर आल्याला इतका कालावधि लोटला आणि त्याच्या येथल्या अस्तित्वाचा कांहीं एक निकाल लागायला अमुक इतका काळ उरला आहे, याचीहि त्याला जाणीव करून दिली.

'धाबा संस्थानांतील लोकशाहीचा लढा' असे वर्तमानपत्रात अलीकडं मथळे झळकत होते. लोकांना जबाबदार असलेलं सरकार हवं, अशी 'लोकसभे'ची मागणी होती. ही मागणी वर्तमानपत्रांतून सरकारच्या नजरेस आणली जात होती आणि व्यासपीठावरून ती बोलून दाखविली जात होती. सरकार नवे नवे फतवे काढीत होतं. पुढारी धमक्या देत होते. आणि अखेर, सत्तालालसी आणि जनतेचे नेते ह्यांच्यांतील वितुष्ट वाढत जाऊन चळवळीला आरंभ झाला होता!

काशिनाथाला ठाण्यावर आणल होतं तें सत्याग्रही म्हणून! त्याच्या तुकडीत एकूण तिघेजण होते. एक तो, गांवांतील प्रतिष्ठित वकिलाचा एक मुलगा आणि तिसरा नुकताच वकिलीची परीक्षा दिलेला एक तरुण!

दीडदोन तास लॉकअप्मध्यें तिघांनी मोठ्या उच्च मनोवृत्तींत काढले. आपण कांही तरी महनीय कार्य करीत असल्याचा त्यांचा उन्माद बराच वेळ ताजा होता. मग प्रतिष्ठित वकिलाच्या मुलाला बोलावून नेण्यांत आलं. आणि काशिनाथानं जरा वेळानं पाहिलं तों, तो आपल्या वडिलांबरोबर ठाण्याच्या फाटकाबाहेर पडतो आहे!

त्यानं पोलिसांना माफीनामा लिहून दिला होता यांत तिळप्राय शंका नव्हती!

होऊं घातलेल्या वकिलानं त्याच्या ह्या कृत्यावर जळजळीत भाषण केल. प्राण गेला तरी आपण माफीनामा लिहून देणार नाही, असं बोलून दाखविल; कांही निश्चय केले. जरा वेळानं त्यालाहि लॉकअप्बाहेर काढल आणि फौजदाराच्या खोलींत नेण्यांत आलं. काशिनाथ बारकाईनं कानोसा घेऊं लागला. जातिवंत-जिवंत पोलिसी आवाजांतल्या धमक्या त्याला ऐकूं आल्या. आणि नंतर 'आऽह' असा किंकाळीच्या स्वरूपाचा आवाज त्यानं ऐकला. मारहाण होत असली पाहिजे हें नक्की!

मग कांहीं वेळानं काशिनाथाला दिसलं तें तो तरुण वकील खालीं मान घालून ठाण्याचं फाटक ओलांडतो आहे! काशिनाथाकडं परत वळून देखील त्यानं पाहिलं नाहीं.

चळवळीला आरंभ झाल्यापासून सत्याग्रहींचा विविध प्रकारे छळ होत असल्याच्या बातम्या काशिनाथाच्या कानावर आल्या होत्या. कुठं सत्याग्रहींना वेताच्या छडीनं झोडपून काढण्यांत आल होतं; कुठं अन्न पुरविलं जात नव्हतं; कुठं विश्रांति घेऊं दिली जात नव्हती. आणि कुठं गुह्यभागांत तिखट भरून भयंकर विटंबना करण्याचे छळाचे रानवट उपाय योजिले जात होते.

तरुण वकिलाला बसलेला फटकारा आणि त्याची किंकाळी या गोष्टींवरून ऐकलेल्या बातम्यांची सत्यता काशिनाथाला पटली.

◆ ◆ ◆

साथीदार गेल्यावर मात्र एकटाच उरल्यामुळे काशिनाथ सभोवतालची हरेक गोष्ट बारकाईनं पाहूं लागला; आणि प्रत्येक गोष्टीबद्दल खोलवर विचार करू लागला.

ठाण्याच्या बाजूनं एक सडक गेलेली होती. सर्व्हिसच्या मोटारी आणि मालाच्या गाड्या जात येत होत्या. संध्याकाळी जाणारी मोटार खूप चिकार भरली होती. एक पोलिस फाटकापाशी तिच्या पाहाणीला गेला होता. ड्रायव्हरनं पोलिसाला सलाम करून एक सिगारेट दिली आणि पाहाणी संपली !

मोटार चिकार भरली आहे की नाही हेंच पोलिसाला तपासायच होतं ! किंवा ती तशी असली तरी, एकदां पोलिसाची तपासणीची नजर तिच्यावरून फिरल्यावर मोटार चिकार भरण्यांत कायदेशीरपणा आला होता न् काय ?

मोटारीनंतर मालाच्या गाड्या येऊं लागल्या. त्या एका पोलिसान अडविल्या. गाड्या ठाण्याजवळून जात होत्या हाच एक गुन्हा होता ! आणि त्या गुन्ह्यासाठीं प्रत्येक गाडीवाल्याला थोडासा दंड भरावा लागत होता !

विचारी मनाला अस्थिर आणि तप्त करतील अशींच ती दृश्यें होतीं.

लॉकपच्या गजाळीच्या दाराच्या बाजूला फरशीवर कोळशाच्या रेघोट्यांनीं वाघ शेळ्या खेळण्याचा एक पट तयार केलेला होता. रिकामे पोलीस विड्या फुंकीत वाघ अडकवीत होते आणि शेळ्या मारीत होते. माणसं जिथ आणून कोंडायचीं त्या खोलीपुढं वाघ–शेळ्यांच्या धरपकडीचा खेळ चालावा यांत

गजाळीच्या दारांतून नेहमीं ठण्ठण्णारी ती घंटा दिसत होती. पितळेची एक खूप जाड वर्तुळाकार टिकली व्हरांड्याच्यॉं तुळईला अडकविली होती. ठोके मारण्याचा चांगला जाडजूड लाकडी ठोकळा जवळच ठेवण्याची व्यवस्था होती. पोलिसासारखा माणूस केवढ्या जोरानं त्या घटेवर टोले मारीत होता ! लाकडाला टच पडत असले पाहिजेत ! पोलिसाला श्वास लागत होता हें निश्चित. पण घंटा मात्र दुभंगत नव्हती ! अशी कोणती अमूर्त तत्त्वं त्या पितळी धातूंत असावी कीं जी प्रहार पडले तरी एक विशिष्ट एकसुरी ध्वनि काढण्याचा आपला स्वभाव-धर्म सोडीत नव्हतीं ?

ऐन लॉकपच्या दारापुढच ती अडकविली गेली होती. त्यांत कांहीं हेतु होता की काय ? लॉकअप्मध्ये आलेल्या प्रत्येक माणसाला असं सुचवायचं असावं की, ' पाहिलं, गुन्हा केल्यामुळ पोलीस असे ठोके हाणीत असतात ! सरकारच्या मर्जीविरुद्ध एखादी गोष्ट घडली की अशा तऱ्हेचं शासन केल जातं ! ' लॉकअप्च्या भिती शक्य तितक्या घाण होत्या. फरशी विशेष साफसूफ नव्हती. आणि वार आणि प्रकाश धडपणे येईल अशी सोय नव्हती. त्या खोलींत एखादा अट्टल दरोडेखोर येऊन गेला असेल ! एखाद्या खुनी माणसान मेंदू शांत झाल्यावर पश्चात्तापाचे विचार इथंच केले असतील; आणि पुढं कसं होणार हा तापदायक विचार त्याला सुटला नसेल ! चुकून पोलिसफेऱ्यांत सांपडलेल्या एखाद्या घरदाज सज्जनानं अब्रु गेली म्हणून मुक्तपणान अश्रुपात केला असेल तो इथंच ! जबरीनं धरून आणलेल्या एखाद्या निर्दोष माणसानं खोलीच्या भितीना आपली कहाणी सांगितली असेल ! अन्, आतां आपण कसचे सुटतो, या धास्तीनं तो अर्धमेला झाला असेल !

अशा विविध व्यक्तींच्या विविध मनःस्थितींतील श्वसनांनी तेथली हवा अधिकच उबट आणि कोंदट झाली असावी. अंधार होता तिथं चिलटं घोंघावत होतीं. अन् हें काय !... फुटक्या तावदानाच्या कोपऱ्याला गांधीलमाशांची एक पोळी दिसत होती !

कांही माणसं झुरळासारख्या चरबट पण निरुपद्रवी प्राण्यांना भितात. कांहींना उंदरांची भीति वाटते. बेडूक पाहिला कीं त्याचं ते चमत्कारिक लिबथिबित अग आणि त्याची उडी मारण्याची पद्धति पाहून कांहींजणांच्या अंगावर काटा उभा राहतो. काशिनाथ लहानपणापासून गांधीलमाशांना फार भीत होता. एखादी कुठं

पोळी दिसली कीं, त्यावर माशा असोत वा नसोत, तो सारखा पळत सुटायचा ! आतां ती पोळी त्यानं पाहिली मात्र; त्याचं सबंध अंग शहारलं. आपल्या अस्तित्वाचा सुगावा लागून माशा उठणार आणि आपल्याला खात्रीनं कडाडून चावणार अस त्याला वाटल. तोंच, काय चमत्कार, वाऱ्याच्या एका फटकाऱ्यानं पोकळ झालेलं तावदान हलल, माशा उठल्या आणि एकीनं काशिनाथाच्या हाताचा चावा घेतला !

ओऽह् ! काय ती आग !

ती हळूहळूं कमी होऊ लागली. जागच्या जागींच काय ते थोड चुणचुणूं लागल. आणि काशिनाथ पुन्हां विचार करूं लागला.

माशी चावायाचा अनुभव त्याला नव्हता तो आतां आला ! ज्या गोष्टीसाठीं आपण भितो तिचा प्रत्यक्ष आपल्यावर संस्कार झाल्यावर आपली भीति कमी होते, की वाढते ? शरीराच्या एखाद्या नासक्या भागाचं ऑपरेशन व्हायचं असलं म्हणजे जीव घाबरून जात असावा. पण एकदां कापाकापी झाली की भीति बहुधा कमी होत असली पाहिजे !

म्हणजे काशिनाथाला माशी चावली हे ठीकच झाल तर ! स्कॉटलडच्या रॉबर्ट ब्रूसला तुरुंगांत कोळ्याचं जाळ दिसलं आणि त्यांत त्याला मोठा आशय आढळून आला.

वेदनाखेरीज माशीचा दश काशिनाथाला काय सांगणार होता ?

हें अगदीं निश्चित होतं की, आणखी कांही क्षणानतर काशिनाथाला फौजदारांच्या खोलींत नेण्यांत येणार होतं आणि माफीनामा लिहून घेतला जाणार होता.

माफीनामा ! कांहीं फारशी तापदायक गोष्ट नव्हती !—अमक्या पुढाऱ्याच्या सांगण्यावरून मीं सत्याग्रह केला; चळवळीवर माझा विश्वास नाही; सरकारशीं मी एकनिष्ठ राहीन !—इत्यादि. फार झाल तर आणखी एखाद कलम ! मग खालीं सही ! संपलं ! मग काशिनाथ ह्या खोलींतून कायमचा सुटणार होता. प्रतिष्ठित वकीलाच्या मुलानं आणि होतकरू तरुण वकिलानं काय केलं होतं ? ते सुद्धां अशाच रीतीनं, किंवा थोडासा मार खाऊन सुटले होते आणि काशिनाथहि सुटणार होता तो फक्त माशीच्या दंशाच्या वेदना घेऊन !...

वकिलाचा मुलगा आणि होतकरू तरुण वकील एका अर्थानं कच्चीं मडकीं होती. देशाचं हित व्हावं ही जाणीव त्यांच्यांत होती. पण तें हित आपल्याला धक्का न लागतां व्हावं, आणि ते आपल्यामुळं झालं असं अनायसें भासवितां आलं तर पाहाव, ही प्रवृत्तीच अखेर त्यांच्या ठिकाणी दिसली. ते गेले हें एका दृष्टीनं बरं झाल. चळवळीच्या अंगांतले गळूंच नाहीसें झाले !

काशिनाथाला त्यांचा मार्ग योग्य वाटेना.

चळवळीच्या आघाडीवर लोकहितचिंतक, त्यागशील, आणि ध्येयधर्मी माणसं होती. अमकी गोष्ट केली म्हणजे मनुष्य–समाजाचं हित होईल हे त्यांनी जाणलं होतं. मनःपूत आणि कित्येक दिवसांच्या सखोल आणि सोज्वल चिंतनान उजळ केलेल ध्येय गांठण्यासाठीं ते जीवन वेंचीत होते. इतिहास घडविण्याचं आणि बदलण्याचं त्यांच्यांत सामर्थ्य होत. अशा लोकोत्तर व्यक्तींनीं आरंभिलेल्या कार्याला काशिनाथाच्या माफीनाम्यानं कलंक लागणार होताच, पण त्यापेक्षांहि भयंकर गोष्ट म्हणजे मानवी ध्येयनिष्ठेच्या ठिकऱ्या उडून काशिनाथाची मानसिक पातळी हलकी, हिणकस ठरणार होती !

इतिहास घडविणाऱ्या महापुरुषांच्या जोडीनं कधी काळीं काशिनाथाच्या नांवाचा उल्लेख होण अशक्य असल तरी ज्या असंख्य अनामिकांच्या बलिदानान, आत्मत्यागानं मनुष्यजातीला सुखानं जगतां येईल अशी परिस्थिति निर्माण करतां येणार होती त्या निर्मितीत काशिनाथाच्या सामर्थ्याचा अंश खात्रीनं कारणीं लागणार होता !

◆ ◆ ◆

या विचाराच्या गर्भात केवढ्या समाधानाची आणि संतोषाची बीजं होती ! तो विचार म्हणजे स्वतःला जाणल्याचं चिन्ह होतं. जीवनाचा अर्थ त्यांत गवसत होता आणि ब्रह्मज्ञांनीं वर्णिलेल्या आनंदाचं मूळ त्यांत होतं ! माफीनामा लिहून दिल्यानं ह्या आनंदाला मुकाव लागणार होतं !

तो लिहून न दिला तर पोलिस आपले उपाय योजल्याशिवाय राहाणार नव्हते ! ते उपाय अर्थात् जर्जर करण्याचे असणार . . . !

चालतांना, झोंपतांना आणि पोशाखानं सजवितांना ज्या शरीराला जपायचं, सांभाळायचं. त्या शरीरावर प्रहार घ्यावयाचे. त्याची विटंबना होऊ द्यावयाची

म्हणजे थोडेसे कसेंसेंच नव्हतें का ? कांहीं वेळापूर्वी चावलेल्या मार्शच्या वेदना-पेक्षांहि त्या वेदना अधिक तीव्र असतील ! अंग ठणकेल ! वळ उठतील ! अन् त्याचं पर्यवसान कदाचित् मृत्यूंतहि होईल !

वस्तुजात धडपणे दिसत नाही अशा प्रकाशाच्या त्या अवसानकाळीं आणि जवळजवळ मृत्यूचा सीमाप्रान्त सूचित करणाऱ्या त्या कोंदट खोलींत मृत्यूचे विचार अनपेक्षित नव्हते. तत्त्वज्ञानीं आणि महाकवींनीं मनाच्या कोणत्या अवस्थेंत मृत्यूबद्दल विचार केला असेल तो असो.

काशीनाथाला वाटल, जगत असतांना किंवा जीवनावरील आसक्तीच्या नशेत माणूस मृत्यूबद्दल नीट विचार करीत नाही म्हणूनच मरणाची त्याला भीति वाटत असावी. जीवन समजून घ्यावयाचा प्रसग आला आणि तें तसं समजलं की मृत्यूचं भय वाटायच कारण काय ? मृत्यु फारसा दूर नव्हता. पण त्याला नेता येईल असं काशिनाथाजवळ काय उरलं होत ? जे होतं ते प्रियतम आतेष्टांत वाटल गेल होतं आणि ध्येयासाठी खर्च होत चाललं होत ! तारुण्याची नव्हाळी अद्याप ज्यांतली पूर्णपणे नष्ट झाली नाही असं कलेवर मात्र मृत्यूला लाभणार होत, इतकंच !...

इतक्यात गजाळीच्या दाराच कुलूप वाजल. साखळी खळाळली. पोलीस ? हो, तोच ! त्यानं काशिनाथाला बाहेर काढल आणि फौजदारापुढं आणून उभ केलं. काशिनाथ बराच वेळ अंधारांत होता, त्यामुळं फौजदाराच्या टेबलावरल्या दिव्याचा प्रकाश त्याला फार भडक वाटला. दिव्याजवळ चिमट्यांत अडकविलेली कागदांची चळत होती. लेखनाच साहित्य होतं. बाजूला चामड्याची बारीक छडी होती. आणि या साहित्याचा धनी पाठीमागं खुर्चीवर बसून काशिनाथाकड रोखून पाहात होता. टेबलावरचं लेखन-साहित्य आणि त्याजवळची ती चामड्याची छडी......लेखनासारख्या विचार प्रकटीकरणाच्या साधनावर दडुकेशाही नियत्रण ठेवीत होती हें स्पष्ट दिसत होत ! खुर्चीवर बसलेला माणूस त्यांतलं कोणतं साधन अधिक योग्यतेनं हाताळीत असेल याची कल्पना करतां येत नव्हती ! किंबहुना ती दोन्ही साधनं अशा ठिकाणीं होतीं, कीं जिथं त्यांचा उपयोग योग्य रीतीनं होईल हें सभवनीय नव्हत ! पलीकडं गणवेषांतले दोन पोलीस उभे होते. चटकन् नजर जातांच मनावर दडपण पडावं या हेतूनंच कीं काय त्यांच्याजवळ तिखट असलेली एक टोपली

ठेवली होती. वेताचे लांबसडक लप् लप् करणारे असे दोन फोक दिसत होते. आपल्याला जिंकण्यासाठीं तीं साधनं आहेत हें काशिनाथानं ओळखल.

इतक्यांत फौजदारानं पोलीसाकडं आणि त्यांच्याजवळ सिद्ध असलेल्या छळ करण्याच्या साधनांकड पाहिल्यासारखं करून सौम्य पण हुकमी आवाजांत काशिनाथाला माफीनामा लिहून द्यायला सांगितल.

' शक्य नाही ! '

काशिनाथाचा आवाज कितपत ठिसूळ वाटतो याची कल्पना करून फौजदारानं ओठ चावतां चावतां थोडंस तुसडं हास्य केलं आणि बाजूच्या पोलिसांना कसलासा इषारा केला !

इतिहासाला असे प्रसंग अज्ञात नव्हते. न्याय्य विरोधांचं निर्मूलन करण्यासाठी सत्तांध पाशवी उपाय योजित आले होते. दुर्बल होते ते पिचले आणि खचले होते. इतरांनी ते आघात झेलून आपली ध्येयनिष्ठा व्यक्त केली होती. काशिनाथाच्या मनांत आल, ज्या वेळेवर आपण एवढा विचार केला ती वेळ आलीच अखेर ! शरीराच्या ठिकाणी आतां असं काठिण्य यावयाला पाहिजे की ही छळाचीं साधन उणी पडलीं पाहिजेत ! छळ करणारे थकले पाहिजेत ! या वेळी शक्य तितकीं चांगली दृश्यं आपल्या दृष्टीपुढं असावी म्हणून की काय काशिनाथानं डोळे मिटले. त्या मिटल्या डोळ्यांना उत्तर रात्री त्याच्या खोलीत दिसे तसा सौम्य प्रकाश दिसूं लागला. एखादं रुचिरोष्ण पेय घेतल्यावर मनाला जी एक तरतरी येते तशी तो प्रकाश पाहून त्याला आली. कांही एका विशिष्ट उंच वातावरणांत तो चढूं लागला. माशीचा दंश झाला होता त्या ठिकाणीं त्यान हात लावून पाहिला. दंशाच्या वेदना थांबल्या होत्या की काय नकळे ! त्या त्याला जाणवल्या नाहीत. मग लाल पोपटी बिलवरानी सजविलेला एक सुभग सुंदर हात पुढं आल्यासारखा त्याला वाटला....

तोंच घंटेवर टोले पडूं लागले. सतत पडणाऱ्या ठोक्यांनी तिच्यांतलं सत्व, सर्वस्व मधुर नादक्षेपक झालं होतं ! तिची ती विशिष्ट घडण कायमची झाली होती !

काशिनाथाच्या व्यक्तित्वांत कुठे एखादा कच्चा भाग राहिला असेल तर तो आतां घडला जाणार होता ! ◆ ◆ ◆

# माणूस सुधारला आहे !

**कित्येक** दिवसानतर हिरू आणि मोहनची अखेर सुटका झाली !

दैत्यांच्या बंदिखान्यांतून सुटलेल्या सुरगणांनीं ज्या अपूर्व समाधानान श्वास टाकला असेल, अवतार होतांच दुर्जनांच्या छळानं गांजलेल्या साधुसंतांना परित्राणाचा जसा विश्वास आणि आनंद वाटला असेल, अगदीं तशाच भावनेन हिरू-मोहनचं मन उत्फुल्ल झाल !

या अफाट विश्वांत सदिच्छांना मोहर येऊ शकतो; सत्प्रवृत्ति विजयी होऊ शकतात; दलितांना दुःखहीन, बंधमुक्त आणि उर्जित करणाऱ्या शक्तीचं अस्तित्व संभवतं, या गोष्टीचा त्यांना कडकडून प्रत्यय आला ! आतांची बंधमुक्ति अतींद्रीय, महान् दयाशील शक्तीच्या अनत आणि अनादि कार्याचा एक भागच होतान् काय ! पतितांचीं वांछितं सफल व्हायचीं शुभघटका आली तर ती दुर्दैवाचे डोंगर आणि मानवनिर्मित प्रचड अडथळ्यांनी मुळींच अडत नाहीं !

त्यानीं परस्पराच्या डोळ्याला डोळा भिडविला; अंगाला अग घासलं, अन् संथपणानंच पण अशा ऐटींत पावलं टाकायला आरंभ केला कीं जणूं युगानुयुगाच्या दास्याची अभेद्य कवाडं फोडून ते स्वातंत्र्याच्या प्रांतांत प्रवेश करीत होते ! जणूं जीवनांतील एका कमालीच्या खडतर आणि दुसःह दशेतून ते विमुक्त झाले होते न् अक्षय सुखाच्या आणि आनंदाच्या निधानाकडं चालले होते !

बंध--मुक्तीच्या अत्यंत उज्जीवक जाणीवेचं सुख ज्यांनीं अनुभवल, एक राज्यसंस्था नष्ट झाल्यावर दुसऱ्या अनुकूल अपेक्षित शासन व्यवस्थेसाठी जे साक्ष आणि अधीर झाले, राष्ट्रच्या राष्ट्र उध्वस्त बेचिराख करणाऱ्या महायुद्धाच्या भीषण ज्वाला सहन केल्यावर नेते, विचारवंत, जगाची नवी जोड-घड नीटस

आणि सुरक्षित करतील, अशा ज्यांनी अपेक्षा बाळगल्या, त्यांनाच हिरू आणि मोहनच्या आतांच्या मनस्थितीचं खर रहस्य कळून येणार होतं !

घरांतून बाहेर पडतांच धनी रडला की हंसला तें मागं वळून त्यांना पाहावसं वाटलं नाहीं इतके ते त्या घराला, घरांतील माणसांना, तेथील जीवनक्रमाला कंटाळले होते !

धनी कदाचिद् हसला असेल !...

आपल्या सुखासाठीं अहोरात्र झिजलेल्या दोन निरपराधी जिवांना आपण मनसोक्त जगण्याची संधी दिली, या उदार भावनेचं मनाच्या अगदी थेट तळापासून निघालेल ते हास्य नसावं ! दलितांना समतेनं वागविणाऱ्या उच्च मनोभूमीचा तो विलास नसावा ! असलीच तर त्यांत विकटता, तुच्छता आणि तुसडेगिरीच असावी !

तो कदाचित् रडलाहि असेल !...

हिरू आणि मोहनच्या वियोगाचे ते अश्रु असतील असं म्हणतां येणार नाही ! माणूस केव्हां रडतो ? स्वतःला पीडा झाली असतांना !—पीडितांच्या वेदना पाहून नव्हे ! आपलं जीवन समृद्ध परिपूर्ण करण्याच्या अनावर लालसेंत जे जें हाती येईल तें ते त्यानं राबवल; मिळाल तेवढ अपुरं वाटून अधिकाधिक मिळविण्यासाठी त्याची रात्रंदिवत धडपड चालली होती; त्याच्या इच्छा आकांक्षांचा गाडा उरी फुटेपर्यंत हिरू आणि मोहन ओढीत होते ! त्या क्रमांत खंड पडल्यावर धन्याला रडूं यावं यांत नवल नव्हतं ! गुलामांचा व्यापार बंद करण्याचा फायदा निघाल्यावर दासांची मोडतोड, वटव आणि विक्री करणाऱ्या मोठमोठ्या वखारीवाल्यांनी असेच अश्रु ढाळले नसतील कशावरून ?

त्या घरांतून, त्या राक्षसी धन्याच्या कचाट्यांतून हिरू आणि मोहन एकदाचे सुटले होते अन् प्राण गेला तरी पुन्हां त्या घराकडं फिरकणार नाही, असं मनोमन म्हणत होते !

रंग, रेषा, वाण आणि गुणांनी ते सहोदरच वाटतील इतका त्या दोघांत सारखेपणा होता ! जीवकोटीची जननशीलता पुढं चालविण्यासाठी तें कुठं, कुणाच्या पोटीं आणि कोणत्या दिवशीं जन्माला आले होते याची त्यांना नीटशी आठवण नव्हती ! गुलामीचं जोखड वाहण्याच्या निमित्तानं ते एकत्र आले आणि

सहोदराइतकेच परस्परांना प्रियतम आणि भावनिबद्ध झाले ! नुकत्याच संपलेल्या जीवनांतील हृतदशेतून चालत असतांना खड्डा किंवा उतार आला की हिरू मोहनला व मोहन हिरूला सांवरून धरण्याचा प्रयत्न करीत होता. वेग वाढविण्याचा सौम्य इषारा म्हणून हिरूला फटकारा बसला की इकडं मोहनचंहि अंग शहारत होतं. ओझरत्या स्नेहनिर्भर दृक्पातानं मोहन हिरूला सांगत होता, ' हिरू, धीर धर ! खचूं नकोस ! हेहि दिवस निघून जातील ! '

गुडघाभर चिखलांतून माणसाची नाहीं तर मालाची भरती ओढतांना आजवर जे तगले होते ते केवळ अशाच आधारावर ! क्षणांना युगांची लांबण असलेल्या त्या दास्यांतील एकेक दुर्दिन त्यानी काढला होता तो ह्याच अभंग मैत्रीवर ! त्यांची शरीरं पिचली होती. जोखड झिजून गेलं होतं. पण इतरांना गुलाम करणारी न् गुलामांना निर्दयपणानं वागविणारी वृत्ति मात्र लुप्त झाल्याचं आढळल नव्हतं !

सकाळपासून दिवेलागणीपर्यंत हू का चूं न करतां ते राबत होते. अतिश्रमाचा श्वास उरांत मावत नव्हता. तशांत रातपाळी असली तर कांही विचारूं नका ! निष्काळजीच्या वापरांत उघड्या पडलेल्या कुपीतल्या अत्तराप्रमाणे खिळखिळ्या झालेल्या हाडांतलं चैतन्य केव्हा उडून जाईल याचा नेम सांगवत नव्हता. अवघड चढण आली तर, डुळ पागळ होऊन मटकन् बसायची नाही तर पडायची वेळ येत होती. वरतून फटकाऱ्यावर फटकारे बसत होते. खच्चून भरलेल्या ओझ्याखाली जीव वाऱ्यावर सोडून तोंड वासीत आणि फेंस गाळीत मार्ग आक्रमावा लागत होता. दुखावलेली शरीरं दिवसेदिवस सुकत गेली होती. वाळकी, ओलसर, नाहीं तर सडकी चिपाडं चावीत दात ढिले होऊन गेले होते ! जिथ माणूस माणसाची वाचा जखडून टाकतो तिथं मुक्या जिवांनी आपल्या दुःखांना, आपल्यावर होणाऱ्या जुलमांना कोणत्या शब्दांत वाचा फोडायची होती ? माणसाला मुकं दुःख समजत नव्हतं ? ओळखतां येत नव्हत ? समजत असलच पाहिजे ! कारण हिरू आणि मोहनची सुटका करणारा आतांचा नवा धनी तरी माणूसच होतां ना ! अट्टल दरोडेखोर अथवा गुन्हेगारांना बांधतात तसं त्यानं हिरू आणि मोहनला बांधलं नाहीं. हुकूमशाहीचा दुर्दम्य अहंकार व्यक्त करणारा एखादा दुःशब्द त्यानं उच्चारला नाही; किंवा प्रहारहि केला नाहीं. केवढा भला माणूस ! निर्दोष, निरपराधी आणि निरुपद्रवी जीवांना कसं सदयतेनं वागवावं हें या माणसापासून शिकावं !

अशाच माणसाच्या घरी जन्मोजन्म पाणी भरावं ! जीवनांतला प्रत्येक क्षण त्याच्या कारणीं लावावा ! एवढच नव्हे तर मरणोत्तर पायतणांच्या स्वरूपांत त्याची आणखी सेवा करावी, असं त्यांना वाटलं. त्यांनी हळूच मागं वळून पाहिलं तों खरच, त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांचा नवा धनी शांत निर्विकार मुद्रेनं त्यांच्या मागून हळूहळूं चालत होता. ते चालतील तसं चालवून घ्यायची त्याची तयारी दिसत होती !

वारे माणूस !.....

माणूस–सुधारणेसाठीं हिरू आणि मोहनला दुःखभोगांच्या केवढ्या विलक्षण परंपरेंतून जावं लागलं होतं ! आत्मक्लेशानं गुलाम जेत्यांचा हृदयपालट करू शकत होते तर ! आजवर देहदंड सोसले ते असीम असतील, पण त्यामुळं माणसाचे सद्भाव जागृत झाले होते ही केवढ्या आनंदाची गोष्ट होती !

या आनंदाच्या भरांतच कीं काय पुढं आलेल्या बोळांतून हिरू आणि मोहन अत्यंत सरळ आणि सीधेपणानं चालूं लागले. बोळांत माणसांची ये–जा चालली होती. बाया पाणी वहात होत्या. उनाड नागडी पोर खेळत खिदळत होतीं. एका खोडकर पोरान एक दगड उचलून मोहनच्या रोखान फेकण्याचा प्रयत्न केला. एका जाणत्या माणसानं ते पाहिल न् त्या मुलाला दटावलं. माणूस सुधारल्याचा हा आणखी एक प्रत्यय होता : तो माणूस काय किंवा तें पोरगं काय एका घडकीचहि काम नव्हत. पण माणसं माणसासारखी वागूं लागल्यावर आपण आपल्याहि अंतःकरणांतील सद्भावाचं प्रदर्शन करायला पाहिजे असं वाटून हिरू आणि मोहननं कुणाला कसलाच उपद्रव केला नाहीं. बोळ ओलांडून ते मुख्य रस्त्यावर आले तेव्हां माणसाच्या सुसंस्कृतपणाचीं, दयाशीलतेची आणखी कित्येक विश्वं त्यांना दिसून आलीं !

या मुख्य रस्त्यावरून जातांना न् येतांना त्यांनी आजवर जी दृश्यं टिपली होती, ती माणसाचा अमानुषपणा दाखविणारीं होती !

सृष्टीच्या इतिहासांत असा एक टप्पा आला की तिच्या विकसनांत, क्रमांत आणि स्वरूपांत विलक्षण बदल होत असल्याचं दिसून येऊं लागलं ! मानव अवतरला होता—निर्माण झाला होता न् आपल्या सुखासाठीं सृष्टीचा विध्वंस करीत होता ! मग तो कृषि शिकला न् स्वतः मलिदा खाऊन कृषिकर्मातील

खऱ्या साहाय्यकांना चोथा चारूं लागला ! जमीनींतून धान्य काढणं म्हणजे एका समाजाची ती प्रगति असेल पण सृष्टीच्या खऱ्याखुऱ्या वारसाची ती परागति, दुर्गतिच नव्हती काय !......गिट्टी घालून केलेल्या आजच्या पक्या सडका, सडकेवर दुतर्फी लावलेली झाडं, सडकेच्या बाजूला उभविलेली सुरक्षित उद्यानं या गोष्टी मानवी संस्कृतीच्या प्रगतीचे एकेक फलक तर खरेच ! पण ते उभविण्यासाठीं सृष्टीच्या अलंकारांचा नुसता चुराडा उडाला होता ! भूभाग माणसानं सजविला होता की विद्रूप करून टाकला होता ? भूमि माणसान सुगम केली होती की भूचरांचं जीवन संकुचित करून टाकलं होतं ? माणसाचं सारंच अचाट ! अति मानवी ! दगडांचा चुरा करून तो पायदळी तुडवीत होता; दगडांची शस्त्र करीत होता; न् दगडापुढ भक्तीन मानहि वांकवीत होता ! छायेसाठी झाडं लावीत होता न् पोटजाळ थांबविण्यासाठी त्यांचं दहनहि करीत होता. भोगवृत्तीचा एवढा विविध, विकट आणि नग्न विलास सृष्टीच्या कुशीत खेळणाऱ्या इतर कोणत्याहि प्राण्यांत दिसून येत नव्हता ! अशा अफाट आणि बेफाम भोगांच्या तृप्तीसाठी हिरू आणि मोहनच्या कित्येक पिढ्यांचं, कुळांच साहाय्य घेण्यात आल होत ! तरी माणसाची तृप्ती झाली नव्हती ! मुख्य रस्त्यावरून भरतीच्या गाड्या जोरानं हांकीत नेण्याची चढाओढ चालत होती. अतिश्रमान आणि खायला कमी मिळाल्यामुळं मुर्दाड झालेल्या घोड्याच्या टाग्यांतून माणसं हंसत हंसत जातांना दिसत होती. रस्त्याच्या बाजूचीं एकदोन उद्यानं काटेरी तारा लावून राखलेलीं ! हिरवळीच्या आशेन एखाद्यान शिकस्तीन आंत तोंड घातलं तर पाठीत-बडगा बसलाच म्हणून समजावा ! रिकाम्या अवस्थेंत रस्त्यांत थोडा वेळ उभं राहण्याची चोरी. मग रस्त्याच्या बाजूला वाढलेल्या हिरवळीला तोंड लावू देणार कोण ?

आतांचा देखावा मात्र नेहमींपेक्षां निराळा आणि त्याच मन प्रसन्न करणारा होता.

बागेतल्या तरारून आलेल्या हिरव्यागार गवतावर कुणा एका दफेदाराच जीन लावलेलं घोडं चरतांना दिसत होत ! त्यांचे कांही जातभाई बंधनहीन, मोकळ्या अवस्थेंत आणि मजेत चालले होते. हिरू आणि मोहनला पाहून त्याच ऊर आनदानं भरून आलं असाव ! बेंबीच्या देठापासून निघाल्यासारखी वाटणारी एक उच्च रवांतली साद त्यांनी घातली. हिरूनं न् मोहननंहि प्रत्युत्तर

करून क्षेमकुशल सांगितलं. रस्त्यावर ज्या चाकोऱ्या पडल्या होत्या त्या माणसं खडक घालून बुजवीत होते. गुलामांना राबवून माणसानं जमीन झिजविली होती. आपल्या जुलमी वृत्तीची माणसाला आतां लाज वाटत असली पाहिजे! म्हणूनच रस्त्यावरील चाकोऱ्या तो आतां भरून काढीत असावा न् काय! या इकडं एका घरापुढं एक खिल्लारी जोडी थाबली होती! घरमालक जोडीची पूजा करीत होता. न् काय आश्चर्य! त्यानं भक्तीनं हातहि जोडले होते. माणूस चतुष्पादाचं पूजाविधीसह स्वागत करीत होता! त्या समोरच्या घरापुढल्या गोठ्यांत एक काळी पुष्ट गाय वेणा देत होती. प्रसूतिवेदना तिला सहन होत नसाव्या. तिचा सारखा तडफडाट चालू होता. बाजूला एकदोन माणसं होती न् त्यांचे चेहरे चिंताग्रस्त होते. आणखी एक माणूस आला न् त्यान मोठ्या हिकमतीनं गायीची सुटका केली! बछडा होतांच तिनं पटकन् तोंड फिरवल न् त्याला चाटायला आरंभ केला. चाटतां चाटतां ती माणसाकडं अत्यंत कृतज्ञतेनं पाहात होती! ... धन्य मानव!...

केवळ माणसाच्या कृपेनच तिची सुटका झाली होती न् तिला तिचा बछडा पाहायला मिळाला होता! हिरूनं मोहनकडं पाहिल न् सुचाविलं,

'पाहा! माणसाच्या दयेचे सुप्त असलेले झरे आज कसे उसळून येताहेत!'

बाजाराच्या रस्त्यावर कांही हिरव्याचार गवतांचे भारे दिसत होते. भाऱ्याचे धनी हातांत काठ्या घेऊन बसले होते एवढा चांगला धनी मिळाल्यावर या राखीव गवताकडं तोंड वळवून मनाचा क्षूद्रपणा कां प्रगट करायचा होता? त्यागाची अन् इंद्रियनिग्रहाची हिरू आणि मोहनला संवय नव्हती असं नव्हे! हेमांगिनींच्या गराड्यांतून निर्विकार चालत जावं तसं ते पुरुषभर वाढलेल्या हिरव्याचार पानांतून तोंड बांधून येऊं शकत होते! प्रसाधन-युक्त आणि कामपीडित होऊन 'या या' म्हणून बोलवणाऱ्या नखरेल वारयोषितांच्या मोहल्यांतून निर्लेप आणि अविचल निघून जावं तसं ते चारा–बाजारांतून किंवा कडबामंडईतून इकडं तिकडं दृष्टिक्षेपहि न करतां आले होते! नाहीं तर बाजारांत फिरणारा हा माजरा मस्त बोकड पाहा! तो गरीब शेळ्यांना बेजार करीत होता; येण्याऱ्या जाणाऱ्यांना ढुसण्या मारित होता; अन् दुकानदाराचं जरा कुठं लक्ष ढळलं की सरळ दुकानांत चढून डाळ, तांदूळ, गहूं, ज्वारी, जें दिसेल तें दोनतीन काठ्या बसेपर्यंत खुशाल खात होता!

गुंड !...

डाके आणि डल्ले मारून चरितार्थ चालवणं म्हणजे जगणं नव्हत !

तो समोर दिसताच हिरूनं न् मोहननं तुच्छतेचा फूत्कार टाकला. अशा गुंडगिरीची त्यांना संवयहि नव्हती, अन् तसा जीवनक्रम त्यांना आवडेल हे शक्य नव्हतं !

इतक्यांत धन्यानं बाजूच्या रस्त्यानं वळायला त्यांना सुचविलं. मोहननं कान टवकारून हिरूकडं पाहिलं न् म्हटलं,

'आलंय वाटतं आपल नवं घर ! आजची ही पर्वणी आपण फार मजेत घालवूं ! आपलं पूजन होईल अन् सत्कारासाठी चांगले खाद्य पदार्थ आपल्या-साठीं तयार असतील !'

वळण घेतल्यानंतर ते एका पडक्या घरांत शिरले आणि समोरच्या पटांगणांत त्यांनीं पाहिल. तों काय ? अत्यत हृदयभेदी असं दृश्य होतं ते ! झाडाला बांधलेल्या एका बैलावर सुऱ्या चालविण्यांत येत होत्या. माशांचा भला मोठा जमाव घोंघावत होता. कावळे कावकाव करीत होते. ताजं मास घेण्यासाठी कांहीं माणसं थाबलीं होती !

आपण रस्ता चुकलो की काय अस वाटून ते घाईनच परतणार तोंच आतां-पर्यंत साळसूद वाटणाऱ्या धन्यानं आपला बडगा उचलला !

बिचारे हिरू आणि मोहन !...

इकडं तिकडं वाट शोधण्यासाटी ते धडपड करीत आहेत तोंच आणखी एकानं येऊन त्यांना गळफास घातला. अवसानकालचा, चित्शक्ति सांभाळण्याचा एक शेवटचा प्रयत्न म्हणून खूप मोटा 'आ' करून विश्वांतील साऱ्याच तारक शक्तींना त्यांनीं हांक घालण्याचा प्रयत्न केला. पण फासोळया झालेल्या त्यांच्या शरीरांत हांक उमटण्याइतकंहि त्राण उरलं नव्हतं ! भयाकुल, दीन आणि हताश दृष्टीनं ते इकडं तिकडं नुसते पाहात होते ! त्यांना पाहावतहि नव्हतं ! तशांत एक कावळा हिरूच्या अंगावर बसला न् जोराचा लचका तोडून साथीदारांना म्हणाला,

'पठ्यांनो थांबा ! बैल दिसायला मरतुकडाच असला तरी याच मांस मोठं चवदार आहे ! माणूस आपल्याला आज मेजवानी देणार असं दिसतंय् !'

**हिरू आणि मोहनचा अर्धा अधिक जीव निघूनहि गेला होता ! ◆ ◆ ◆**

# ‘ प्रेम केलें, आणि ........’

**तेज** हेच जिच जीवनसर्वस्व अशी ज्योत आणि, उज्वल प्रेमानं अंतर्बाह्य झगमगत असलेला काच यांच्या सहजीवनांत बाह्यतः एकता दिसली तरी खरा प्रकार निराळाच होता.

आपण फार उच्च कुळांतले आहो, आपल्याला फार महान् कार्य करायचं आहे, आपल्यावर प्रेम करण्याची कुणाची पात्रता नाही, या अभिमानाच्या आणि विचाराच्या तेजानं ज्योत नुसती फुलून जात होती ! त्या रूपरंभेचं लावण्य रम्य तेवढंच दाहक ! दुबळ्या विषयांचे उद्रेक तिच्या जवळपास फिरकतील हे शक्य नव्हतं. प्रणययाचनेची लाघवी भाषा स्वप्नांत देखील ऐकून घ्यावयाची तिची तयारी नव्हती ! एखाद्या प्रणयविव्हलाला तिच्या अंगाला ओझरता स्पर्श करण्याचंहि धाडस होत नव्हतं ! सामान्य दृष्टीला तिच्या दिव्याकडं क्षणभर पाहावतहि नव्हतं !

काच मात्र तिच्या प्रीतीचं आराधन करूं लागला. तिच्या तेजस्वितेचं संरक्षण आणि संवर्धन व्हावं म्हणून श्रमूं आणि झिजूं लागला. तिच्या हंसण्यांत आणि रुसण्यांत, तिच्या रागांत आणि अनुरागांत रमूं आणि रंगूं लागला. तिची प्रभा, प्रसन्नता आणि सौंदर्य स्वतःमध्यें मुरवायची त्याची प्रतिदिनी तपश्चर्या चालू लागली. ज्योतीनं नेत्र उघडायला उशीर, काचेलाहि रम्य जागृति येऊन जिकडं तिकडं प्रकाशाचे स्रोत पसरूं लागले. या जागृतीनं विश्वांतील साऱ्या मंगल सतेज शक्ति उज्वल राहूं लागल्या. क्षण असेहि येऊं लागले कीं, ज्योतीची दीप्ति कोणती आणि काचेची सोज्वलता कोणती यांतला भेदहि स्पष्ट राहिनासा झाला.

प्रसंग पाहून काच आपलं मन आणि मनोगत उघड आणि व्यक्त करूं लागला. तिरस्कारानं न् संतापानं अशा वेळीं ज्योत लालीलाल होऊं लागली.

मृण्मय, तकलुबी काचेनं आपल्यावर प्रेम करावं ही कल्पनाच तिला सहन होईना. अत्यंत दाहक आणि प्रखर असे कटाक्ष टाकून ती पुन्हां आपल्या रूपमदात धुंद फुंद होऊन बसूं लागली !

तिची प्रसन्नता नाही तर नाही, आपला प्रेम करण्याचा हक्क तर हिरावला जात नाहीं एवढ्याच समाधानावर काच जगूं लागला. तिचं प्रेम लाभलं तर कित्येक विश्वं उजळ करून टाकूं, न लाभलं तर आपल्या ज्वलनानं तिचा मार्ग उजळूं हा उदात्त विचार त्याला चैतन्य पुरवूं लागला.

◆ ◆ ◆

ते समाधान आणि तो विचार फार दिवस तगले नाहीत. ज्योतीची असमाधानाची आणि तिरस्काराची आग वाढत जाऊन एके दिवशी तिनं रुद्र रूप धारण केलं. आगीचा नुसता भडकाच नव्हे तर मोठमोठे लोळ उठणार असं वाटूं लागलं. धुरानं दिशा धुंद होणार कीं काय असं वाटूं लागलं. काजळानं सारं सभोवताल अंधारून गेलं !

निराशेनं आणि प्रणयविकलतेच्या दुःखानं काचेचं हृदय एकदम दुभंगलं !

'रूपगर्विते !' अखेर तो म्हणाला, 'मीं प्रेम केलं, जगाला तुझं सौंदर्य उठून दिसावं म्हणून सारखा जळत राहिलो, नाना तऱ्हेचे कलंक सहन केले. पण तूं त्यांची दखल घेतली नाहीस ! डोळे उघडून पाहिलं असतस तर या दहनाच्या तेजांत माझे मनोभाव तुला दिसून आले असते ! लक्षांत ठेव, माझ्या प्रीतीला कांही अर्थ असेल तर एक क्षण असाहि येईल कीं माझ्यावांचून तुझ्या लावण्याला तेजाची धार चढणार नाहीं. ती कदाचित् तशी चढली तरी क्षणभरहि टिकणार नाही ! ......'

काचेच्या अन्तःकरणाचीं अनेक शकलं झाली तेव्हां खरंच ज्योतीचं अस्तित्वहि निराधार आणि नष्टप्रकाश झालं ! ◆ ◆ ◆

# ते तिघं आणि ती—

'**माळ झिपरी**' मौज्याच्या आबाराव पटवाऱ्याचा एका काळीं मोठा 'जलजलाट' होता. बारा गांवचं पांडेपण एका टाकावर चालवायचं अन् तीन तीन मामलेदारांच्या दौऱ्याची सरबराई एकाच वेळी करायची, म्हणजे सामान्य गोष्ट नव्हती. गांवागांवाचे सर्वे नंबर न् त्यांतल्या आणेवाऱ्या आबारावाला नुसत्या मुखपाठ ! गांवांत तो करील तें मुकाटपणानं गांवकऱ्यांना मानून घ्यावं लागत होतं. कुळकर्णी महाशयांच्या नैवेद्यांत थोडी कुठं ढिलाई न् दिरंगाई झाली की आपण ठार बुडलो असं एखाद्या जमीनजुमल्याच्या मालकानं किंवा मालकी हक्क सिद्ध करूं निघालेल्या वारसानं खुशाल समजावं ! आबारावाचं मोडी अक्षर जातीच्या पटवाऱ्याला साजेल असंच ! त्याचं वळण जसं किचकट तसंच कावेबाज ! तहसील कचेरींत शिरूं लागलेल्या बिनमिशीच्या नव्या पिढीला मौज्यांचे न् बुजुर्गांचे रोजनामचे ( Diaries ) न् रिपोर्ट वाचतां वाचता घेरी यावयाची. विशेषतः माळझिपरीहून आलेल्या रिपोर्टांतले तर 'मेहेरबान मामलेदार हुजुरास' एवढी अक्षरं काढतां काढतां डोळे पांढरे व्हायची वेळ यावयाची !

पाटील–पटवाऱ्यांचा काळ समजला गेलेल्या फरीदसाहेब मामलेदाराचा जमाना होता. माणूस दंडेबाज न् तोंडाचा फटकळ ! एकदां 'डोंगरकामठ्या'च्या चावडीपुढं फरीदसाहेबाचा डेरा पडला. कामठ्याचं कुळकर्णीपण त्या सालीं आबारावानं केलं होतं. कांहीं पळवापळवीच्या न् पट्टेदारीच्या मामल्यांत ज्यांच्या तोंडाला नुसतीं पानंच पुसली गेली अशा असंतुष्ट लोकांकडून आबारावाविरुद्ध निनांवीं दरखास्ती ( अर्ज ) तहसिलींत येऊन आदळल्या होत्या. इतर गांवांप्रमाणंच आबारावानं कामठ्याचं दप्तर पूर्ण ठेवलं नव्हतं. 'नगदीनवीस', 'पेशकार' अन् इतर सटरफटरांच्या पिंडाला गेल्या दोनतीन वरसांत आबारावानं कावळा

शिवूं दिला नव्हता. म्हणून खोडसाळ तक्रारींना भलता भाव येऊन कामठ्याचा ' इस्कील ' ( Scale ) बरायदा ( with-held ) झाला न् चौकशीसाठीं फरीद-साहेब दौऱ्यावर आले.

रुबाब टाकण्यासाठीं प्रथम बिगारीच्या महारांना झोडपण्यांत आलं. ' कुठ आहे पटवारी ? ' ' आणा पाटलाला बोलावून ! ' अशा पट्टेवाल्याच्या चढेल हांकांनी कामठ्याचं वातावरण थरारून गेलं. गांवकऱ्यांना न् फरीदसाहेबाबरोबर आलेल्या कारकुनाला वाटल : बस, आबाराव पटवारी आतां कायमचा उखडला जाणार !

अधिकाऱ्यांच्या जन्मजात गरम रक्तांतल्या जतूंच्या तुष्टीसाठीं कोणते शामक उपाय योजावे याची आबारावाला चांगली माहिती होती. फरीदसाहेबापुढं येताच आबारावानं एक दरबारी सलाम ठोकला, अंगावर बेफाम कापर चढल्याचा बहाणा केला. साहेब शिव्यांची सरबत्ती सुरू करणार इतक्यांत लोणकढ्या तुपाचे दोन डबे डेऱ्यापुढून भटारखान्याकडं नेण्यांत आले. डबे वाहणाऱ्या महारांना आबारावानं वरपांगी दटवल,

' पिऱ्या ! डबे हिसळू नकोस ! ताज तूप आहे. जमिनीवर एक थेंब सांडला तर कमर मोडलीच म्हणून समज ! '

लगेच एक कोवळ कोकरू साहेबापुढून सरकविण्यांत आल.

खलास !

एवढा फटकळ फरीदसाहेब ! पण कांहीं घडल नाही. कामठ्याचा अडलेला स्केल ताबडतोब हजरा ( Refund ) व्हावा अशा अर्थाची गुर्की साहेबान कारकुनाला दिली, आणि तक्रारी करणाऱ्या मेळाव्याला शिव्यांचा आहेर करून हांकलून लावलं !

भानगडी न् उलाढाली करण आबारावाचा स्वभावच होऊन गेला होता. माळझिपरीजवळ असलेल्या बोरपिंपरी गांवाचा शामराव देशमुख अफाट जमीन-जुमला न् तरुण बायको निपुत्रिक टेवून वारला. विधवाबाईन आबारावाच न ऐकतांच भलताच इसम दत्तक घेतला. इस्टेटीचा रीतसर पट्टा होण्यापूर्वीच आबारावान आपल्या बायकोच कुकू पुसून तिला कोर्टांत उभं केलं न् आपल्या दत्तक विधानाच्या साक्षी पटविल्या. खऱ्या खोट्या वारसात सनदशीर आणि पठाणी भांडण सुरू झाल. वर्षे निघून गेलीं. हायकोर्टांत फैसला उलटा लागला.

तेव्हां आबाराव पैशानं पुरेपुर गळहाटला होता. मग शामरावच्या दत्तकाच्या खुनाची भानगड मिटवितां मिटवितां आबारावाचं दिवाळं वाजलं होतं !

◆ ◆ ◆

'वाह्यात वकील' म्हणून मार्तंडराव माळझिपरीकराचं नांव सबंध 'हिंदळक्यांत' डंक्यावर होतं. जुने वकील आणि तत्संबंधी विनोदानं सांगत की, एका वर्षी वकिलीच्या परीक्षेला अडीचशें उमेदवार बसले होते. अन् निकालाच्या फलकावर तीनशेचीं नांव झळकलीं होती ! या बादसंख्येतील पदवीधरापैकी अर्थात् मार्तंडराव एक होते. अशा रीतीनं कायद्याच्या प्रान्तांत जबरीनं घुसून मार्तंड-रावांनी कित्येक दिवस धिंगाणा घातला होता. बापूराव सोनचाफेकर फौजदारीत निष्णात होते. गोविंदराव फुलंब्रीकर दिवाणी भानगडीतले तज्ञ समजले जात. पण फौजदारी अथवा दिवाणी अडेल किंवा पडेल कारवाया, 'बहसाची' (Pleading) मूजोरी किंवा कायद्यांच्या संदर्भाची उलथापालथ न करतां कशा जिकून घ्याव्या हे कसब मार्तंडरावाजवळ होत. इतका हिकमती न् मतलबी माणूस तत्कालीन वकीलांत आढळणं शक्य नव्हतं. पत्र जारी करणाऱ्या एखाद्या साध्या कारकुनाजवळ अवश्यक त्या पत्राचा नंबर न् तारीख घेण्यासाठीं मार्तंडराव आला की, आपण फुकटे वकील नाहीत हें सिद्ध करण्याकरतां, कारकुनाच्या खिशांत तो झोकांत रुपया टाकायचा, अन् काम काढून घ्यायचा. घरी येऊन कारकुनानं आपली मिळकत काढून पाहिल्यावर त्यांत एक बद्दा रुपया आढळल्याशिवाय राहात नसे !

काळ फिरूं लागला तशीं मार्तंडरावाची सारी सोगं उघडी पडूं लागली. कर्ता मुलगा महारणीच्या नादी लागून निःसंग झाला. नाकं फेदारणारी L.L.B. झालेली पिढी मुनसफींत चरूं लागली. अन् तेजीच्या काळांतली 'सर्वांगीन' विलासाची न् ऐषआरामाची जडलेली संवय न सोडतां आल्यामुळं मार्तंडराव कफल्लक न् कर्जबाजारी झाला !

◆ ◆ ◆

सावळारामपंत देशमुखांच्या भव्य वाड्यावर सकाळ अगोदर उतरत होती की काय नकळे !

राधाकाकी पाकमंदिरांत अग्नि सिद्ध करून थांबत होत्या. वाडा म्हणजे पंधरावीस मंडळींचा कारखाना होता. अन् तो दिवसभर चालू ठेवण्यासाठीं राधाकाकी चेतना निर्माण करीत होत्या अन् जागृत ठेवीत होत्या. देखमुखांच्या घरांत अप्पासाहेब, अण्णासाहेब, बाईसाहेब, ताईसाहेब, असा सारा साहेबी मेळा होता. आठ तास चुलीपुढं बसून काढणारी राधाकाकी या सर्वांची अन्नपूर्णा होती !

बाहेरच्या दिवाणखान्यांत अर्धे दांत पडलेल्या तोंडांतल कांहीस बोबड पण खड्या आवाजांतलं प्रातःस्तोत्र ऐकूं आलं की, सावळारामपंत मुखमार्जनानतर चहासाठी येताहेत असं समजून, राधाकाकींना लहानशा पातेल्यांत चहाच स्वतंत्र आधण ठेवणं अवश्यक होत होतं. अर्ध्या पाऊण तासानं धाकटे साहेब, बेबीराजे आणि अण्णाराव उठत. काफी, कोको आणि निरसं दूध, अशा तिघांच्या वेगवेगळया आवडी असत. मग, म्हणायला थोरल्या पण दिसायला पोरसवदा अशा मोठ्या बाईसाहेब रात्रीचा चुरमळलेला शृंगार तसाच अंगावर वागवीत पाटावर बसत. ‘ चहा अजून तयार नाही का ? ’ म्हणून विचारीत. मग बाळंतघरांत तूपभात पाठवायची राधाकाकींना तयारी करावी लागे. तीन तीन महिने सासुरवाडीला तळ देऊन थांबणारे सावळारामपंतांचे मधले जामात सौभाग्यवतीसह केव्हां खाली येतील याची एकीकडे वाट पाहात शाळकरी मडळींच्या तात्पुरत्या पंगतीची राधाकाकी सिद्धता करूं लागत. ही पंगत उठली की मथुरा मोलकरणीनं चिरलेली भाजी पुढ्यांत ओढून काकी दुपारच्या स्वयंपाकाला पहिल्यापासून सुरवात करीत. सकाळीं सहापासून दुपारीं दोन वाजेपर्यंत चाललेला हा अन्नब्रह्माचा होम संध्याकाळी साताला पुनः प्रज्वलित होऊन रात्रीं अकराला विझत होता. एकेकाच्या जेवणाच्या तऱ्हा तरी किती विलक्षण ! कांहींचे पदार्थ तुपाच्या फोडणीचे असत; कांहींना आंबट चालत नसे ! अन् कांहींजणांच तर आंबटाविना चालायचं नाहीं. पांच माणसांचे पंचवीस पदार्थ, असा प्रकार असे !

या रांधण्याच्या रगाड्यांत राधाकाकी त्रासलेल्या अथवा कटाळलेल्या दिसत नव्हत्या. सकारण त्या कधी सानंद दिसल्या आहेत असंहि सहसा आढळत नव्हतं. रोगण उडून गेलेल्या स्लेट पाटीवर लेखणीच्या रेषा आकार धरीत नाहींत. तद्वत् विचार, विकार, हर्ष, क्लेश, यांच्या छटा राधाकाकीच्या चेहऱ्यावर उमटत नसत. गेल्या कित्येक दिवसांपासून त्या सावळारामपंताकडं स्वयंपाकीण म्हणून होत्या.

स्त्रीच्या स्वभावत:च हळूवार मनाला चटकन सहर्ष अथवा सखेद करणारे प्रसंग त्या मोठ्या कुटुंबांत येऊन गेले होते. सावळारामपंतांनीं नवी बायको करून आणली होती. ती तेथल्या वैभवाला पूरक ठरेल अशी रूपवती होती. झळझळ करणार वस्त्र लेवून, लखलख नथ हालवीत वायनं द्यायला निघालेली ती साक्षात् लक्ष्मीच पाहून वडीलधाऱ्या स्त्रीजनांचे डोळे कौतुकानं न् आनंदानं न्हावून निघाले होते. राधाकाकीनंहि तें पाहिलं होतं. पण त्या निर्विकार राहिल्या होत्या. पुढं, कांही दिवसांनी बाईसाहेबांना मूल झाल. गांवभर साखरपानं वांटली गेली. काळ जाऊं लागला तस तें मूल हंसूं बोलूं लागलं. 'लाधाकाकी चहा द्याना !' अशी प्रेमळ हांक घालूं लागलं. एके दिवशी त्याचा अत झाला. कोवळ्या पोराचं प्रेत पुढ्यांत घेऊन बाईसाहेब न् सावळारामपंत हृदयाला हालवून सोडणारा आक्रोश करीत होते. हा सर्व प्रकार राधाकाकीनं संथ दृष्टीनं पाहिला होता न् मग त्या माजघराकड वळल्या होत्या. जणूं आत्मप्रसाद अथवा आत्मक्लेश प्रगट करायची तऱ्हाच त्यांना अवगत नव्हती ! समुद्रांत बुडाल्यावर अथवा डोंगराखाली चिरडल्यावर माणसाला हूं कां चूं करतां येणं कसं शक्य आहे ? आत्यंतिक दुःखाच्या दडपणांत त्यांची अशीच अवस्था झाली असावी. दुःख हेंच ज्याच दर्शन, क्लेश हाच ज्याचा दृष्टिक्षेप, आणि दहन हाच ज्याचा उच्छ्वास असच जीवनाचं स्वरूप त्या नेहमी पाहात आल्या होत्या; नि त्याच्या कष्टांतून आणि त्रस्त जीवनांतून ईश्वर त्यांची कधी सुटका करणार होता कोण जाणे !

◆ ◆ ◆

तेथल्या सुप्रसिद्ध राममंदिरांत देवादिकांचे जन्मोत्सव साजरे होत होते. नवनाथ, भागवत, पांडवप्रताप, हरिविजय, गुरुचरित्र, अशी दासमहाराज पुराणिकाचीं बारमहा तिथं पारायणं चालत होती. चुलीपुढून सुटका होतांच राधाकाकी नियमानं पोथीला येत होत्या. तेथं जमलेल्या सुवासिनींची अथवा संसारविमुक्त स्त्रियांची आपसांत कौटुंबिक सुखदुःखाची सभाषणं चालत. चढेल सुनांची अथवा मर्जीबाहेर वागणाऱ्या मुलांची कागाळी करायला किंवा शेजारणीवर निंदेची आग पाखडायला मंदिराखेरीज दुसरं पवित्र स्थळ कोणतं होतं ? आणि पोथीखेरीज योग्य वेळ तरी कोणती होती ! सांसारिक बुजबुजाटांतून शक्य तों परमार्थाकडं मन लागावं म्हणून मंदीर आणि पोथी–पुराणाचा उद्देश होता. पण संसारांतलं सारं असार सार–सर्वस्व समजून तिथंच चर्चिलं जात होतं !

राधाकाकींचं या गोष्टीकडं लक्ष नसे. त्यांचे डोळे दासमहाराजांच्या चेहऱ्यावर खिळलेले असत. देवांना देखील दुष्टांनीं छळलं ! मानवी संसारांतहि दुष्ट माणसं असावीं याचं नवल काय ? दुष्टांच्या निर्दालनासाठी देवादिकांनीं आचरिलेल्या कपटनीतीच सुश्राव्य विश्लेषण करणारा, डोक्याला रेशमी कानटोपी घातलेला, अन् गळयांत सोन्याच्या तारेंत गुंफलेल्या रुद्राक्षाची माळ वागविणारा तो तेजःपुंज भव्य पुराणिक पुराणकालची सारी जप–तपादि साधनं आणि सामर्थ्यं घेऊनच अवतरला होता कीं काय न कळे !

बाहेरच्या बारवेवर पदक्षालन करूनच मोठ्या मंदिराच्या गाभाऱ्यांत प्रवेश करावा त्याप्रमाणं राधाकाकी पुराणिकाच्या चेहऱ्याकडं पाहात पाहातच देवांच्या अवतारकथांत तल्लीन होऊन जात. समाप्तीचा दिवस मात्र साऱ्या भौतिक वेदनांचा भडका उडवीतच उगवत असे कीं काय न कळे !

शेवटचा अध्याय सपून आरती झाली की, रेशमी फडक्यांत गुडाळलेली दास-महाराजांची पोथी पुष्पभारानं झांकून जावयाची. फळांनीं न् सुम्रणीनी भक्तीनं करून आणलेल्या पूजा–प्रसादाच्या विविध साहित्यानं भरलेल्या कित्येक थाळ्या दासमहाराजांपुढ रिचविल्या जायच्या. महाराजांचं पूजेचं भलं मोठं चांदीचं ताट दक्षिणेनं भरून जावयाचं. रमाबाईचे सात रुपये पडत ! देशपांडे–बाईच्या हातून पांच रुपये छणछणत. सावळारामपंतांच्या थोरल्या बाईसाहेब, एरव्हीं नाही तरी समाप्तीच्या दिवशी, भारी शाल पांघरून, विणलेल्या रुमालाखाली झाकलेलं प्रसादाच चांदीचं ताट घेऊन, वैभव आणि सौभाग्यान अलकृत असं सौंदर्य जणूं उधळीतच प्रवेशत ! आणि आठ नऊ चकचकित नाणीं दास-महाराजांच्या थाळीत झोकांत टाकीत. त्यांचा खण्ऽऽ असा आवाज बराच वेळ चालू राही. तो आवाज राधाकाकीनाच नव्हे तर रेशमी फडक्यांत गुंडाळलेल्या पोथीतल्या प्रत्येक ओवीला आणि ज्याच्या गुणगानानं ती शब्दमाला सार्थ सुश्राव्य झाली त्या सर्वशक्तिमानाच्या कानावरहि गेला नसेल कशावरून ? मोक्षाची दारं बाईसाहेबांसाठीं न् बाईसाहेबासारख्यासाठी खात्रीनं खुलीच राहात असली पाहिजेत.

बाईसाहेब आलेल्या दिसल्या कीं दासमहाराजांचा चेहरा केवढ्या समाधानानं झळकत असे. राधाकाकी नमस्कारासाठीं पुढं आलेल्या दिसल्या की मात्र महाराज तुच्छतेनं पाहात कीं काय न कळे ! तिथं सुभगेचं सौंदर्य नव्हतं, तसं सधनतेचं समाधानहि नव्हतं ! अशा दग्धेकडून दक्षिणेची अपेक्षा ठेवतां येणार होती ?

‘ दरिद्री थेरडी ! कशाला पुढं आली कुणाला ठाऊक ! थाळींत काय टाकणार —तर चवली नाहीं तर पावली ! ’

अशा तऱ्हेचा उपहास महाराज निःशब्द व्यक्त करीत असावे ! ही कल्पना मनांत येतांच राधाकाकी थरथरत हलकेच त्यांच्या थाळींत लहानसं नाण टाकीत. किती लहान ते नाणं ! त्याचा आवाज देखील नीट होत नसे ! अन् इतर चकचकित नाण्यांच्या गराड्यांत तें कुठल्या कुठं नाहीसं होऊन जाई ?

मग तीर्थप्रसादासाठी राधाकाकी आपला हात पुढं करीत. भिकाऱ्याच्या झोळीत नाखुषीनं भाकरीचा तुकडा कसा तरी झोकावा त्याप्रमाणं महाराज भसकन् प्रसादानं मूठ भरून काकीच्या हातावर झोकल्यासारखी करीत. अन् खरंच; महिनाभर पोथी ऐकून अखेर चार आणे टाकणाऱ्या एका भिकार भक्तिणीला प्रसाद दिला अथवा न दिला काय, सारखाच ! प्रसाद भक्षण करून देखील अशा करंटीला मोक्ष मिळेल हें कुणी सांगावं ?

लगेच भासमान आवाजांतले शब्द राधाकाकीच्या कानीं पडत,

‘ महान् दानशूर म्हणून कीर्तिरूप उरलेल्या भुजंगराव माळझिपरीकराची बायको राधा— दासमहाराजासारख्या देवरूप माणसाला दक्षिणा काय टाकते तर, चवली नाही तर पावली ! कुठं तो उदार महात्मा आणि कुठं ही कगाल वृद्धा ! स्वर्गात पाय ठेवायचा तरी हिला अधिकार आहे ?...अन् ही म्हणे जीवनांतून मुक्त होऊं इच्छिते ! ’...

काळजाच्या गाभ्यालाच कुणी हात घालावा तसं काकीचं होई. त्यांचा कांहींच उपाय चालत नव्हता. शरीर अक्षरशः जाळूनहि पैशाची बचत होत नव्हती. स्वयंपाकाचं जें वेतन मिळे ते वस्त्रांत आणि घरभाड्यांत संपून जाई. जे उरत असे तें दासमहाराजांच्या प्रतिष्ठेला अत्यंत तोकडं वाटे. किंबहुना त्याला दक्षिणा असं म्हणतां येत नव्हतं !

मग राधाकाकी कुठं तरी निरवधान, डोळे ताठ ठेवून पाहिल्यासारख पाहात बसत. स्मृतिमग्न असतांना अथवा खोल विचार करतांना जी अंतर्बाह्य निश्चलता, एकाग्रता येते तशी त्यांना येई !

कित्येक दासमहाराजांवर आपल्या दातृत्वाचा अखंड वर्षाव करतां येईल अशी एका काळीं राधाकाकींची परिस्थिति होती. पण दुर्दैवाबरोबर खलजनांनीहि

त्यांच्याशीं दावा साधला होता. संसार सुटल्यावर मुक्ति–मार्गावरहि मुक्तपणानं जातां येत नव्हतं !

मग त्या मनोमन म्हणत,

' रामा ! तुझ्या पायांवर जें अर्पण करतां आल असत ते हिरावून नेल जाईल अशी तूंच व्यवस्था केलीस ना ! या दासमहाराजांच्या रूपानं तूंच कां छळतों आहेस मला ? तुला माझ मन कां पाहायच आहे ? मग हो तयार अन् घे मजकडून मी इच्छिते ते कार्य करून ! '

◆ ◆ ◆

एका तीन खणी भाड्याच्या खोलीत राधाकाकी मृत्युशय्येवर पडल्या होत्या. सावळारामपंतांच्या वाड्यातला गाडा मालगाडीपेक्षांहि कमी वेगान शक्य तेवढ्या त्रासानं चालू लागला होता. थोरल्या बाईसाहेबांकडून प्रकृतीची सारखी चौकशी होत होती. औषध–पाण्याला शिवायचं नाही असा राधाकाकीचा निर्धार होता !

राधाकाकीच्या आजाराची कुठून कशी बातमी फुटली असेल ती असो; त्याच्या समाचारासाठी माळझिपरीकर बंधुद्वय मात्र धांवून आले होते !

वडील घरापैकी राधाकाकी हाच काय तो शेवटचा दुवा होता. काकींच न् दिरांच कधीं पटलं नाही तरी ऋणानुबधाचा जिव्हाळा अशा वेळी नाहीं तर केव्हां प्रकट करायचा !

बंधुद्वयांनी पाहिलं तों काकीची अत्यत वाईट अवस्था झाल्याचं त्यांना दिसल. काकीच्या शरीरांतलं चैतन्य नाहीस झाल होत. डोळे हालत होते म्हणून प्राणज्योत आहे असं मानतां येत होत !

आबारावानं गळा भरवून म्हटलं,

' अग वैनी ! जुनी भांडणं, रागलोभ सोडून सरळ माझ्याकड येऊन राहिली असतीस तर ...... '

मार्तंडरावानं मध्येच वकिली केली,

' पण मी एथून कांही फारसा दूर नव्हतो ! दोन पैशाचं कार्ड तीन तासांत मिळतं मला ! वैनी, अजून तरी आपला हट्टी स्वभाव आणि ही स्वयंपाकीणीची नौकरी सोड अन् येऊन राहा माझ्याकडं ! लोक शेण घालतात माझ्या तोंडांत–तूं स्वयपाकीण झाल्याचं पाहून ! परवां छबीच्या लग्नाच्या वेळीं किती निरोप पाठविले

मीं ! पण तूं आली नाहींस ! भुजंगदादानं आम्हांला लहानाचं मोठं केलं. तुझ्या मनांत मात्र परकेपणा असावा ......'

दादाच्या आठवणीनं दोघांहि भावांचे डोळे ओलावले कीं काय नकळे ! राधाकाकी मात्र नुसत्या ताठ डोळ्यांनी पाहात होत्या.

दोन दिवस मृत्यूची वाट पाहाण्यांत गेल्यावर तिसऱ्या दिवशीं सकाळीं आबारावानं मार्तंडरावाला एकीकडं नेऊन म्हटलं,

' मार्तंड ! म्हातारीचा प्राण घुटमळतो आहे अजून ! घरांत मात्र कुठं कसला पत्ता लागत नाही ! मला खात्री आहे, उशाखालीं तिनं कांहीं तरी पुरलेलं असावं...'

' असलंच पाहिजे ! आजवरची मिळकत जाईल कुठं ! अन् तुझ्या लग्नाच्या वेळी नवं सोनं घेऊन भुजंगनं माझ्या समोर बारा तोळ्यांच्या पाटल्या ठोकून घेतल्या होत्या. त्या जातील कुठ ? अन् शिवाय देशमुखाच्या घरची मिळकत ? '

आबारावानं कांही क्षण विचार केला आणि म्हटलं,

' तें होतं माझ्या लक्षांत म्हणून तर म्हटलं मी तिला, कीं कांही इच्छा असल्यास सांग ! जवळ कांही किडूकमिडूक असेल ते देऊन ठेव ! नासिक नाहीं तर काशी पाहातां येईल. ( ! ) एखाद्या धर्मशाळेच्या नाही तर मंदिराच्या जीर्णोद्धाराकरतां रक्कम पाठवितां येईल. म्हातारीनं श्वास टाकला न सांगितलं जें आहे तें तुमचच आहे. मला काय कुठं बरोबर न्यायचंय् ! पण म्हणे, आपण नेलेले दागिने अंगावर घालायचे नसले तरी एक वेळ डोळ्यांनी पाहावेसे वाटतात ! मग सारा गड्डा हवालीं करीन, असं तिचं म्हणणं ! हें ठीक झालं ! पण तिचे दागिने आतां आणायचे कुठून ? '

मार्तंडरावहि क्षणभर विचारमग्न झाले.

' आबा !' ...ते म्हणाले ' माझाहि नाइलाज आहे. वैनीच्या सोन्याच्या साखळ्या छबीच्या लग्नाच्या वेळी मला गहाण टाकाव्या लागल्या...'

' माझ्याजवळ तर तिच आतां कांहीच उरलं नाही ! तीसएक रुपये मात्र मी आणले आहेत बरोबर. न जाणो म्हातारी कचकली तर तिच्या अंत्यविधीसाठीं लागतील ! घे हे ! अन् बघ कुठं कांहीं गहाण ठेवलं असशील तर सोडवून आण ! ...'

मार्तंडरावांनीं पैसे घेतले न् फार गहन विचार आपणास आकळला अशी गंभीर चर्या केली न् म्हटलं,

‘ हें बघ आबा ! आणखी कुठं तरी उसनवारी करून गहाण पडलेले वैनीचे दागिने मी सोडवून आणतों. स्पष्ट बोलतों याचा राग करूं नकोस. तुला तसा मलाहि संसार आहे ! पुढल्या प्राप्तींत मात्र माझा अर्धा वांटा असावा !...’

आबारावाला हंसूं आल्याशिवाय राहिलं नाही. लुच्चा लेकाचा ! मार्तंड स्वतःला वकील समजत असला तरी आबारावहि सारे छक्के पंजे जाणून होता ! म्हणे पुढल्या प्राप्तीत अर्धा वांटा असला पाहिजे ! हं ! बरंय् ! पाहून घेऊं !

आबारावानं लाचारीच्या आवाजांत म्हटलं,

‘ ह्या गळ्याची शपथ मार्तंड ! मला तिचं कांही नको ! मला मूल ना बाळ ! अन् आतां करायचय् काय तिचं सोनं मला. तुझंच आहे बाबा तें ! तिच्या कर्मांतरासाठी मात्र तुलाच तरतूद करावी लागेल ! ’

संध्याकाळ टळून गेली होती. राधाकाकीच्या उशाला दिवा उजळ झाला होता. तो उजेड पाहून मृत्यूला प्रगट होण्याची भीति वाटत असावी. मार्तंडराव निघून गेल्यावर आबारावानं सारं घर धुंडाळलं होतं. वैनीला दागिन्यांचं आश्वासन दिलं होतं. अन् तिचे हातपाय गार पडत चालले आहेत काय हें जाणण्याच्या निमित्तानं उशापायथ्याची भुई चांचपून पाहिली होती. तशांत काकीनं श्वास टाकला होता. डोळे उघडून आबारावाकड पाहिलं होतं.

प्राणज्योत अद्याप जिथल्या तिथंच होती तर !

राममंदिरातील घटानाद ऐकू येत होता. दासमहाराजांचा आरतीनंतरचा मंत्रोच्चार राधाकाकीच्या कानी येत होता. मग खोल आवाजांत काकीनं आबारावाला विचारलं होतं,

‘ आणले का मार्तंडभावोजींनी दागिने ? ’

‘ नवाची गाडी अजून आली नाही वैनी ! ’ आपुलकीची उत्कटता दर्शविणाऱ्या आवाजांत आबारावानं उत्तर दिलं होतं.

मार्तंडराव येण्यापूर्वीच म्हातारीच्या गुप्त धनाचा शोध लागावा म्हणून आबारावाची सारखी तडफड न् धडपड चालू होती.

अखेर मार्तंडराव आला तो आबारावाच्या डोक्यावरून हात फिरविण्याची पूर्ण तयारी करून !

सकाळी मात्र दोघंहि थक्क होऊन गेले.

मार्तंडरावानं आणलेल्या दागिन्यांच्या डब्यासह राधाकाकी नाहींशा झाल्या होत्या. फसवाफसवीच्या उलाढालींत दोघांचीहि हयात खर्च झाली होती. फसलं जाण्याचा प्रसंग मात्र दोघांच्याहि जन्मांत एखादा देखील आला नव्हता. म्हातारी सदेह आणि सालंकार वैकुंठाला गेली होती की काय ? आबारावाचे तीस रुपय फुकट गेले होते. मार्तंडरावांची कावेबाजी सफल झाली नव्हती. आतां परस्परांच्या गळ्यांत गळा घालून रडावं की काय, अशा संशयार्थीची चर्या करून ते बंधुद्वय परस्पराकडं पाहात बसले होते !......

◆ ◆ ◆

राधाकाकी वैकुठांत नसल्या तरी राममंदिरांत होत्या. सूर्यबिंब अद्याप वर आलं नव्हत. सौम्य, शांत आणि चेतोहर प्रकाश जिकडं तिकडं फांकला होता. तो रामाच्या सस्मित मुखाचा असावा ! सृष्टीत जागृतीचा जो आवेश दिसत होता तो बहुधा दासमहाराजांच्या सताल आणि खड्या आवाजांतील मंत्रांचा परिणाम असावा ! राममदिरांतल्या त्या रामप्रहरी आपण अनंत काळासाठीं जागृत झालों आहों, आपले जन्मजन्मांतरींचे हेतू सफल झाले, अशा उदात्त व्यापक भावनेनं राधाकाकीच्या मनाला स्पर्श केला !

भक्तीच्या अनावर आवेगानं नुसत उद्गद होऊन त्या म्हणत होत्या, '.रामराजा ! घे ! घे हे माझ सर्व धन ! न् सांग तुझ्या दासमहाराजांना—माळझिपरीकरांच्या वंशांतली राधा दानधर्मासाठीं चवल्या पावल्या टाकणारी स्त्री नाहीं ! आतां तरी तुझ्या पायांशीं मला आसरा मिळेल ना ?......'

पूजेंत मग्न असलेल्या दासमहाराजांनीं राधाकाकीनं रामापुढं ठेवलेला दागिन्यांचा डबा एकवार उघडून नीट पाहिला न् संतापनं खाडकन् मोरीत फेंकून दिला. कोळपून आणि करपून गेलेल्या राधाकाकीच्या ठिकाणी हृदयाचा जो अंश होता त्याला त्या कृतीनं फार जोराचा हिसडा बसला असावा.

दासमहाराज म्हणाले,

'काय वेड लागलंय्, थेरडे ! तुला ? माझ्या रामाला चवल्यापावल्यांनी मिळणारे दागिने अर्पण करतेस ! चल सरक येथून ! '

राधाकाकीच्या डोळ्यावाटें टपटप् अश्रू पडत होते.

◆ ◆ ◆

काकीच्या आयुष्यांल्या रडण्याचा हा दुसरा प्रसंग ! अहेवपणाचं वैभव नष्ट झाल त्या वेळी, अन् आतां ! पहिला सतीचा शोक होता ! आतांचा मनःकल्पित मुक्तीसाठीं आक्रोश होता ! उलट्या काळजाचे तिचे दोघे दोर आणि मर्मी घाव घालणारा तिसरा दासमहाराज–तमोगुणाच्या त्रिविधाकृतीच !

हताश राधेला राम म्हणत असावा,

‘ राधे ! कशाला या कपट नीतीच्या भानगडींत पडलीस ! अश्रूंच एवढं अमोल धन तुजजवळ असल्यावर खऱ्याखोट्या अलकारांची मजजवळ प्रतिष्ठा नाही ! ऊठ ! तू मुक्त आहेस !’ ◆ ◆ ◆

## थैली—

**स्मशानभूमींतून** मी गांवांत प्रवेश केला. मनावरच उदासीनतेचं दडपण कमी झालं नाहीं. आजवर वस्तीपेक्षां स्मशान निराळं, भयाण, आणि ढुंकून पाहाण्यासहि अयोग्य वाटत होतं. आतां भरवस्ती स्मशानाहूनहि शून्य वाटते आहे !

झाडाची पानं हालताहेत ! वारं धूळ उडवीत आहे ! आज सकाळचं, किंबहुना दीड दोन तासापूर्वीचं जें आभाळ होतं तेच आतांहि आहे. भूमीच्या उचीत अथवा सपाटीत कुठं फरक झालेला दिसत नाही. वाहनं इषारे आणि खडखडाट करीत जात येत आहेत. माणसं व्यवहारांत गर्क आहेत. मी देखील कांही पावलं चालत गेलों तसा परत वळलों आहे——चालतों आहें ! ज्याला मी स्मशानांत पोंचविलं त्याच्यावांचून जगाचा व्यवहार यत्किंचित्‌हि अडलेला दिसत नाही !

जगाची घटनाच चुकली आहे असं वाटतं ! जीवनाच्या सातत्याला कांहीं तरी अर्थ आहे ? नद्या आटतात. झाड निष्पर्ण होतात. पावसाळा आल्यावर ओढ्यांना भरती येते. ऋतुमानाप्रमाणं हिरवी पालवी पुन्हां प्रगट होते. सृजन आणि लयाच्या या अशा क्रमांत कुठं कांहीं तरी चूक झाली आहे ! एवढ्या या अफाट विविधतेंत एकसूत्रीपणाचा संपूर्ण अभाव आहे ! अभावाची जाणीव नसलेल्या विपुलतेची किंमत काय ? कोणत्याहि एखाद्या क्षुद्र झाडाचं पान गळालं तर संबंध सृष्टींत केवढा हाःहाःकार उडायला हवा ! ऋतूंचा क्रमच एकदम उलट सुलट झाला पाहिजे, किंवा तो पूर्णपणे थांबला पाहिजे ! फुलांच्या विकसनांत, ग्रहगोलांच्या फेरींत, वाऱ्याच्या शीतोष्णतेंत, दिवस रात्रीच्या उगवण्या-मावळण्यांत, माणसांच्या हालचालींत अकस्मित खंड पडला पाहिजे !

या जगांतून माझा मित्र नाहींसा झाला हें दुःखदायक तर खरंच ! पण त्याच्या निधानानं एक कणहि नाहींसा झाल्यासारखा सृष्टीला जाणवत नाही हें पाहाण, त्याहूनहि अत्यंत दुःखदायक आहे !

◆ ◆ ◆

हेंच तें घर !

वेश्येचं घर तरी थोडं निराळं असतं ! तें वस्तीतच असलं तरी खिडकीच्या किंवा दाराच्या पडद्यावरून, दारांतल्या पायतणावरून, आंत बाहेर करणाऱ्या माणसांच्या चर्या आणि पोषाखावरून, अथवा बोलीवरून वेळी अवेळीं तें सहज ओळखतां येतं ! तसें हें घर नाहीं !

ब्राह्मणवाडींतलं सामान्य भाडेघर आहे तें ! एकदोन शेजारी आणि, पैशाचे व्यवहार अडतील अथवा नासतील अशी धास्ती बाळगणारे कांहीं ऋणबंधी याखेरीज त्या घराची विशेष कुणाला माहिती नाहीं.

दिवस उगवल्यावर हातापायांत काम करण्याचं अवसान यावं म्हणून थोडंसं खाऊन पिऊन चार माणसं व्यवसायानिमित्त घराबाहेर पडतात तसा या घरांतूनहि एक माणूस निघत होता.

जगाच्या हालचालीत विशेष रस अथवा रम्यता ज्याच्या प्रत्ययाला आली नाही अशी विलक्षण शून्य, आणि पोळलेल्या माणसाची त्याची दृष्टी होती. त्याच्या विचारविहाराला ही भूमि योग्य नव्हती कीं काय कोण जाणे ! जगाच्या अप्रसन्न वागणुकीनं निर्माण झालेल्या असमाधान आणि त्रस्ततेच्या कित्येक थराखाली त्याचं स्वतःचं विश्व दडलेलं होतं. या जगाचे वेष, भाषा, व्यवहार, आचार, उपचार घेऊन त्या विश्वांत त्याला प्रवेश करतां येत नव्हता !

बाहेरून तो परत येत होता तो खूप दमून ! त्याचे श्रम आणि तज्जन्य म्लानता पाहूनच कीं काय अस्तमान होत असावा ! एखादी मौल्यवान् वस्तु, एखादं अत्युत्तम लेणं जुनाट पेटींत कसं तरी ठेवून द्यावं तसं स्वतःला तो त्या घरांत रात्रभर कोंडून घेत होता !

गेल्या पंधरावीस दिवसांत त्याचं असं जाणं–येणं अजिबात थांबलं होत. कुठं काय उणं पडल, कुठं कसा बिघाड झाला याची, प्रतिष्ठितांच्या किंवा टवाळांच्या अड्ड्यावर जरा देखील चर्चा झाली नव्हती ! एका देखील वर्तमान-

पत्रांतून ती बातमी झळकली नव्हती. कांहीं घडणं शक्यच नाहीं, कांही घडलंच नाहीं, अशा तऱ्हेची जिकडं तिकडं बेफिकिरी दिसत होती !

आणि आतां अर्ध्या तासांपूर्वी विधवा झालेल्या स्त्रीचा मुक्तकंठ रुदनाचा स्वर त्या घरांतून येत होता ! स्मशानांतून आलेल्या माणसांना पाहून तर तो अधिकच भेदक झाला ! आपला जोडीदार अकालींच ओढून नेला म्हणून जगच्चालकाच्या अंतःकरणाला द्रव आणण्याचा ती प्रयत्न करीत होती ! व्याधानं क्रौंच नर मारला तेव्हां क्रौंच मादीचा विलाप ऐकून एका महाकवीची प्रतिभा सशब्द, छंदोमय झाली ! या घरांत एका प्रतिभावताची बायको पतिनिधनाचा एवढा आक्रोश करते आहे तरी एकाहि शब्दनिधीला तो ऐकू जात नाही !

◆ ◆ ◆

एकाच गांवांतले म्हणून आमच्या नेहमीं भेटीगांठी आणि संभाषणं होत. मी मित्र, तसाच त्याच्या लिखाणाचा चहाता !

बाहेरगांवचं आठदहा दिवसांच काम आटोपून मी परत घरीं आलों तेव्हां तो आपली वाट पाहात असेल असं वाटलं. चौकशीअंती तो फार आजारी असल्याचं कळलं. आठदहा दिवसांपूर्वी त्याला नुसतं कसकसत होतं एवढंच ! मी त्याच्या घरांत प्रवेश केला तेव्हां उन्हं उतरून गेलीं होतीं ! मला थोडंसं विचित्र उदास वाटलं. त्याच्या आजाराच्या बातमीनं मी थोडासा थरारलो ! संध्याकाळच्या वातावरणाचा मनावर परिणामहि चांगला झाला नाहीं ! मंद, उदास, भयदायी छायांचं पांघरूण घेऊन कृतान्ताचे दूत इथं वाट पाहात बसले आहेत, की त्यांनीं आपलं कार्य आटोपलं आहे, अशा चमत्कारिक शंकांच्या न् विचारांच्या आंदोलनांत मनाची मोठी विचित्र अवस्था झाली. पलीकडच्या खोलींत तो सुन्न होऊन निजलेला आढळला. इतक्यांत त्याची बायको पुढं आली. चाहुलीन न् बोलण्याच्या आवाजानं आजाऱ्याला त्रास होऊं नये आणि क्वचित्‌च लाभणाऱ्या डुकलींतून जाग येऊं नये म्हणून 'कसं आहे ?' असं नुसत्या खुणेनचं मीं विचारलं.

बायकोनं जी चर्या केली त्यावरून चांगली लक्षणं असल्याचं वाटलं नाही !

◆ ◆ ◆

पलिकडच्या खोलींतलीं विविध वास्तुलक्षणं माझ्या नित्याच्या परिचयाचीं होती. दिवस मावळत होता तसा त्या खोलींतला प्रकाशहि मंद होत चालला

होता. महान् साध्यासाठीं आयुष्यभर झगडूनहि तें स्वप्नवत् दिसावं तसा त्या उजेडांत खोलींतला आलोक दिसत होता. बाजूच्या दारावर एक तसबीर होती. ती एखाद्यां देवतेची नव्हती, अथवा एखाद्या नामवंताची नव्हती. पण ज्यानं ती लावली होती त्याच्या आयुष्यांत त्या व्यक्तीचं महत्त्वाचं स्थान होतं ! त्याच कार्य त्या व्यक्तीनं जाणलं होतं; पारखलं आणि प्रशंसिलं होतं ! प्रकाशाची किरणं तिथं अद्याप घोटाळत होती. प्रकाश उद्भवला तो येथूनच आणि तो मावळतो आहे तो तेथेच अशी त्यावरून एक कल्पना सुचण शक्य होतं ! जगाला त्याच कार्य कळूं शकलं नाहीं, तसं तें ज्यांनी पारखलं त्या व्यक्तीनाहि जगानं ओळखळं नाहीं, हा दैवदुर्विलास कीं लेखनश्रीचा शाप ? फोटोच्या समोरासमोर एक कॅलेंडर होतं. आठदहा वर्षापूर्वीच्या त्यावर सन आणि तारखा होत्या. जग एवढ पुढं गेलं, काल इतका पुढं सरकला तरी तो कित्येक संवत्सरांच्या खालींच दडला होता !

पलिकडं भुईवर एका मोडक्या देवदाराच्या खोक्यावर एक वांकडी होत चाललेली ट्रंक ठेवली होती. जवळच पुस्तकांचं लहानसं कपाटहि ठेवलं होतं ! खुंटीला कपडे होते ते सर्ज, ब्लेझर, पापलीन् या जातींतले नव्हते. टोपीनं तर मालिन्यांत उच्चांक गांठला होता. मळकट, घामट, अशी कारकुनी टोपी ती ! राजमुकुट अथवा कारकुनी टोपी कचऱ्यांत पडली तर ओळखून काढणं कठीण नाही ! या शिरोभूषणांपैकीं राजमुकुट उचलायला कित्येक हात सरसावतील. कारकुनी टोपी मात्र कचऱ्यांतच पडून राहाणार ! एक शिरावर वागविणं कष्टदायक होतं ! दुसरं कष्टानं न् कष्टांच्या संस्कारानं फेकून द्यावयाच्या अवस्थेला येत ! एकाच्या मुळाशीं रक्तपात आहे ! दुसऱ्यावर चढणारी पुटं रक्त अटविल्याची खूण असते !

या कारकुनी टोपीचा धनी मध्यभागीं आंथरुणावर पडला होता. धडधाकट देहाचा हाडाचा सांपळा होण्याच्या क्रमाची अखेर होत आली होती. धूम्रपानाचं साहित्य अनुपभुक्त दिसत होतं. आणि उशाकडल्या बाटलींतून ठेवलेलं, चतकोर कागदाच्या तुकड्यावर सरकारी दवाखान्यांतून मिळणार रंगीत पाणी जरा देखील ढवळलेलं दिसत नव्हतं !

◆ ◆ ◆

कंटाळा नांवाची मनाची आणि शरिराची एक विलक्षण दशा तेथल्या सजीव निर्जीव वस्तूवर भरली होती. ती त्या वस्तूंच्या अखंड स्थैर्यातून तर उद्भवली नव्हती ?

उत्तम जेवणानं येणारी सुस्ती, सुबत्तेच्या समाधानांत चढणारी मस्ती, कामचुकारपणाचं उघडं अथवा सूचक प्रदर्शन म्हणजे कंटाळा नव्हे! आजचं काम जरा वेळानं करतां येईल, नौकरचाकर आल्यावर करतील, तें तसं केलं अथवा झालं नाहीं तर कारभारांतला एखादा महत्त्वाचा भाग ढिला पडणार नाही, मग कां उगीच त्वरा, असं वाटणं म्हणजे देखील कंटाळा नव्हे! मनुष्याच्या उत्साहाचं भक्षण करणारा, कार्यक्षमता ग्रासून टाकणारा, चैतन्य खिळखिळं करून टाकणारा, हा कंटाळा नांवाचा राक्षस एकदां का जीवनमंदिरांत शिरला कीं मंदिर मोडकळीस आलंच म्हणूण समजावं! जें केलं त्याचं कोणतं चीज झालं, कांहीं करून तरी काय करायचं, या विचाराच्या मुळाशीं हा कंटाळा असतो.

हाच कंटाळा त्याच्या आयुष्यांत शिरला होता! खोलींतल्या प्रत्येक वस्तूवर धुळीचा थर चढला होता. त्याच्या लहानशा पुस्तकांच्या संग्रहावर, त्याच्या अल्पशा लेखन–संसारावरहि धुळीनं आपला हात टाकला होता. त्याचीं आराध्यं, सौदर्यचिंतनाची स्थानं, आणि मनोजीवनाची केंद्रं धुळीनं पुसट आणि असुंदर झालीं होतीं. व्यवहारी आणि विलक्षण राहाटींतून जात असलेल्या जगाच्या उपेक्षेची ती चिन्हंच नव्हतीं तर काय? त्यांच्या भंगलेल्या आकांक्षांचा तो चूरहि म्हणतां येईल!

त्यानं पोस्टांत पासबुक उघडलं नव्हतं! पैशाला पैसा जुळवून, पोटाला चिमटे घेऊन अथवा इतरांच्या पोटाचे चिमटे काढून बंगला बांधला नव्हता. सोनंनाणं जमविण्याची हांव ठेवली नव्हती. लग्न प्रसंगीं अथवा अशाच इतर सभारंभाच्या वेळीं नेसण्यासाठी आंतल्या घरांतील ट्रंकांतून बायकोला तऱ्हेतऱ्हेची लुगडी काढतां यावीं अशी तरतूद केली नव्हती! बाजारभावांत घासाघीस करणं, पुढच्या कित्येक पिढ्यांना पुरेल ऐवढें धन मिळवून ठेवण्यासाठीं हजार भानगडी करणं हेंच ज्या व्यवहारचतुरांचं जीवनसर्वस्व तें साधण्याचंहि त्याच्या कधी मनांत आलं नव्हतं न् तें जमणं तर मुळींच शक्य नव्हतं!

◆ ◆ ◆

लेखक म्हणून नांवरूप मिळविण्याची त्याची इच्छा होती. त्याचीं त्या कार्यांतलीं सुखंदुःखं पाहिल्यावर मला नेहमीं वाटत आलं कीं, समजूतदार सुबुद्ध माणसानं

लेखन करण्यासारखं दुसरं कुकर्म नाहीं! नाजूक मनाच्या माणसानं तर या कार्यांत पडूं नये असं कुणी म्हणतात आणि म्हणतील! पण मन नाजूक ठेवल्या-शिवाय प्रतिभेच्या लहरी सांभाळणं आणि मनोदर्शन करविणं अशक्य! मनाचा केवढाहि खंबीर माणूस असला तरी लेखनाच्या नादीं लागला कीं हळवा झालाच म्हणून समजावं!

लेखनाचीं सुखं अलौकिक तर खरीच! पण दुःखंहि अत्यत दाहक आणि असह्य! उत्तमोउत्तम कल्पनांच्या संभवान आणि सुरेख निर्मितीनं मदालसेच्या बाहुपाशांत कित्येक रात्री पडून राहिल्याची धुंदी अनुभवावी! तसंच चांगलं लेखन दुर्लक्षिलं गेल, उपेक्षेचा उपद्रव वाढला, अनुल्लेखाचे जबर प्रहार बसूं लागले कीं, उपदंशाच्या वेदना तरी अधिक सुसह्य असाव्या!

कल्पनांचा कल्लोळ जागृत होऊन अशी अवस्था साधण्यासाठी केवढा प्रयत्न करावा लागतो! लेखनाला उद्युक्त होण्यासाठी उन्मुखता साधण्यासाठीं, ती प्राथमिक निशा आणण्यासाठी त्याची केवढी तडफड होत असे! अप्रसन्न घटना टाळाव्या लागत, नको वाटणाऱ्या व्यक्तीपासून दूर राहावं लागे. जिवलगांच अस्तित्वहि सहन होत नसे. खडखड, बडबड, आणि एकाग्रता ढळविणारे इतर बदसूर आवाजहि जवळपास होऊं नयेत असं वाटे. चहा, सिगारेट अशा बाह्य उपचारांचं साहाय्य घ्यावं लागे! हे उणं आहे, ते असल्याशिवाय संध्याकाळचा स्वयंपाक—संसाराचा गाडा चालणार नाही, अशी कटकट टाळावी लागे!

निर्मितीचा काल आणि तदनतरचा आनंद या योगे त्याच्या भौतिक वेदनांची जळमटं गळून पडल्याचं मी कित्येक वेळां पाहिलं आहे! लेखन म्हणजे अलौकिक आनंदाचं आणि आत्मविस्मृतीचं त्याला निधान वाटावं यांत नवल नव्हतं! त्यानं लिहिलेलं इथून तिथून थोडंबहुत प्रकाशित होऊं लागलं. चार ओळखीच्या मित्रांकडून प्रशंसा आणि अभिनंदन करणारीं पत्रं येऊं लागली. आपण चांगलं लिहूं शकतो, आणखी चांगलं लिहायला पाहिजे, ते तसं जमेलहि, अशा भावनेनं नवे नवे प्रयत्न होऊं लागले. एका कादंबरीला कुठल्याशा प्रांतिक साहित्य संस्थे-कडून लहानसं बक्षिसहि मिळालं. बक्षिसाची रक्कम फारशी नव्हती. वेळी अवेळी जिनं त्याच्या लहरी सांभाळल्या, आणि सेवा केली, त्या गृहिणीला एक जरीकाठी साडी विकत घेतां येईल इतकीहि ती रक्कम नव्हती! पण त्या तेवढ्याच रकमेचा आनंद असीम होता!

एखादी कथा अथवा कादंबरी लिहायची तर कित्येक दिवस नुसत्या चिंतनांत तो रममाण व्हायचा. जे कल्पनेला गवसलं तें मनाच्या सर्व भागांना कडकडून जाणवावं म्हणून त्याचा प्रयत्न असावा. कार्याला सुरुवातहि मोठ्या आनंदानं व्हायची. व्यवसायाचीं ओझी उत्साहानं न् त्वरेनं उधळून फेंकलीं जात. कथा-नायिकेचं रम्य चित्र कल्पनेच्या पंखावरून वाहून येत असे तेव्हां, जाडंभरडं जुनेर नेसलेली त्याची साधी भोळी बायको स्वयंपाकांत कामधामांत गर्क राहात होती. प्रतिभेच्या उन्मीलनाच्या एकेक क्षणाची काय किंमत असते याची त्या खेडवळ जिवाला काय कल्पना ! कचेरींतून आल्यावर नवऱ्यानं जेवावं, आहे नाहीं त्याची चौकशी करावी, मुलाला घ्यावं आणि अशाच तऱ्हेनं संसार करीत राहावं, असं तिला वाटे! डोक्यांत कांहीं तरी विचार भरवून कागदावर खरडायचे आणि ते मित्रांना वाचून दाखवायचा त्याला एक चमत्कारिक छंद आहे, एवढंच ती जाणत होती.

पण तिच्याच सहवासांत कित्येक रुपगर्वितांची चित्रं रेखिली गेली ! विधात्याला तिचं रूप नीट घडवितां आलं नाही. त्यानं कल्पनांचे रंग घेतले आणि प्रतिभेच्या छटांनी मनाला निरंतर प्रिय वाटणारी स्त्रीची मूर्ति घडविली—पूर्ण केली, असं म्हणायला काय हरकत आहे ?

◆ ◆ ◆

त्यानं जी पांचसहा पुस्तकं लिहिलीं होती ती फारशी गाजली गेली नाहीत. साहित्याच्या बाजारपेठापासून तो फार दूरवर होता. गाजावाजा करणारा मेळा सभोंवती नव्हता. दूरचा माल त्या बाजारपेठांत जाऊन आदळला की तो सडका कुजका असावा अशा भावनेने दुर्लक्षिला जात होता. मधूनमधून वर्तमान-पत्रांतून अभिप्राय आले; ते उथळ, पोरकट आणि चावरे! एक पुस्तक छपाईच्या संस्कारांतून बाहेर पडलं हें वृत्त एखाद्या वृत्तपत्रानं कळवावं ! एकानं कल्पना-रंजनाची कमाल मर्यादा झाली असं म्हणून नाक मुरडावं. तेंच दुसऱ्यानं वास्तववादी असलं तरी लेखकाला व्यापक दृष्टिकोन नाहीं म्हणून कमी प्रतीचं ठरवावं ! असे प्रकार होऊं लागले !

पोटासाठी कराव्या लागणाऱ्या व्यवसायांतून लिखाणाला वेळ सांपडावा म्हणून तडफड करायची, तळमळीनं लिहायचं आणि तें टीकाकारांच्या भट्टीत गेलं कीं अर्धे कच्चं भाजून कसं तरी फेकून दिलं जायचं, असं त्याच्या लिखाणाचं

झालं. फारसा पैसा मिळाला नाहीं. लिहून संसार धड करतां आला नाहीं! निदान कोरडी प्रशंसा देखील मिळवितां आली नाहीं.

आतां त्या पुस्तकावर धुळीचा थर चढलेला दिसत होता. ती धूळ फुंकरून टाकणारा आणि आंतील शब्दाशब्दांतून प्रगट झालेलं त्याचं अंतःकरण जाणणारा, आणि कलेचं मोल ठरविणारा काळाच्या उदरांतून कुणी समानधर्मा रसिकश्रेष्ठ केव्हां अवतारणार होता कोण जाणे!

◆ ◆

लौकिक उपेक्षेचा विषय निघाला की तो म्हणत असे,

'मला माझी कला अत्यंत प्रिय आहे! सनदी आणि धंदेवाईक टीकाकारांना ते आवडणं शक्य नाहीं! माझ्या कलेचा निर्माता तसा संरक्षकहि मीच! मीच तिचा भक्त आणि भोक्ताहि मीच!

'चौदा वर्षांच्या वनवासानंतर रामचंद्राला सर्वलोकेश्वराचं स्थान परत मिळाळं. भूकन्येचीं भाग्यलक्षणंच चांगलीं म्हणून रामचंद्र 'भूपति' झाले! पण सीतेसंबंधी कांहीं प्रवाद ऐकून रामाचं मन कलुषित झालं. खडतर वनवासानंतरहि अयोध्या तिच्या निवासाला योग्य ठरली नाही. एवढ्या लोक-लोकेश्वर राजाधिराजाला लोक–विकल्पांतून तिचं सरक्षण करतां आल नाही. त्या साध्वीच्या वांट्याला पुन्हां वनवास आला!

'रावणासारख्या बलाढ्य शत्रूचा ज्यानं नाश केला, देवादिकांचीं साध्यं ज्यानं सुलभ केली, आणि लोकांच्या आदराचा, पूजनाचा जो विषय झाला त्याला जानकीला सुखी करतां आलं नाही! सीता 'अयोनिसंभवा'! 'वैदेही'! ज्याच्या प्रतिभेच्या साक्षात्कारांतून ती साकार झाली त्या महाकवि वाल्मिकीच्या आश्रमांतच तिला चिराश्रय मिळाला! कल्पना आणखी थोडीशी ताणली की तो प्रसंग, व्यक्ति, परिस्थिति, आणि वातावरण यासह साकार झाल्यासारखा डोळ्यापुढं दिसतो! महामुनि वाल्मिकी आश्रमांतून पाहातो आहे तों श्रमानं मलूल झालेली, गर्भवति, तेजोगर्भा पण उपेक्षेनं निस्तेज झालेली परित्यक्त सीता आश्रयार्थ इकडं तिकडं दीन होऊन फिरते आहे! सीता म्हणजे वाल्मिकीची मूर्तिमंत कला! राजगृहांत तिचं चीज झालं नाहीं! लोकांना तिचं मोल कळलं नाहीं! त्या कवीश्वराचं अंतःकरण भडभडून आलं असलं पाहिजे!......'

◆ ◆ ◆

जें स्वतःला झिजवून केलं तें लाथाडलं गेल्यावर मनाच्या शक्ति कार्यक्षम कशा राहतील ? पंधरावीस वर्षांतल्या साहित्याचं परिशीलन करणारे कांहीं ग्रंथ बाहेर पडले. त्या ग्रथांना बक्षिसं दिलीं गेलीं. लेखक महान् अभ्यासू आणि दर्दी ठरविले गेले. पण तशा पुस्तकांत त्याचं नांव आढळलं नाहीं ! नवख्या आणि रांगड्या हातांनीं केलेला चिडबिडाट छापून आणि छापवून अक्षर वाङ्मयांत जमा होऊं लागला. नांव करण्यासारखं ज्यांच्याजवळ कांहीं नाहीं अशीं नांवं 'लोकमुखीं' होऊं लागली. ती होतील असे पद्धतशीर प्रयत्न होऊं लागले. संमेलनांतून अशांचाच सत्कार होऊं लागला. आणि त्यांच्या कार्याचं चीज म्हणून रकमेच्या 'थैल्या' अर्पण केल्या जाऊं लागल्या !

तो मात्र दूर आणि अलक्षित राहिला !

संसारांतल्या अडचणी वाढूं लागल्या तशी त्याची वृत्ति चिडखोर होऊं लागली. कुठं कुणाशी जुळेनासं झालं. कचेरीतल्या कामांत लक्ष लागेना. मग या जीवन–पद्धतीतून कशी सुटका व्हावी याविषयी विचार चालू लागले आणि बोलण्यांतूनहि ते प्रगट होऊं लागले.

एकदां तो म्हणाला,

'आपण जगतो आहो हे काय जीवन ? पृथ्वीच्या अफाट विस्ताराला आकाशाचं झांकण लावून आंत नियति आपला विचित्र खेळ खेळते आहे ! निराशा, असंतोष ह्यांचा अंतर्बाह्य जो दाह सहन करावा लागतो तो मृताला दिल्या जाणाऱ्या अग्नीपेक्षां कांहीं निराळा नाही !

'या जगांतून जे बाहेर पडले तेच जीवनाचे खरे धनी झाले. जीवनाच्या कल्पनेतली रम्यता, सुख, सौंदर्य आणि शाश्वति आहे ती तिकडं ! इथं जडतेचे नुसते सोहाळे चालले आहेत !......'

◆ ◆ ◆

या भागांत झालेला साहित्य संमेलनाचा सोहळा आम्ही दोघांनीं मिळून पाहिला. संमेलन होणार असं जाहीर झालं. वर्तमानपत्रांतून पत्रकं फडकलीं. लहानमोठ्या सभा झाल्या. आणि सभासद–नोंदणीसाठीं माणसं फिरूं लागली.

तो लेखक असल्याची कुठं कोणत्या महाभागाला आठवण झाली कुणाला ठाऊक ! पाऊण आण्याचं एक बुकपोस्ट त्याच्या पत्त्यावर आलं. संमेलनसमिती-

कडून आलेलं ते पत्र होतं. दरबाराची शोभा वाढविण्यासाठीं खास सरस्वतीकडून मानाचं बोलावणं यावं तसं तें पत्र पाहून त्याला वाटलं.

एक दिवशी वर्गणीसाठीं दोन माणसं आली.

' नमस्कार लेखक महाशय ! '

लेखक !

लेखक म्हणून आपण अद्यापहि ओळखले जातो, याचा त्याला क्षणभर आनंद झाला असावा !

तो लेखक आहे हे नमस्कार करणाराला माहित होतं, पण अभिवादनाची त्याची पद्धतीच अशी वाटली कीं जणूं त्याला दर्शवायचं होतं,

' तुम्ही लेखक असाल हो ! पण लेखन ही काय चीज आहे हे लेखन न करतांहि मी जाणूं शकतों ! '

त्याच्या त्या वेळच्या हालचाली मी नीट पाहिल्या आहेत. जवळच संमेलन होत आहे याचा आनंद वाटला पण, सभासदत्वाचे पैसे कसे भरावे, या काळजीनं तो थोडासा खिन्नहि झाला !

घरातलं सर्पण आणि इतर खाद्य पदार्थ संपले होते. पगार यावयाला अद्याप अवधि होता. त्यासाठी बायकोन शेजारणीकडून केलेली थोडीशी उसनवारी अखेर संमेलन प्रकरणीं खर्च झाली !

◆ ◆ ◆

समेलन ठरलं तसं थाटांमाटांत आटोपलं गेलं ! अध्यक्षांची मिरवणूक, भाषणं, ठराव, काव्यगायन, सत्कार, आणि थैल्या इत्यादि प्रकार झाले. प्रकाशन–सभारंभाचा लहानसा कार्यक्रमहि आटोपला; आणि अखेर सारं संपलं ! कुठं कुणाच्या भाषणांतून थोडासा उल्लेख, एकदोन नमस्कार, एखादि सकुतुहल दृष्टि आणि ' काय, हल्लीं कांहीं लिहीत नाहीं वाटतं आपण ? ' अशा तऱ्हेचा एखादा प्रश्न एवढंच संमेलनांत त्याच्या बाबतींत घडलं !

◆ ◆ ◆

संमेलन संपल्यावर सातव्या आठव्या दिवशीं त्याच्या अंगांत अकस्मित ताप भरला. औषधाची त्यानं काळजी घेतली नाहीं, तशी कचेरींत अर्ज द्यावयाचीहि त्यानं फिकीर ठेवली नाहीं. कचेरींतल्या रुळून गेलेल्या जीवनप्रकाराचा

त्याला उबग आला होता ! रोज जायचं; काल काम केलं तेंच, तसंच आजहि करायचं. इतके दिवस झाले, त्यांत खंड पडला नव्हता, पडणार नव्हता. त्यांतून कांहीं चांगलं निष्पन्न होणार नव्हतं. झाल तें पुरं झाल, हा विचार जोरकस झाला होता. ज्वर वाढत गेला होता अन् तो अकस्मित थंड झाला होता ! आतां शुद्धि नव्हती. मी डॉक्टरला आणलं. आल्यासारखं त्यांनी औषध दिलं. पण त्याचा चांगला परिणाम होऊं शकेल अशी आशा मात्र त्यांनी व्यक्त केली नाही !

त्या संध्याकाळीं तो एकदम ताडकन् उठून बसला. वाताच्या झटक्यांत त्याला आवरणं कठीण झालं. आंथरुणावर कसंबसं निजविल्यावर तो बडबडूं लागला,

‘ सज्जनहो !

‘ या साहित्यसमेलनांत माझ्या आजवरच्या कार्याचं आपण मोल करता आहां ! आजवर मी रक्त आटवलं ! सुरळीत संसार चालवायची आणि करायची व्यवहारबुद्धि मी गमावली ! कल्पनांच्या पिसांचा एकेक नाजूक रंग हेरण्यासाठीं आणि तो सुलिष्ट शब्दांत मांडण्यासाठीं मीं दिवस न् रात्री खर्चिल्या ! आज सरस्वतीनं तुमच्या रूपानं माझं कार्य जाणल ! मला आपण शेकड्यांनी मोजतां येईल अशी थैली अर्पण करतां आहां !...पण आतां काय अर्थ ! आयुष्यभर तुम्हीं पिसाळलेलीं कुत्री माझ्यावर सोडलीं ! आणि आतां कितीहि पैसे ओतले, केवढीहि ‘ थैली ’ अर्पण केली तरी तुम्ही माझ्या कलेचं चीज केलं, असं मला कधींच वाटणार नाहीं ! चला, उचला, उचला ही रक्कम !’ ◆ ◆ ◆

# स्वर्ग कुठं आहे ?

**त्या पिंपळाच्या** झाडावर अलिकडं कडक उन्हाच्या झळांचा नुसता वर्षाव होऊं लागला. त्या उदास मूर्तीला वाऱ्यानं लहर लागेल तेव्हां आणि लहरीला येईल त्याप्रमाणं झोंबून आणि झोडपून जावं ! काळभैरवाच्या दृष्टिक्षेपा-सारखीं उन्हं वाटत होतीं. अतिवेगानं चालत असलेल्या महाभयकर संहारकाच्या श्वासोच्छ्वासासारखं वारं वाहात होतं. संजीवक आणि उल्हसित करणारी त्याची शक्ति नाहीशी होऊन विखारून टाकण्याची प्रवृत्ति प्रत्ययाला येत होती. एखाद्या गलितगात्राकडं एखाद्या चावट पोरीनं उगीचच कामपूर्ण कटाक्ष टाकावे तसं त्या झाडावर चांदणं पडत होतं. आणि मंदिरांतील भिंतीवर काढलेल्या एखाद्या सुरंग चित्रावर काजळ सारवावं त्याप्रमाणं अंधारांत झाडाच्या रेषा गडप होऊन जात होत्या !

झाडावरलीं सगळीं पानं महायात्रेला निघून गेली असावी ! एका वांकड्या फांदीवर फक्त दोनच पानं उरलीं होती. एक पिकत आलेलं न् दुसरं पिकण्याच्या अवस्थेपासून अद्याप दूर असलेलं ! एकानं जगांतले सगळे रंग पाहिले होते, स्वतःजवळ असलेल्या सर्व रंगांची उधळ करून टाकली होती; अन् आतां असा रंग धारण केला होता की, ज्यावर कोणत्याहि ऋतूच्या प्रीति अथवा अप्रीतीचा संस्कार होणं अशक्य ! त्याला रंगवायला सृष्टीच्या रंगाऱ्याच्या नांदींत जणूं रंग मिळणं दुर्लभ होतं !

दुसरं पान हिरव्या अमदानीचं ऐश्वर्य लुटीत होतं. सारं सभोवताल रुक्ष, निष्पर्ण, रंगहीन आणि नीरस झालं होतं. पण सृष्टीच्या जवानीची खूण अजूनहि त्या कोवळ्या पानावर ठरून होती. म्हातारपणीं तारुण्यांतल्या एखाद्याच रसमय

आठवणीनं क्षणभर नवजीवन आल्यासारखं वाटावं तसं त्या हिरव्या पानामुळं झाडाचं होत असावं !

आपले विचार, विकार, स्वप्नं आणि जीवन–हेतु निराळे अशा समजुतीच्या तंद्रीत ती असत.

हिरवं पान मनाशी म्हणत होत,

' पिकून खंग झालेलं हें पान भगवीं वस्त्रं परिधान करून स्वर्गांत जाण्याची संधि पाहात आहे ! स्वर्गात जायच आहे, या ध्यासानंच कीं काय ते जीर्ण आणि गलित होऊन बसल आहे ! कुठं आहे याचा स्वर्ग, कुणाला माहित ? स्वर्गांत वाळून कोळ झालेल्या अशा पानाला ठाव मिळू लागला तर कल्पद्रुम जागच्या जागींच विपर्ण होऊन पडतील ! नंदनवन म्हणजे पाचोळ्यानं भरलेलं मैदान नव्हे, की कुठल्याहि वाळलेल्या पानाला तिथं आधार मिळेल ! स्वर्ग मागेच पडला आणि हे मुनी पुढ जात आहेत ! स्वर्गांत माझ्यासारखीं कोवळीं-लुस आणि हिरवीगार पानंच शोभून दिसतात ! ऋतुराजाच्या रंगोत्सवांत आणि ऋतुराज्ञीच्या रसक्रीडेत मुक्तपणानं विहरण्याचा मान माझाच ! जिथं स्वैर रंगतां येतं आणि रमतां येत, त्या रंगण्याच आणि रमण्याचं जिथं कौतुक केलं जातं, त्या स्थानापरता निराळा स्वर्ग कोणता ?...मी स्वर्गांतच आहें !...'

शुष्कपर्णांचे विचार चालू होते,

' हे हिरवं पान अज्ञानाच्या नशेत नुसतं चूर आहे ! हरितश्रीच्या मस्तीत स्वर्ग दोन बोटंच नव्हे, तर अगदी साध्य झालाच आहे अशा समजुतीनं ते भारलं गेल आहे ! संभव आणि विकसन या दोन्ही अवस्था मीहि पाहिल्या आहेत म्हणावं ! त्यांत स्वर्ग असता तर हे विविध संस्कार व्हायचं अन् उन्हांत तापत बसायचं कांहींच कारण नव्हतं ! विकसन संपल, परिणतीचा शेवटचा टप्पा संपला की स्वर्ग फारसा दूर नाही हे पूर्वीच मला कळायला पाहिजे होतं ! आतांहि फारसा उशीर झालेला नाहीं. विकासाचं अंतिम गांठलं कीं स्वर्ग साध्य झालाच ! त्यानंतरची दशा म्हणजे स्वर्गारोहण !......'

इतक्यांत वाऱ्याचा एक झपाटा आला, आणि काय आश्चर्य ! पिकलेल्या पानानं एकदम त्यांत उडी घातली.

हिरव्या पानानं विचारलं,

' अहो राजश्री ? कुठं ! '

' स्वर्गांत ! असेल इच्छा तर चल लवकर ! ......'

उत्तराऐवजीं कोवळं पान नुसतं खदखदून हंसलं ! पिकलेल्या पानानं खात्रीनं नशा केली असली पाहिजे ! कारण तें गरगर फिरत, वांकडतिकडं वर—खाली उडत जाऊं लागलं ! लगेच मध्याकाशांत घेर घालून फिरत असलेल्या प्रचंड पुंज—मेघांच्या टकरा होऊं लागल्या. भरघोस उभ्या शेतांत माजलेल्या ओढाळ जनावरांचा जमाव शिरलेला दिसतांच राखणकऱ्यानं एकदम सावध होऊन त्यांना झोडपून हांकलून लावण्याचा प्रयत्न करावा, तसं ढगांना उधळून लावण्यासाठीं वारं जोरानं वाहू लागलं. वाऱ्याला कमालीची गति येऊं लागली. धुळीनं दिशा भरून गेल्या. झाडं काडकाड मोडून उखडून पडूं लागलीं. आणि भूगोल व आकाश उलट सुलट होतात कीं काय असं क्षणभर वाटलं !

◆ ◆ ◆

आकाश निवळण्याच्या बेतांत आलं तेव्हां वाऱ्याचा वेग कमी झाला. प्रकाश फाकला आणि हवेत शीतळाई आली. अपघातांत एखादा अवयव मोडून गळून पडावा त्याप्रमाणं त्या पिंपळाची एक फांदी मोडून दूरवर जाऊन पडली होती. वाऱ्याच्या पहिल्या फटकाऱ्यांत स्वर्गांत निघालेलं वाळलेलं पान नेमकं त्या फांदी-खाली चुरमळून पडलं होतं. अन् त्या पानाजवळच हिरवं कोवळं पान विकलांग होऊन फांदीच्या भाराखालीं गुदमरून गेलं होतं ! फांदीच्या दडपणानं, स्वर्ग कुठं आहे याचा विचार करण्यापुरती दोघांनाहि सावधानता राहिली नव्हती ! ◆ ◆ ◆

●

# प्रधानांचा दौरा

**राजधानीचं** शहर ' राजधानी ' या नांवाला शोभण्यासारखं तर होतच, पण संस्थानाच्या मोठेपणाच्या ख्यातीतहि त्यामुळं भर पडत होती. हलक्या प्रतीची का होईना पण दरबारी खिदमत केलेली माहितगार म्हातारी माणसं आपसांत म्हणत,

' शहर अस प्रेक्षणीय आहे म्हणून राज्य टिकलय्, अन् तुमचं आमच पेन्शन् चालू आहे ! एकदां स्टेट् खालसा करायला विलायतेहून हुकूम आला होता ! तशांत दिल्लीचा फिरंगी अधिकारी इथंच मुक्कामाला होता '—राजवाड्यांत.' शहराचा विस्तार, इमारती, वैभव पाहून अन् आठदहा दिवस आमच्या सरकारचा खाना झोडून तो गोरा माणूस खूष झाला न् त्यानं तो हुकूम तत्काळ परतविला. नुसता परतविलाच नाहीं तर तत्काळ विलायतेला एक खलिता पाठविला, ' हिंदुस्थानांतल्या सगळ्या स्टेट्स् खालसा झाल्या तरी हरकत नाहीं, हें स्टेट् मात्र आहे तसंच राहिलं पाहिजे ! ' कारण काय, तर समुद्राच्या अलीकडं अथवा पलीकडं असं दुसर शहर वसवूनहि तयार होणं न् टिकणं शक्य नाही !...'

त्यांत कितपत सत्य असेल तें असो; पण एक गोष्ट मात्र खरी की, तें शहर प्रेक्षणीय होतं ! प्रेक्षणीय स्थळं आणि विहार-विलासाच्या अद्यावत् सर्वोत्कृष्ट आणि सर्व सोयी तिथं होत्या. धनधान्यानं समृद्ध आणि आबाद ! विश्वप्रवासाला कधींकाळीं निघालेल्या कुबेरानं इथं कित्येक महिने तळ ठोकला असावा, असं वाटत होतं. शहराला ऐतिहासिक परंपरा होती. त्याचं पौराणिक महत्त्वहि सिद्ध करायला आठनऊ लेख लिहून जें साधणार नाहीं, तें कुबेरासंबंधींच्या वरील विधानानं सहज सिद्ध होतं !

' राजधानी ' समुद्रसपाटीपासून कित्येकशें फूट उंच होती. त्यामुळं हवामानहि मधुर शीत आणि सुखदोष्ण होतं. लक्षावधि सामान्य माणसांच्या मासिक वेतना-इतका ज्यांचा एका दिवसाचा पगार असतो, निवासाला प्रासाद-तुल्य बंगला असतो, गुदमरून टाकील एवढं ऐश्वर्य असतं, अशा माणसांना मात्र तेथली हवा मानवत नाहीं ! हवाच अशी करंटी कीं अशा माणसांचं प्रकृति-स्वास्थ तिला राखतां येत नाही. त्यांचं मनहि असं ओढाळ आणि विलक्षण कीं, एका जागीं न् एका गांवीं त्यांना करमत नाहीं. अन् साहजिकच त्यांना मग प्रवासाची हुक्की येते !

◆ ◆

राजधानीत अन् राजधानींतून निघणाऱ्या वर्तमानपत्रांत अलीकडं एक नांव बरंच गाजूं लागलं होतं—

' राजा सी. व्यंकटराव ! '

अलीकडच्या दरबारी मानकऱ्यांच्या फोटोंत सर्वांत उठून दिसत असलेली आकृति ती व्यंकटरावांचीच.

मोटे मोठे वशिले लावून, राजदरबारांत चकरा घालून, मेवामिठाईच्या टोपल्या पाठवून अन् खानें करून अखेर ते एका खात्याचे मिनिस्टर झाले होते. त्यांची खटपट आणि धडपड इतकी असीम झाली होती की, ते जिवंत राहूं शकले हेंच आश्चर्य होतं ! कारण खटपट आणि धडपड करणं त्यांच्या प्रकृतीला मुळींच मानवत नव्हतं. अन् घराण्यांत तर तशी परंपरा नव्हती. माणूस मरतां मरतां वांचतो तो त्याचं नशीब बलवत्तर असतं म्हणून नव्हे ! त्याचीं मुलंबाळं, आप्तेष्ट यांचीहि नशिब त्याला जागवायला कारणीभूत होत असतात !

राजा सी. व्यंकटराव जगले, आणि मिनिस्टर झाले, ते स्वतःच्या सुदैवानं असं म्हणण्याऐवजी त्यांच्याकडं आलेल्या खात्यांतल्या नौकर वर्गाचं, आणि संस्थानांतील प्रजेचं नशीब जोरकस होतं म्हणून असं म्हणायला काय हरकत आहे ?

दरबारी अधिकार म्हणजे त्यांच्या घराण्याची परंपरा होती. पण त्यांच्या वडिलांच्या अमदानीपासून नसतीं लचांडं आड येत होती. वडिलांनींहि अखेर असाच कष्टानं अधिकार मिळविला होता, अन् विलक्षण रीतीनं गाजविला होता ! असं म्हणतात की, घरून निघतांना त्यांचे वडील ' मी आज इतके हजार रुपये बरोबर आणीन ! ' असं निश्चयात्मक सांगत. कचेरींत आल्यावर हाताखालच्या

अधिकाऱ्यांना दंड, सस्पेन्शन्, बदल्या, बडतर्फी, धमक्या आणि नव्या नेमणुका अशा एकेका अस्त्रानं जर्जर करून सोडीत. मग साहजिकच ठरलेली रक्कम जमा होत असे. या प्रकाराबद्दल कित्येकांना दुःख होत असे, नाहीं असं नाहीं. पण अधिकार मिळवितांना त्यांना केवढे कष्ट सोसावे लागले होते न् किती झळ लागली होती, याची कल्पना येणार कुणाला !

राजा सी. व्यंकटरावांनाहि भलता खर्च झाला होता. अधिकारप्राप्तीसाठीं घरांतून एकूण किती रक्कम गेली आणि अधिकारप्राप्तीनंतर घरांत एकंदर किती रक्कम आली याविषयी त्यानीं फिकीर ठेवली नव्हती. मिनिस्टर झाल्यावर फिकीर ठेवायचं कारण काय ? अन् फिकीर कसकसली म्हणून करायची ! उच्चाधिकारांत आराम हीच एक क्रिया महात्त्वाची असते. तीच ते करीत !

योग्य वेळी एखादा माणूस भेटायला आला की पट्टेवाल्याकडून अथवा खाजगी कारभाऱ्याकडून एकच ठराविक उत्तर मिळत असे,

' सरकार आराम करताहेत ! '

असं सांगितल्याशिवाय त्या अधिकाराची इतरांना कल्पना तरी कशी येणार ?

प्रजेच्या हितानाहितासाठी काही महिन्यांच्या अंतरानं फक्त कांही तास प्रधानांची बैठक भरत असे. त्या दिवशी तर ' व्यंकट–प्रासादांत ' एकच गडबड उडून जाई. नौकर चाकर सभय, साशंक आणि अत्यंत कार्यतत्पर दिसत ! एखाद्या नवख्या माणसानं विचारलं तर त्याला गंभीर आवाजांत उत्तर मिळे,

' आज सरकार कौन्सिलला जाणार आहेत ! '

कौन्सिलला जाणं म्हणजे काय याची कुणाला कांहीच कल्पना नसे. तेथून राजेसाहेब हुश्श ऽ हुश्श ऽ करीत परत येत, खेसकत अन् यथेच्छ उपहारानंतर आराम करीत ! प्रधानांच्या सभेला जाऊन येणं म्हणजे पृथ्वि–प्रदक्षिणेइतक कष्टप्रद कार्य असावं असं पाहाणारांना वाटे !

आपल्याकडं संस्थानांतलं एक महत्त्वाचं खातं आहे, तालुक्याच्या जिल्ह्याच्या आणि सुभ्याच्या ठिकाणीं त्या खात्याच्या कांहीं शाखा आहेत, प्रत्येक शाखेंत कांहीं माणसं मासिक वेतनावर काम करतात, कागद खरडतात, स्टेटमेन्टस् तयार करतात, गोंधळ उडवितात, अफरातफर करतात, अशा विविध हालचालीचं अस्तित्व आठवड्यांत एकदांच त्यांना कळून येत असे.

◆ ◆ ◆

रामराज्यासारखाच शतकांचा नाहीं तरी कांहीं वर्षांचा काल संस्थानावरून वाहून गेला होता. त्या काळांत म्हणे असेहि अधिकारी निपजले आणि पेन्शनचा कंटाळा आल्यावर निवर्तले होते कीं, पुढं आलेल्या कागदावर सही लहान करायाची कीं मोठी, असा गंभीर प्रश्न त्यांना पडे आणि तो सेक्रटरीच्या साहाय्यानं सुटला जाई ! आतांचा काळ बदललेला आणि सुधारलेला होता. कागद वाचून पाहिले नाहींत तरी मजकूर ऐकावा लागत होता. सेक्रेटरीच्या मेंदूचा आधार घेऊन निर्णयापर्यंत यावं लागत होतं, न् मग सहीचा संस्कार होत होता !

राजेसाहेबांचा मूड पाहाण्यांत सेक्रेटरीचे तासन् तास निघून जात. त्याची घोर तपश्चर्या पाहून अखेर राजेसाहेब आपणहून म्हणत,

' कांहीं कागद असले तर आणा लवकर ! '

मग सरकारी मायन्यांत लिहिलेल्या शब्दांचे आघात कानावर होऊं लागले आणि आठ नऊ सह्या झाल्या की, साहेब कंटाळत. ' संपलं ? ' असा प्रश्न विचारीत. अन् एखादी घृणास्पद वस्तु अथवा व्यक्ति पाहिल्यासारखा चेहरा करून 'पुरें पुरें' असं म्हणत न् निघून जात ! मग सह्या झालेले कागद पोस्टाच्या साहाय्यानं जिल्ह्या जिल्ह्यांत वांटले जात. अन् खात्याच्या कारभाराला थोडीशी गति आल्यासारखी दिसे !

संस्थानांत इतरहि अशीं गांवं होतीं कीं ज्यांचं वर्णन ऐकून तीं पाहाण्याची इच्छा व्हावी ! इतिहास कालांत राजे झाले आणि त्यांनीं लढाया केल्या. कांही इमारती बांधल्या आणि कबरी करून ठेवल्या. भविष्य कालांतली अज्ञात माणसं ही स्थानं पुनः पुन्हां पाहातील, तीं पडली झडली तर त्यांच्या डागडुजी न् संरक्षणासाठी एक स्वतंत्र खातं निर्माण होईल याची त्यांना काय कल्पना ? या पुराण वास्तूंनी माणसाच्या मनांत प्रवासाची उकळी उठविली. वाहानांची सोय झाल्यापासून तर ही उकळी दुर्दम्य आणि भयंकर होऊन बसली. त्यासाठीं कित्येक माणसांना रात्रादिवस विविध कामं करावी लागूं लागलीं.

या उकळीनं प्रथम व्यंकटरावांच्या सौभाग्यवतींना गांठलं ! कुठं कोणत्या जिल्ह्यांत कांहीं लेण्या पाहण्यासारख्या होत्या, कुठं देवस्थानं होतीं न् कुठलं हवामान राजधानीपेक्षांहि निराळं, सुखवाहक असल्याच्या बातम्या होत्या. राजे--साहेबांनाहि आराम अपुरा वाटूं लागला कीं काय कुणाला माहित ! जिल्ह्या

जिल्ह्याकडं जाड कागदावरलीं टंकलिखित पत्रें रवाना झालीं. तीं जिथं तिथं पोंचलीं आणि वाचलीं गेली तिथलं वातावरण हबकून अस्थिर झालं.

◆ ◆ ◆

'वरखेड'च्या कलेक्टर कचेरीपुढं बारा साडेबाराला एक परिचित मोटार येऊन थांबली. वाट पाहून थकलेला पट्टेवाला एकदम हुशार होऊन अदबीनंच पण त्वरेनं पुढं झाला; अन् त्यानं दार उघडलं. त्रासिक चेहऱ्याची, साहेबी पोशाख केलेली जाडजूड व्यक्ति खालीं उतरली. मोटारीचं दार उघडण्याचा, परत ढकलल्याचा अन् मोटार गॅरेजकडं निघून गेल्याचा आवाज होतांच जिकडं तिकडं नुसतं चुपचाप झालं !

हे 'वरखेड'चे कलेक्टर !

मामलेदारीपासून ते या हुद्यावर चढले होते. अधिकारांत वाढ झाली होती, तसा चेहऱ्यावरला त्रासिकपणाहि वाढला होता. पोशाखावरून विलायती वार लागल्याचा देखावा दिसत होता. पण मूळचा देशी रंग उजळ न झाल्यामुळं, विलायती बाटल्यांतून गांवरानी माल विकला जावा, तसा प्रकार वाटत होता !

सकाळचं टपाल पाहिल्यापासून साहेबांची तब्यत बिघडल्याची न् मिजास गरम झाल्याची बारीक बातमी घरच्या चपराशानं कचेरीत आणून पोंचविली होती. 'खाण्यापिण्या'च्या भानगडी न् कुलंगडी उघड होणार कीं काय, अशा संशयानं सकाळी त्यांचं खाणपिणं बरोबर झालं नव्हतं. साहेबांच्या चेहऱ्यावरून बातमीची सत्यता पटणं कठीण नव्हतं ! सलामासाठीं निवडक स्टाफ् दारापुढं दुतर्फा रांग करून उभा होता. कोण किती वांकून सलाम करतो हें साहेब रोज बारकाईनं पाहात. आज सरळ जाऊन त्यांनीं खुर्ची गांठली. मामला ठीक नाही हें सर्वांनीं जाणलं. कांहीं क्षणानंतर सह्यासाठीं कागद घेऊन भीतभीतच एक माणूस पुढं आला. साहेब एकदम कडाडले,

'काय, वेड लागलंय् तुला ? कागद कसले आणतो आहेस सह्याला ? मिनिस्टर येणार आहेत ! असिस्टंट साहेबाला पाठवून दे इकडं !'

प्रत्येक खात्याकड त्या बातमीचं लोण जाईल अशी व्यवस्था करायला सांगण्यांत एक केव्हां वाजला कळलं नाहीं !

साहेब त्रासिक चेहरा घेऊन आले तसे आणखी अधिकच त्रासून निघून गेले.

◆

त्या लहान टुमदार कचेरीपुढल्या तशाच स्वरूपाच्या एका घरापुढल्या बाकावर पट्टेवाला झोंपला होता. भर दिवसा पट्टेवाला मध्यरात्र करूं लागले कीं कचेरींत कामकाजाचा कसा उजेड पडत असेल हें सांगणं नकोच !

टपालाची न् कागदाची ने–आण करण्यांत अर्धा तास गेला कीं त्याला कांहीं काम नसे. क्लबात आणि मद्यगृहांत कधीं कधीं जाग्रणंहि घडत. त्यामुळं कदाचित् त्याला दिवसा झोंप घेतां येत असावी, नव्हे तशी ती मिळत असावी !

आज अकस्मित् भर दुपारीं घंटी वाजली. साहेबाला काम करायची लहर आली असावी, असं समजून तो मधल्या ऑफिस रूममध्यें गेला. घरगुती पोशाखांत असलेला, मध्यम वयाचा, गोरा आणि टक्कल असलेला माणूस खुर्चीवर सावध होऊन बसला होता. कित्येक दिवसांची धुंदि जादूच्या अद्भुत प्रयोगानं नाहींशी होऊन खाडकन् जाग यावी तशी त्यांच्या चेहऱ्यावर हुशारी दिसत होती. पी. डब्ल्यू. खात्याच्या इन्जेनियरचा अधिकार यांच्याकडं होता. डोक्याला टक्कल होतं, तें संपन्नतेचं लक्षण होतं असं म्हणण्याऐवजीं मेंदूच्या सृष्टींत शिशिरागम सुरू होऊन कचभार झडत चालला होता, असं म्हणायला काय हरकत आहे ? पट्टेवाल्याला न् स्टाफ्‌ला अर्धा तास त्यानं जर्जर करून टाकलं. याला बोलाव, त्याला घेऊन ये, तें स्टेटमेन्ट तयार कर, डाक बंगला साफसूफ ठेवायला लिहा, तमक्या ओव्हरसियरला अमका रस्ता नीट ठेवायला सांगा, असे त्याचे हुकूम सुटत होते.

या सर्व हुकमांचं मूळ एकाच गोष्टींत होतं !

मिनिस्टर येणार आहेत; डाक बंगल्यांत राहाणार आहेत; अन् तेथून कांहीं मैल असलेल्या गांवीं मोटारनं (रेल्वे लाइन् नसल्यामुळं) जाऊन परतणार आहेत !

हुकूम संपले न् माणसं पसार झालीं. तेव्हां साहेबानं अतिश्रम झाल्याचं दर्शविणारा श्वास टाकला न् पट्टेवाल्याला मद्याची बाटली आणण्याचा शेवटचा हुकूम सोडला !

◆ ◆

सिव्हिल् सर्जन् साहेबांच्या बंगल्यांत अन् बंगल्यापुढल्या आंवारांत दुपार धापा टाकीत होती ! वाळ्याच्या पडद्याच्या अडोशामुळं तिला बंगल्यांत शिरतां

येत नव्हतं, तसा झोपाळ–छायागर्भ वृक्षाखालींहि आश्रय मिळत नव्हता. तापून आणि संतापून ती उघड्यावर श्वास टाकीत होती न् मधूनमधून धूळ उडवीत होती !

बंगल्यापासून थोड्याशा अंतरावर पांचसहा माणसं सकाळपासून वाट पाहात बसली होतीं. त्यांच्या चेहऱ्यावर मात्र दुपारचे सारे रंगढंग प्रतिबिंबले होते !

त्यांत एकदोन मास्तर आणि बाकीचे कारकुनी करणारे तरुण, तसे सुरकुतलेलेहि चेहरे होते. सरकारी रीत्या कापल्या जाणाऱ्या 'इन्सुअरन्स् फंडा'साठीं कांहीं जणांची तपासणी व्हायची होती. कांहींना वयाचं आणि प्रकृति सुदृढ असल्याचं ( Age and Health Certificate ) सर्टिफिकेट पाहिजे होतं. न् कांहीं आजाराचं सोंग खरं ठरविण्यासाठीं आणि रजा सुलभ करण्यासाठीं मेडिकल् सर्टिफिकेट घेण्याकरतां आले होते ! सरकारी डॉक्टरचा न् दवाखान्याचा लोकांना एवढा तरी उपयोग होत होता, हें महत् भाग्य होतं. हीं पांचसहा माणसं तीन-चार दिवसांपासून बंगल्यावर खेटे घालीत होतीं, न् साहेब बाहेर येणं शक्य नाहीं अशी खात्री झाली कीं परत जात होतीं. सरकारी दवाखान्यांतला कंपाउन्डर रिकामा बसत होता, आजाऱ्याचे पलंग भरत नव्हते, मदतनीस सर्जन गांवांतच कांहीं 'दवापाणी' करीत होता, या गोष्टी साहेबाला माहीत असाव्या ! माणसं आजारी होऊन येत नाहींत असं पाहून स्वतः आजाराचं सोंग घ्यावं आणि इतरांनाहि आजारी करावं, या सद्हेतूनंच कीं काय सर्जन् साहेब अशा माणसांना बंगल्याबाहेर तिष्ठत ठेवीत असत.

इतक्यांत दवाखान्यांतला एक कारकून धांवत येत असतांना दिसला. वाट पाहाणाऱ्या मंडळींनीं त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला पण तो जमला नाहीं. तो बाहेर आल्यावर त्याला गराडा घालावा आणि थांबवून घ्यावं अशा हेतूनं ती मंडळी उठली. कारकून घाईनच परत आला. बाहेरच्या माणसांनीं त्याला थांबविलं, आपल्या कार्याची कल्पना दिली आणि सर्जन्साहेबांची केव्हां भेट होईल याची चौकशी केली.

कारकुनानं सांगितलं,

'सर्जन् साहेब आतां आपल्याच गडबडींत असणार ! अशीं सर्टिफिकीटं द्यावयाला त्यांना वेळ कुठला ! अहो, मिनिस्टर येणार आहेत !'

त्या मंडळींत पांच दिवसानंतरहि आशेचा जो धागा उरला होता तो तुटला. नौकरीला, नशिबाला, पगार नापस करणाऱ्या ऑडिटरला आणि कांहीं मिनिस्टरला शिव्या देऊन ती माणसं चालतीं झालीं !

◆ ◆ ◆

मिनिस्टर आठ तारखेला यावयाचे होते. प्रत्यक्ष कार्याला सुरवात झाली ती सात तारखेच्या संध्याकाळी ! हें कार्य करणारा वर्ग फार निराळा होता. मिनिस्टरला त्याचं अथवा त्याला मिनिस्टरचं तोंड दिसणं शक्य नव्हतं. तिथं टंकलिखित सरकारी मायन्यांत लिहिलेलीं पत्रं नव्हतीं, किंवा एखादं स्टेटमेंट तयार करायचं नव्हतं. उघड उघड शिव्यांचं न् दंडेबाजीचं तें राज्य होतं !

विजारीला न् कोटाला चित्र विचित्र डाग आणि ठिगळं असलेला, स्वस्त पेयानं मेंदू ' तरतरीत ' ठेवीत असलेला, हातांत दंडा वागविणारा, गालफडं बसलेला कमालखां त्या राज्याचा राजा होता. अन् कांही कामाठी आणि सरकारी तनखा खात असलेल्या कांहीं महारणी, हा त्याचा नोकरवर्ग होता !

एखादा मोठा अधिकारी यावयाचा झाला न् अशीच व्यवस्था करायची असली म्हणजे कार्यक्षमता येण्यासाठीं कमालखां बेसुमार पीत असे; अन् मग शिव्यांचा वर्षाव करतां करतां त्याचा घसा बसून जाई ! पिण्याच्या आणि पिऊन शिव्या द्यावयाच्या संवयीत त्याचा आवाजहि विलक्षण घोगरा, बदसूर झाला होता. कित्येक वेळां तर त्याच्या गळ्यांतून शब्द यावयाच्या ऐवजीं तोंडांत नुसता फेस जमा होई; अन् तो तसा झाला कीं, क्रोधाग्नीचा भडका उडण्याची हद्द झाली, असं समजून कामाठी त्वरेनं आपल्या कार्याला लागत !

रात्रीचे दहा साडे दहा झाले होते. संध्याकाळपासून डाक बंगल्याच्या आवारांत खूप गर्दी जमली होती. फाटकापुढं सुस्वागतम्चं फडकं झळकत आणि फडफडत होतं. फाटकांतून बंगल्यापर्यंत आणून सोडणाऱ्या रस्त्याच्या दोन्हीं बाजूला पताका लावण्याची योजना केली जात होती. शामियाना आणि डेरे उभारले जात होते. कोच, खुर्च्या वाहून आणल्या जात होत्या. ' हें आणा, तें ठेवा, तें मोडा, हें नीट करा ' अशा हुकमी चढेल आवाजांनीं बंगल्याचं आवार गजबजून जात होतं. उजेड करण्यासाठीं पेट्रोमॅक्स आणीपर्यंत दहा साडेदहा कसें झाले कळलं नाहीं. मग जेवणाच्या निमित्तानं एकेक मंडळी पसार होऊं लागली. सामानसुमान न् भडकून विझत आलेली एकटी एक बत्ती मात्र मागं

राहिली. या पसाऱ्याला न् पसाऱ्यावर तळपून हिंदकळत असलेल्या प्रकाशाला जें मानवी अस्तित्व भूषवीत होतं तें किंती विलक्षण विरोधी परिस्थितींतलं होतं ! ' समींदर ' आणि ' गजा ' एका राहुटीपुढं राखण करण्यासाठीं बसले होते.

' समींदर ' हात पाय ताणून जमिनीवर पडली होती. मुन्सफ साहेबांच्या न् तत्सम इतर अधिकाऱ्यांच्या घरच्या कोच न् खुर्च्या वाहतां वाहतां ती फार थकून गेली होती. तिच्या सावळ्या सुकट्या तरुण शरीराला झाले एवढे श्रम मुळींच सहन होण्यासारखे नव्हते !

रात्रीला न् रात्रीच्या आकाशाला स्वतंत्र, सौम्य प्रकाश असतो. लखलखित उजेडांत त्याची माधुरी, आणि चित्तवृत्तींना एक प्रकारची बधिरता आणणारी मोहिनी कधींच दिसत नाही ! समीदरच्या सावळ्या यौवनांकित देहालाहि एक विशेष प्रकाश होता. तिच्या वसनानं धारण केलेल्या देहाच्या कमी अधिक स्पष्टास्पष्ट रेषांनी तो प्रकाश प्रकट केला होता. दोनतीन महिने लोटल्यामुळं त्या रेषा कांही अपूर्व प्रबोधनानं जाग्या झाल्या आहेत असं वाटत होतं ! ती अबोल, सुस्त पडलेली पाहून गजा तिच्याजवळ आला. कुत्र्यांच्या भुकण्यानं धास्तावलेल्या कोवळ्या कोकराला जवळ घेऊन चोंभाळावं, तसा त्यानं तिच्या अंगावरून हात फिरविला. प्रत्येक वेळीं तो तिला सांगत होता, ' समिंदर, मोठी खुर्ची उचलूं नकोस, फार चकरा करूं नकोस ! आजवर आपण हेंच करीत आलो अन् जन्मभर अशीच बिगार करावी लागणार ! व्हायचं तेव्हां काम होईल ! घरी जाऊन बैस ! '

पण तिनं काम सोडलं तर गजाला अधिक श्रम होत होते. अन् कमालखांच्या निवडक शिव्या सोसण्यासाठीं मनाची तयारी करावी लागणार होती ! इतर महारणींचं ठीक होतं. त्या शिव्या खात होत्या तशा शिव्या देत होत्या. त्या राबत होत्या, तशा त्याला राबवीतहि होत्या. समिंदरला तें जमणं शक्य नव्हतं न् गजाला तें आवडण्याचा संभव नव्हता !

' समिंदर ! '

गजानं हांक मारली तेव्हां समींदर उठून बसली. हात लांब करून न् बोटांत बोटं अडकवून तिनं आळस दिला.

गजानं म्हटलं,

' जाय् घरीं न् दुपारचं कांहीं असलं तर खाऊन नीज ! '

‘ अन् तूं ? ’

‘ मी येईन पहाटं इथलं काम आटोपल्यावर ! ’

‘ अं हं ! बेजार होऊन जाशील रात्रभर ! मला तरी कोण घरीं निजूं देणार आहे ? दुपारपासून इन्स्पेक्टरच्या घरीं गेले नाहीं ! चपराशी आला होता दोन वेळां ! त्याची बायको ओरडत असेल माझ्या नांवानं ! इजारी न् फडक्या धुवायला, भांडीं घासायला कुणी माणूस मिळत नाहीं म्हणे ! अशी चावट बाई आहे ! मरेस्तो काम करून घेईल पण उरलं सुरलं खायला मात्र नाहीं द्यायची कधीं !...’

‘ आज तर त्याच्या घरीं बिरयानी झाली होती असं कमालखां सांगत होता. सरबराईच्या सामानाची सगळी व्यवस्था त्याच्याकडंच आहे ! आपण दोघंहि उद्यांपासून इथंच राहूं ! भट्यारखान्यावर काम राहील ना मसाले वाटायचं न् सर्पण फोडायचं ! तुला थोडंसं गोड खायला मिळंल ! ’

‘ तें नाहीं पचायचं न् मानवायचं आपल्याला ! ही येणारी पीडा एकदां येऊन गेली कीं जवळच्या पीराला जाऊन येऊं आपण. नवस आहे माझा. एकदोन दिवस आराम मिळेल न् थोडंसं चांगलं खायला करूं. मीं पैसे जमविले आहेत ! ’

सामिंदरनं थोडीशी बचत केल्याचं ऐकून गजाला तिच्या संसारदक्षतेचा आनंद वाटला.

त्या भरांत त्यानं हलकेच तिला जवळ ओढून आपल्या देहाचा आधार दिला. अन् तिनंहि किंचित् डोळे मिटून घेतले.

गजाला वाटलं, या श्रांत, सुकुमार आणि संभवालस देहाला हलकेंच उचलून बंगल्यांतल्या एखाद्या मऊ कोचावर निजवावं. श्रम हलके करणाऱ्या अतीव नाजुक उपायांनीं तिला नीज आणावी, आणि आपल्या जागृतीनं तिच्या सुशान्त, सुखस्वप्नांनीं समृद्ध असलेल्या निद्रेचं संरक्षण करावं !

पण त्या कोचावर निजण्याइतकी ती सुदैवी नव्हती, न् त्याला तेवढं सामर्थ्य आणि ऐश्वर्य नव्हतं ! दैवाला हें साधतां येत नव्हतं, म्हणूनच ‘ दुर्दैव ’ म्हणायचं ! माणसाच्या सामर्थ्याच्या मर्यादा पाहून वागणाऱ्या दैवाची आणखी कोणत्या शब्दांत निर्भत्सना करावी ?

◆ ◆ ◆

श्वास टाकण्याची क्रिया जशी सहज घडावी, इतक्या साधेपणानं अकस्मित् बातमी आली,

‘ प्रधानसाहेबांचा दौरा कांहीं दिवसांकरितां तहकूब झाला ! ’

मोठं संकट टळल्यासारखे स्थानिक अधिकाऱ्यांचे चेहरे झाले. प्रधानसाहेबांसाठीं आणून ठेवलेल्या खाद्यपदार्थांची विभागणी आणि लूट झाली. अधिकाऱ्यांच्या घरंतील वातावरण उत्सवदिनासारखं दिसूं लागलं !

पण समिंदर आणि गजाच्या नैमित्तिकांत जरा देखील बदल संभवत नव्हता. लाक्षागृहापेक्षांहि आकर्षक झालेली डाक बंगल्यांतली सजावट आतां मोडायची होती. ती मोडणं आवश्यक होतं !

कमालखां तोंडाला फेंस येईपर्यंत शिव्या देत होता न ओरडत होता,

‘ ए समिंदर ! पाहात काय उभी राहिलीस ! उचल तो कोच न् पोंचव मुन्सफसाहेबांच्या घरीं ! गजा, अशी टंगळमंगळ चालणार नाही. हा दंडा पाहिलास ? अर्ध्या तासांत या खुर्च्या कलेक्टरसाहेबांच्या घरीं गेल्या पाहिजेत !...’

## आमचेकडे मिळणारीं कांहीं पुस्तकें.

# पद्म-प्रकाशन

## १९४८

| | | |
|---|---|---|
| भाई ( नाटक ) | श्री. माधव मनोहर | *०—१२—० |
| साधना ( दुसरी आवृत्ति ) | ,, गोपीनाथ तळवलकर | ३—०—० |
| निरंकुश ( कादंबरी ) | ,, मा. दा. आळतेकर | ३—८—० |
| एकच मार्ग ( पाकिस्तान ) | ,, राजगोपाळाचारी | ०—८—० |
| आपलें अन्न | अनु० : श्री. चं. वि. बावडेकर | १—०—० |
| जंगलांतील छाया ( कादंबरी ) | आचार्य भिसे | ५—०—० |
| सुवर्णतुला ( टीकालेख ) | श्री. श्री. के. क्षीरसागर | ३—०—० |
| समाजवादाचा फेरविचार | अनु० : श्री. अनंत काणेकर | १—०—० |
| भारत नेते ( भाग १ ला ) | अनु० : श्री. ना. म. संत | १—०—० |
| गांधीजींच्या सान्निध्यांत | श्री. प्रभाकर दिवाण | ४—०—० |
| **पालकांसाठी** | | |
| आमचें घर | श्री. ताराबाई मोडक | ०—१०—० |
| बालकांचा हट्ट | ,, ,, ,, | ०—१२—० |
| बालविकास व शिस्त | ,, ,, ,, | १—८—० |
| विचारीं बालकें | ,, ,, ,, | १—४—० |
| **लहान मुलांसाठी** | | |
| मुलांचा मेवा | कु. सई परांजपे | ०—८—० |
| मीनाला पडलेलें कोडें | दत्ता चित्रे | ०—८—० |
| संक्रांतीचा हलवा | श्रीमती राधाबाई केळकर | ०—१०—० |
| बालरवी ( भाग १ ला ) | ,, ,, | ०—८—० |
| **शालेय** | | |
| जगाच्या जंगलांत | डॉ. श्री. ना. वाळिंबे | १—०—० |

* शिल्लक नाही.

( २ )

## पद्मजा-प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| गांधीप्रणीत अर्थयोजना | अनु० : श्री वामन कृष्ण चोरघडे | ३–१२–० |
| लामणदिवा ( कथासंग्रह ) | श्री. दि. बा. मोकाशी | ३—०–० |
| दृष्टीआडच्या सृष्टीत | श्रीमती कृष्णाबाई मोटे | ३—८–० |
| चांगदेव–पासष्टी | श्री. भास्कर केशव प्रभू आजगांवकर | ३—०–० |
| कोथिंबिरीच्या काड्या— ( एकांकिका संग्रह ) | श्री. मनोहर माधव अळतेकर | ३—८–० |
| मखमालीचा पडदा | श्री. वसंत शांताराम देसाई | ७—८–० |

### मुलांसाठीं

| | | |
|---|---|---|
| हंसरीं फुलें | श्री. भूपाल अनंत डोंगरे | ०–१०–० |

( ३ )

## ‘ सकाळ ’ प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| महात्मा गांधी ( चरित्र ) | श्री. दा. न. शिखरे | ८—०–० |
| गांधी-जीवनकथा | सं. श्री. दा. न. शिखरे | ३—०–० |
| महायुद्ध | श्री. ज. पा. देशमुख | २—८–० |

( ४ )

## ईस्ट अँड वेस्ट बुक हाऊस, बडोदें

| | | |
|---|---|---|
| भटक्याची कमाई | श्री. उमाकांत भेंडे | २—०–० |
| मुलांसाठीं माडखोलकर | सं. श्री. भा. श्री. परांजपे | १—४–० |

### लहान मुलांसाठीं गोष्टी

| | | |
|---|---|---|
| मिटुकल्या गोष्टी | श्री. चिं. वि. जोशी | ०–१२–० |
| माझी आवड | ,, कृ. स. केळकर | ०–१२–० |
| उषा | ,, दि. ल. देवधर | ०—३–० |


टेलिग्राम एव्हरग्रीन | पद्म प्रकाशन लि. फिरोजशाह मेहता रोड, मुंबई १. | टेलिफोन ३०८३५–७

